# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग
### मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठरावाचे इतिवृत्तांत
### विषय/ठराव क्रमांक-1801 ते विषय/ठराव क्रमांक-1900

**दि.:-04.02.2025 ते दि.:-25.04.2025**

**प्रस्ताव क्रमांक 1801/2025:- (झोन क्र.7 विभाग)** **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.गौतम मोहन शिंदे, सफाई मजुर, झोन क्र.07 (फ) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या स्वत:च्या अँजिओप्लास्टी या आजारावर उपचारा साठी (Bill-A) एम.आय.टी.हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर येथे र.रु.1,09,356/- व (Bill-B) सिग्मा हॉस्पीटल येथे र.रु.3,19,329/- इतका खर्च केला आहे.

एकुण खर्च (Bill-A) र.रु.1,09,356/- मधुन अनुज्ञेय नसलेली र.रु.47,793/- वजा जाता शिल्लक र.रु.61,563/- ची 90% र.रु.55,406/- मधुन 5% र.रु.5,467/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरित देय र.रु.49,939/- येते.

एकुण खर्च (Bill-B) र.रु.3,19,329/- मधुन अनुज्ञेय नसलेली र.रु.40,630/- वजा जाता शिल्लक र.रु.2,78,699/-ची 90% र.रु.2,50,829/- मधुन 5% र.रु.15,966/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरित र.रु.2,34,863/- मधुन संबंधीतास देण्यात आलेली अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता उर्वरित देय र.रु.84,863/- येते.

(Bill-A) व (Bill-B) ची प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.49,939+84,863=1,34,802/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख चौतीस हजारआठशे दोन फक्त) संबंधीतास अदा करणे योग्य.

करीता श्री.गौतम मोहन शिंदे, सफाई मजुर, झोन क्र.07 (फ) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,34,802/-(अक्षरी रक्कम रुपये एक लाख चौतीस हजार आठशे दोन फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1801/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.गौतम मोहन शिंदे, सफाई मजुर, झोन क्र.07 (फ) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या स्वत:च्या अँजिओप्लास्टी या आजारावर उपचारा साठी (Bill-A) एम.आय.टी.हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर येथे र.रु.1,09,356/- व (Bill-B) सिग्मा हॉस्पीटल येथे र.रु.3,19,329/- इतका खर्च केला आहे.

एकुण खर्च (Bill-A) र.रु.1,09,356/- मधुन अनुज्ञेय नसलेली र.रु.47,793/- वजा जाता शिल्लक र.रु.61,563/- ची 90% र.रु.55,406/- मधुन 5% र.रु.5,467/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरित देय र.रु.49,939/- येते.

एकुण खर्च (Bill-B) र.रु.3,19,329/- मधुन अनुज्ञेय नसलेली र.रु.40,630/- वजा जाता शिल्लक र.रु.2,78,699/-ची 90% र.रु.2,50,829/- मधुन 5% र.रु.15,966/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरित र.रु.2,34,863/- मधुन संबंधीतास देण्यात आलेली अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता उर्वरित देय र.रु.84,863/- येते. (Bill-A) व (Bill-B) ची प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.49,939+84,863=1,34,802/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख चौतीस हजारआठशे दोन फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1802/2025:- (आरोग्य विभाग)** **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्जदार श्रीमती सुनिता दगडु पगारे यांनी त्यांचे पती श्री.दगडु गंगा पगारे (मयत) यांच्या आरोग्य विभाग मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका त्यांच्या

(अर्धांगवायु) या आजारावर उपचारासाठी मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.2,43,255/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख त्रेचाळीस हजार दोनशे पंचावन्न फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुतर्ता केलेली असून (अर्धांगवायु) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.2,43,255/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,567/- वजा जाता र.रु.2,41,688/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.2,17,519/- इतकी असुन 5% र.रु.12,162/- इतकी असुन संबंधीतास एकुण निव्वळ देय र.रु.2,05,357/- एवढी येते.

संबंधीताने मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वेखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकवि-2 मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनेज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली नाही.

दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीतास अदा करणे योग्य.

करीता, अर्जदार श्रीमती सुनिता दगडु पगारे यांनी त्यांचे पती श्री.दगडु गंगा पगारे (मयत) यांच्या आरोग्य विभाग मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्य र.रु.95,000/- (अक्षरी पंच्च्यान्व हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1802/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्जदार श्रीमती सुनिता दगडु पगारे यांनी त्यांचे पती श्री.दगडु गंगा पगारे (मयत) यांच्या आरोग्य विभाग मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका त्यांच्या (अर्धांगवायु) या आजारावर खाजगी रुग्णालय मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. एकुण केलेला खर्च र.रु.2,43,255/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,567/- वजा जाता र.रु.2,41,688/-शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेची 90% र.रु.2,17,519/- इतकी असुन 5% र.रु.12,162/- इतकी असुन संबंधीतास एकुण निव्वळ देय र.रु.2,05,357/- एवढी येते. दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1803/2025:-</u> (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.03 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.51,66,224/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामास सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु.55.00 लक्ष तरतुद उपलब्ध करुन देणेसह सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.51,66,224/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1803/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.03 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मध्ये र.रु.55.00

लक्ष तरतुद उपलब्ध करुन देण्यात येत असुन या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.51,66,224/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1804/2025**(कार्य.अभि.रस्ते विभाग) **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.01 व 02 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.36,65,813/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामास सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु.40.00 लक्ष तरतुद उपलब्ध करुन देणेसह सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.36,65,813/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1804/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.01 व 02 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मध्ये र.रु.40.00 लक्ष तरतुद उपलब्ध करुन देण्यात येत असुन या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.36,65,813/- च्या अंदाजपत्रकासमान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1805/2025:-** (शहर अभियंता विभाग) **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको बसस्टॅण्ड जवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीतक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व्.वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी सौंदर्यीकरण करणेचे कामाचे तत्कालीन वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या र.रु.1,21,06,632/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर जागेवर काम सुरु करुन वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार Foundation & RCC Structure चे सुमारे 30 टक्के म्हणजेच र.रु.32,73,385/- (Part-A) चे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. परंतु प्रकल्पावर काम करणाऱ्या PMC च्या बेजबाबदार व अनियमिततेमुळे त्यांची कामावरील नियुक्ती रद्द करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी सौंदर्यी करणाच्या कामाबाबत नागरीकांनी/सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या मागणीनुसार तसेच या संदर्भाने मा.वरिष्ठांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी अंती दिलेल्या सुचनेनुसार सुशोभिकरणाची व इतर कामे करणे साठी तत्कालीन नियुक्त वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील बाबींचा उपयोग करता येणे शक्य नसल्याने नवनियुक्त PMC यांनी याबाबत यापुढे करावयाच्या सौंदर्यीकरणा च्या कामासाठी र.रु.82,60,108/- चे सुधारीत (Extra Item) (Part-B) अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यानुसार सदर कामासाठी विद्युत व्यवस्था करणे, (र.रु.4,00,000/-) व PMC यांचे देखरेख शुल्क (1.50%) असा सर्व एकुण खर्च र.रु.1,21,06,596/- (18% GST सह) हा मंजुर रक्कमेच्या आतच आहे.

तरी सदर कामासाठी सौंदर्यीकरणाच्या कामासाठी र.रु.82,60,108/- चे सुधारित (Extra Item) (Part-B) च्या अंदाजपत्रकासह र.रु.1,21,06,596/- (18% GST सह) चे एकत्रित सुधारित अंदाजपत्रक मान्यते बाबतचा मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवावयाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1805/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको बसस्टॅण्ड जवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीतक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे र.रु.82,60,108/- चे (Extra Item) (Part-B) च्या अंदाजपत्रकासह र.रु.1,21,06,596/- (18% GST सह) चे एकत्रित सुधारित अंदाजपत्रकास याद्वारे मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1806/2025:-** (पंतप्रधान आवास योजना विभाग) **(दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.पंतप्रधान महोदयांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची राज्यात अंमल

बजावणी माहे डिसेंबर-2015 पासुन करण्यात आली आहे. सदर योजनेची मुदत दि.31.12.2024 रोजी संपुष्टात आली आहे.

मात्र अजुनही देशात परवडणाऱ्या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दि.01.09.2024 पासुन प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची देशात अंमलबजावणी करण्या बाबत च्या मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. ज्या अंतर्गत एक कोटी शहरी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटूंबासाठी परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच भाडेतत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी 2.0 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजना राज्यात राबविण्याचे प्रस्तावित आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 च्या मार्गदर्शक सुचनेनुसार सदर योजना दि.01.09.2024 पासुन 5 वर्षाकरीता राज्यात राबविण्यात येणार आहे. तसेच मार्गदर्शक सुचने नुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांचे प्राथमिक सर्वेक्षण करुन त्यांची स्थानिक स्वराज्य संस्था निहाय यादी अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्यामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच कंद्र शासना च्या मार्गदर्शक सुचनानुसार व मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 संपुर्ण राज्यभरात लागु करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.प्रआयो/2024/प्र.क्र.87/ गृनिधो-2 मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-400032 दि.15.10.2024 निर्णय घेतलेला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने दि.17.09.2024 रोजी प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सुचना pmay-urban.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असुन अंमल बजावणी यंत्रणांनी त्याचे पालन करुन तसेच या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर योजना त्यांच्या कार्यक्षेत्रात राबविण्या च्या सुचना शासन निर्णयाद्वारे प्राप्त झाल्या आहेत.

**2. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत:-**

1. सर्वांसाठी घरे ह्या संकल्पनेच्या पुर्ततेसाठी सदर योजनेअंतर्गत सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान अनुज्ञेय असणार आहे.
2. सदर योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) शौचालय व अन्य पायाभुत नागरी सुविधांसह 30 चौमी ते 45 चौमी पर्यंतची घरे बांधण्यात येणार आहे.
3. सदर योजना खालील चार घटकाद्वारे कार्यान्वित केली जाईल.
    1. स्वरुपातील घरकुल बांधकम (Beneficiary Led Constructuion) (BLC)
    2. भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (Affordable Housing I Partership) (AHP)
    3. भाडेतत्वावर परवडणारी घरे (Affordable Rental Housing) (AHP)
    4. व्याज अनुदान योजना (Interest Subsidy Scheme) (ISS)
4. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची अंमलबावणी कार्यरत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 प्रमाणेच केंद्रीय पुरस्कृत योजना (Centally Sponsored Scheme) म्हणुन केली जाईल. ज्यामधील व्याज अनुदान योजना (Interest Subsidy Scheme) हा घटक राज्य शासनाशी संबंधीत नसुन केंद्र शासन व बँकांशी राहील.
5. AHP प्रकल्पांतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील (EWS) लाभार्थ्यांसाठी किमान 25% घरकुले असतील. तसेच AHP प्रकल्पामध्ये अत्यल्प उत्पन्न गटांच्या घरकुलांची किमान संख्या 100 इतकी राहील.
6. या योजनेअंतर्गत प्रकल्पांमध्ये पाणी, स्वच्छता, सांडपाणी, रस्ते, वीज इ.मुलभुत नागरी पायाभुत सुविधा असाव्यात. BLC आणि ISS घटका अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांकरीता आवश्यक मुलभुत नागरी सुविधा पुरविणे आवश्यक राहील.
7. AHP आणि ARH प्रकल्पांच्या तपशीलवार प्रकल्प अहवालात (डीपीआर) खालील गोष्टींचा समावेश अत्यावश्यक आहेः
    - अपंग व्यक्ती (दिव्यांगजन) साठी अपंग व्यक्तींचे हक्क अधिनियम, 2016 नुसार, प्रवेशयोग्यता सुनिश्चित करण्यासाठी रॅम्प आणि इतर सुविधांची आवश्यक तरतूद करणे.

- AHP प्रकल्पांच्या जागेवर आवश्यक तेथे आंगणवाड्या बांधणे.
- पावसाचे पाणी साठवण्याची (Rain Water Harvesting System) तरतूद करणे.
- सौर ऊर्जा प्रणालीची तरतूद करणे.
- प्रकल्पाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करणे.

८. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 अंतर्गत मंजूर केलेल्या घरकुलांमध्ये, राज्य शासनाच्या शिफारशी नुसार केंद्रीय मंजुरी आणि देखरेख समितीने (CSMC) दि.31.12.2023 नंतर कोणत्याही कारणास्तव कपात (Curtailed) केली असल्यास, सदर घरकुलांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत मान्यता दिली जाणार नाही

**3. पात्र लाभार्थी:-**

1. लाभार्थी कुटुंबामध्ये, पती-पत्नी व अविवाहित मुले/मुली (Children) (वय वर्षे 18 खालील मुले /मुली) यांचा समावेश असेल.
2. या योजनेंतर्गत अनुदान/सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता शहरी भागात राहणाऱ्या EWS/ LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.
3. लाभार्थ्याने गेल्या 20 वर्षात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
4. योजने अंतर्गत बांधण्यात येणारी घरे ही कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या सयुंक्त नावावर असतील आणि ज्या कुटुंबात कर्ती महिला सदस्य नसेल त्या कुटुंबात कर्त्या पुरुषांच्या नावे घर राहील.

**4. पात्र लाभार्थ्याची वार्षिक उत्पन्न मर्यादा:-**

सन 2011 च्या जनगणनेनुसार दहा लाखाहुन जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (EWS) रुपये 6 लाख इतकी व उर्वरित महाराष्ट्रासाठी रुपये 4.5 लाख इतकी कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा राहील.

**5. प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 अंतर्गत केंद्र शासनाने विहीत केलेल्या खालील अटी/शर्तीची अमलबजावणी करण्यात यावी.**

1. सदर योजनेअंतर्गत, BLC घटकांतर्गत घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून, AHP अंतर्गत सदनिकेचा ताबा मिळाल्यापासून आणि ISS घटकांतर्गत गृहकर्जाच्या पहिल्या हप्त्याचे वितरण केल्यानंतर पाच वर्षांचा अनिवार्य लॉक-इन कालावधी असेल. सदर लॉक-इन कालावधी दरम्यान घर विकण्यास/हस्तांतरित करण्यास लाभार्थ्याला परवानगी असणार नाही.
2. शहराच्या कृती आराखड्यामध्ये (Master Plan) जी जमीन रहिवाशी प्रयोजनासाठी चिन्हांकित करण्यात आली आहे, अशा जमिनींसाठी वेगळयाने लागू असलेली अकृषिक परवान्याची (NA) अट रद्द करण्यात आली आहे.
3. शहराच्या कृती आराखडा (Master Plan)/नगर नियोजन योजना (Town Planning Schemes) मध्ये परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रांचा (Affordable Housing Zones) समावेश करण्यात येईल व त्यासाठी जमीन आरक्षित करण्यात यावी.
4. 10,000 चौ.मी. बांधकाम क्षेत्र (Built-up Area) किंवा 5,000 चौ.मी. भूखंड क्षेत्रापेक्षा जास्त असलेल्या सर्व गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये EWS/LIG घरांसाठी बांधकाम क्षेत्र (Built-up Area) मध्ये 5% आरक्षण अनिवार्य राहील. याव्यतिरिक्त एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली 2020 (UDCPR- 2020) मधील 3.8.2 मधील सर्वसमावेशक गृहनिर्माण (Inclusive Housing) ची तरतूद कायम असेल.
5. अभिन्यास (Layout) ला मंजूरी देण्यासाठी आणि बांधकाम परवाने देण्यासाठी एक खिडकी योजना (Single Window System) राबविण्यात यावी व आवश्यक त्या सर्व मंजूऱ्या 60 दिवसांच्या आत देण्यात याव्यात.

6. केंद्र शासनाच्या आदर्श भाडेकरु कायद्याचा (Model Tenancy Act) अवलंब करण्याची तरतूद मार्गदर्शक सूचनेत आहे. तथापि, राज्यात महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम (Rent Control Act) अस्तित्वात असल्याने केंद्र शासनाच्या सदर अधिनियमानुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.
7. राज्यामार्फत परवडणाऱ्या घरांच्या बांधकामासाठी जमीन उपलब्ध करुन देणे.
8. जमीन बँकेची (Land Bank) निर्मिती करणे.

**6. योजने अंतर्गत घटकनिहाय लाभः-**

| अ.क्र. | घटक | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|---|
| 1 | BLC | रुपये 1.5 लाख प्रति लाभार्थी | रुपये 1 लाख प्रति लाभार्थी |
| 2 | AHP | 1. केंद्र हिस्सा - रुपये 1.5 लाख<br>2. AHP-PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाउचर च्या स्वरूपात अनुदान<br>3. अतिरिक्त अनुदान - तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG- Technology Innovation Grant):- र.रु.1,000/- चौ.मी.प्रति घरकुल | 1. राज्य हिस्सा रुपये 1 लाख<br>2. AHP-PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाउचर च्या स्वरूपात अनुदान<br>3. अतिरिक्त अनुदान - तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG - Technology Innovation Grant):- र.रु.500/- चौ.मी.प्रति घरकुल |
| 3 | ARH | 1. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>2. प्रतिकृती 2 अंर्तगत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG):- र.रु.3,000/- चौ.मी. | 1. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>2. प्रतिकृती 2 अंर्तगत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG) :- र.रु.2,000/-चौ.मी. |

उपरोक्त निधी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेतील परिशिष्ट-8 प्रमाणे वितरित करण्यात येईल. म्हाडा अथवा इतर शासकीय यंत्रणेमार्फत AHP प्रकल्प राबविताना सदर प्रकल्पास CSMC ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर मोबिलायझेशन ॲडव्हान्स म्हणून राज्य शासनाच्या अनुदानाच्या पहिला हप्त्याच्या व TIG च्या पहिला हप्त्याच्या 40% पर्यंतचा निधी तसेच महाराष्ट्र निवारा निधीतून वितरित करावयाचा निधी SLAC च्या मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येईल.

**7. योजनेअंतर्गत घटक व त्यांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 योजने अंतर्गत पुढीलप्रमाणे तीन घटाकांच समावेश असेल:-

1) घटक क्रमांक 1: आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील लाभार्थ्यांना वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC)


स्थानिक सर्वेक्षण
ULB द्वारे पात्र लाभार्थ्यांची पडताळणी (पात्रता निकषांवर आधारित) संभाव्य लाभार्थी
स्वतःची जमिनी उपलब्ध
नाही
भूमिहीन लाभार्थी
हो
जिल्हाधिकाऱ्यांनी विहित कार्यपद्धती अवलंबून भूमिहीन लाभार्थ्यास जमीन पट्टा उपलब्ध करून देणे
कार्यवाहीचा कमाल कालावधी : ३० दिवस
पात्र लाभार्थी
अंमलबजावणी यंत्रणांद्वारे सर्व आवश्यक कागदपत्रांसह एकत्रित प्रस्ताव तयार करून नगर परिषद संचालनालयाला सादर करणे. (केंद्राच्या PMAY (U) २.० मार्गदर्शक तत्वातील Annexure-5A प्रमाणे)
कार्यवाहीचा कमाल कालावधी : १५ दिवस
प्रस्तावाची भौतिक व आर्थिक छाननी करून नगर परिषद संचालनालयाने सदर प्रस्ताव राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) कडे सादर करणे.
कार्यवाहीचा कमाल कालावधी : १५ दिवस
राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणाने (PMU) सर्व प्रस्ताव एकत्र करून मूल्यमापनासाठी SLAC ला व तदनंतर राज्यस्तरीय मान्यतेसाठी SLSMC ला सादर करणे.
कार्यवाहीचा कमाल कालावधी : ३० दिवस
SLSMC ने मान्यता दिल्यानंतर सर्व प्रस्ताव PMU ने CSMC च्या मान्यतेसाठी सादर करणे.
कार्यवाहीचा कमाल कालावधी : १५ दिवस
CSMC च्या मंजुरीनंतर घरकुलांचे बांधकाम सुरु करणे.
कार्यवाहीचा कमाल कालावधी : १५ दिवस
केंद्र हिश्यापोटी व त्याच्या समरूप राज्य हिश्यापोटी मंजूर अनुदान केंद्राच्या PMAY (U) २.०मार्गदर्शक तत्त्वातील) Annexure 5A प्रमाणे वितरित करणे.

२) घटक क्रमांक-2 भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती (AHP)

1) प्रतिकृती 1 AHP/AHP-JV



1) प्रतिकृती 2 AHP/PPP-



**घटक क्रमांक ३ भाडे तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती (ARH):-**

**प्रतिकृती 1:**

- राज्यात शासनाच्या अर्थसहाय्याने बांधण्यात आलेली परंतु अवितरित असलेली घरकुले भाडेतत्वावर देण्यासाठी वापरण्यात येतील.
- त्यासाठी प्रथम अशा अवितरित घरकुलांच्या प्रकल्पांची निवड करणे.
- आवश्यक असल्यास सदरहू अवितरित घरकुलांच्या दुरुस्तीसाठी व सदरहू प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अंदाजित खर्च किती येईल, याबाबतची माहिती एकत्रित करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थानिक सर्वेक्षणाद्वारे परवडणारे घरभाडे निश्चित करणे,
- स्थानिक स्वराज्य संस्थानी Request for Proposal (RFP) निर्गमित करणे.

**प्रतिकृती 2 :**

- शासकीय यंत्रणा/खाजगी विकासक त्यांच्या स्वतःच्या जागेवर सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर EWS/LIG करीता भाडेतत्वावरील घरे बांधू शकतात व त्याची देखभाल करु शकतात.
- संबंधित संस्था त्यांच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांसाठी/इतरांसाठी भाडेतत्वावरील प्रकल्प बांधू शकतात
- ARH प्रकल्पांतर्गत असलेली संस्था जमीन व्यवस्था, प्रकल्प वित्तपुरवठा आणि ऑपरेशन आणि देखभाल यासाठी इतर संस्थांशी भागीदारी करु शकते.

भाडेतत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मितीच्या अनुषंगाने प्रतिकृती 1 व 2 अंतर्गत सविस्तर तपशिल प्रधानमंत्री आवास योजना 2.0 योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये (pmay-urban.gov.in) ह्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

शासकीय यंत्रणेमार्फत AHP प्रकल्पांतर्गत सुविधा क्षेत्रात ARH प्रकल्प राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना म्हाडा प्राधिकरणांतर्गत राबविण्याचे प्रस्तावित असून या घटकाच्या अंमल बजावणी बाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**8. जमिनीची उपलब्धताः-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० च्या मार्गदर्शक सूचनेनुसार Land bank (उपलब्ध जमिनीची यादी) तयार करण्यासाठी खालील पर्यायांचा अवलंब करणे:-

- सर्व महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रातील परवडणाऱ्या घरांसाठी (Affordable Housing) राखीव भूखंड, तसेच सदर क्षेत्रांतर्गत असलेल्या महानगरपालिका/ नगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये परवडणाऱ्या घरांसाठी राखीव असलेल्या भूखंडांवर सर्वसामान्य जनतेसाठी घरे उपलब्ध करणे.
- ULC विनियमनांतर्गत उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जमिनी परवडणाऱ्या घरांसाठी उपलब्ध करून देणे.
- MIDC, Industrial Estate मध्ये काम करणाऱ्या कामगांराच्या निवासस्थांनासाठी जागा उपलब्ध करुन देणे.
- MSRDC च्या रस्ते व महामार्गालगतची जागा घरबांधणीसाठी उपलब्ध करुन देणे.
- परवडणारी घरे, सर्वसमावेशक गृहनिर्माण, ULC, तसेच जिल्हाधिकारी यांचे कडून प्राप्त होऊ शकणाऱ्या शासकीय जमिनींची तसेच MIDC व MSRDC यांचेकडून प्राप्त होणाऱ्या जमिनींची विस्तृत यादी करून LAND BANK तयार करणे.
- तसेच म्हाडा व MIDC यांच्याकडील गृहनिर्मितीसाठी उपलब्ध जागेंचीही यादी (LAND BANK) तयार करणे.
- परवडणाऱ्या घरांसाठी केंद्र शासन, राज्य शासन, शासकीय/निम-शासकीय संस्था यांच्याकडील उपलब्ध जमिनींची यादी (LAND BANK) तयार करणे.

**9. अधिमूल्य (Premium)/विकास शुल्क (Development Charges)भरण्यास सवलतः-**

- AHP घटकांतर्गत महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा इत्यादी नियोजन प्राधिकरण घेत असलेले Premium/Development Charges सुरुवातीला एकाच वेळी न घेता तीन टप्प्यात

घेण्यात यावे, त्यासाठी आवश्यकतेनुसार SBI Price Lending Rate (PLR) नुसार व्याज घेण्यास हरकत नाही.

- आराखडा मंजूरी (Plan Approval), कामाची सुरुवातीस मंजूरी देणे (Commencement Certificate) व भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) देताना अशा तीन टप्प्यात सदर Charges भरण्याची मुभा विकासकास देण्यात यावी.
- BLC घटकांतर्गत लाभार्थ्यांना Premium /Development Charges आकारण्यात येऊ नये.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी रस्ते, पाणीपुरवठा, वीज, मलनिस्सारण इत्यादी प्रमाणेच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 च्या मूलभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद ठेवावी.

**10. सवलतीः-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पुढील सवलतीदेय राहतील:-

| अ.क्र. | सवलती | |
|---|---|---|
| 1. | म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व निम-शासकीय संस्था या अंमलबजावणी करणा- या यंत्रणांना शासकीय जमीन उपलब्ध करणे | रुपये 1/- प्रति चौ.मी.दराने |
| 2. | गृहप्रकल्पांना मोजणी शुल्कामध्ये सवलत | 50% |
| 3. | EWS/LIG लाभार्थ्यांना सदनिकेच्या पहिल्या दस्त्याला मुद्रांक शुल्क | रुपये 1,000 फक्त |
| 4. | चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) | रहिवासी क्षेत्र -3.0 FSI हरीत/ना-विकास क्षेत्र-1.0 FSI |
| 5. | महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना - महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी अतिरिक्त अनुदान | रुपये 2 लक्ष प्रति घरकुल |
| 6. | AHP घटकांतर्गत खाजगी प्रकल्पांमधून (AHP-PPP) घर खरेदी | रिडीमेबल हाऊसिंग व्हाउचर |
| 7. | या योजनेतंर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांच्या घरकुल/सदनिका बांधकामांसाठी वाळू परिमाणानुसार अथवा जास्तीत जास्त 5 ब्रास पर्यंत विनामुल्य वाळू उपलब्ध करुन देणे | सर्व घटकांतील (BLC/AHP/ARH) आर्थिकदृष्ट्या दुर्बल (EWS) लाभार्थ्यांसाठी |

एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली 2020 (UDCPR-2020) व विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली 2034 (DCPR-2034) मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या (EWS) सर्व तरतुदी (उदा. पार्किंग सुविधा इत्यादी) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील घरकुलांना (EWS) (घरकुलांच्या क्षेत्रफळाचा विचार न करता) लागू राहतील.

**11.सुकाणू अभिकरण व त्यांचे कार्यः-**

- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत गृहनिर्माण विभाग हा सुकाणू अभिकरण (Nodal Agency) असेल.
- राज्यस्तरीय प्रकल्प व्यवथापन यंत्रणा (PMU) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० चे काम पाहील.
- सदर यंत्रणेअंतर्गत आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक व वित्त अनुभव असलेल्या शासन सेवेतील / शासन सेवेतून निवृत्त झालेल्या व्यक्तींची नियुक्ती करण्यात येईल.
- गुणवत्ता नियंत्रण शाखा (Quality Control Wing) तयार करण्यात येऊन त्यामध्ये MJP, PWD, TISS आणि IIT मुंबई मधील सदस्यांचा समावेश असेल.

- या योजनेंतर्गत EWS लाभार्थी आणि प्रकल्पांना समर्पित कर्जासाठी विविध बँका आणि वित्तीय संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याबाबत राज्यस्तरीय प्रकल्प व्यवथापन यंत्रणा (PMU) मार्फत कार्यवाही करण्यात येईल.
- आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करणे:- State Housing Integrated Portal (SHIP) ची निर्मिती करणे जे MIS, Bhuvan, PFMS आणि DBT इत्यादी पोर्टल्सच्या समांतर कार्यवाही करेल. तसेच, SHIP पोर्टल हे गृहनिर्माण विभागांतर्गत असलेल्या सर्व योजनांसाठी कार्यरत असेल.
- योजनेसाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची कार्यवाही गृहनिर्माण विभागामार्फत करण्यात येईल.
- अंमलबजावणी यंत्रणेकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावास राज्यस्तरीय मूल्यमापन समिती (SLAC) व राज्यस्तरीय मंजूरी आणि संनियंत्रण समिती (SLSMC) ची मंजूरी घेणे व सदर प्रस्ताव केंद्रस्तरीय मंजुरी आणि देखरेख समिती (CSMC) च्या मंजुरीसाठी पाठवण्याची कार्यवाही राज्यस्तरीय प्रकल्प व्यवथापन यंत्रणा (PMU) मार्फत करण्यात येईल.
- प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी देश विदेशातील प्रकल्पांना भेटी देऊन तेथे वापरण्यात आलेल्या आधुनिक तंत्राद्यानाचा वापर सदर योजनेसाठी करण्यात यावा.
- राज्यातील प्रत्येक महसुली विभागात प्रशिक्षणासाठी ५ कार्यशाळा आयोजित करण्यात येतील.
- सदर योजनेंतर्गत विविध पुरस्कारांचे आयोजन करण्यात यावे.

**12. राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU):-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) ची स्थापना करण्यात येत आहे. उप सचिव (गृनिधो-2), गृहनिर्माण विभाग अथवा शासनाने नामनिर्देशित केलेले अन्य समकक्ष अधिकारी हे सदर PMU चे मुख्यधिकारी राहतील व त्यांच्या नियंत्रणात PMU कार्यरत राहील. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 अंतर्गत स्थापन करण्यात आलेली राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) यामध्ये विलीन करण्यात येईल. उक्त यंत्रणा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत सुकाणू अभिकरणाच्या अधिनस्त कार्यरत राहील व मुख्याधिकारी, प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) हे अभियान संचालक (Mission Director) म्हणून कार्यरत राहतील.

1) प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणेमध्ये (PMLJ) प्रशासकीय, तांत्रिक व वित्त विषयक अनुभव असलेल्या पुढील पदांची निर्मिती करण्यात येईल:-

| क्र. | पद | पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | सह मुख्याधिकारी | 1 | शासकीय अधिकारी (scale S-23 and above) |
| 2 | उप मुख्याधिकारी | 1 | शासकीय अधिकारी (scale S-20 and above) |
| 3 | उपसंचालक (लेखा) | 1 | प्रतिनियुक्तीने वित्त विभागामार्फत |
| 4 | सहायक लेखाधिकारी | 2 | |
| 5 | अधीक्षक अभियंता | 1 | प्रतिनियुक्ती, उसनवारी तत्वावर, सेवानिवृत्त अधिकारी |
| 6 | कार्यकारी अभियंता | 1 | |
| 7 | उप अभियंता | 3 | |
| 8 | नगररचनाकार | 1 | |
| 9 | सहायक नगररचनाकर | 1 | |

2) राज्यस्तरीय व्यवस्थापन यंत्रणेसाठी SLTC/CLTC सारख्या तांत्रिक पदांसाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या (सामान्य प्रशासन विभाग) दि.05.10.2023 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सूचिबद्ध केलेल्या (Empanelled) सल्लागार कंपनींमार्फत मनुष्यबळ घेण्यात येईल.
3) सदर राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या थेट नियंत्रणात कार्यरत राहील.
4) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत राज्यात अंमलबजावणी यंत्रणांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व घटकांचे संनियंत्रण हे राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणेकडे (PMU) राहील.

**13. अंमलबजावणी यंत्रणाः-**

- या योजनेंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 मधील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था (ULB), महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत, म्हाडा, सिडको, सर्व प्रादेशिक विकास प्राधिकरण (RDAS) इत्यादी अंमलबजावणी यंत्रणा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 साठीही अंमल बजावणी यंत्रणा म्हणून काम पाहतील.
- त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत नव्याने अधिसूचित करण्यात येणाऱ्या यंत्रणाही अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कार्यरत राहतील.
- उपरोक्त सर्व अंमलबजावणी यंत्रणांचे संनियंत्रण उक्त राज्यस्तरीय प्रकल्प व्यवथापन यंत्रणा (PMU) मार्फत केले जाईल.
- गृहनिर्माण विभागामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत संपूर्ण योजनेचे संनियंत्रण प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) मार्फत केले जाईल.
- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत खालील विभाग/संचालनालय घटकनिहाय संनियंत्रण करतील:-

| **अ.क्र** | **घटक** | **कार्यक्षेत्र** | **संनियंत्रण विभाग** |
|---|---|---|---|
| 1 | BLC | संपुर्ण राज्य | नगर विकास विभाग/नगर परिषद संचालनालय |
| 2 | AHP | संपुर्ण राज्य | गृहनिर्माण विभाग |
| 3 | ARH | संपुर्ण राज्य | महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण |

- मागणी तसेच कामाच्या भौतिक प्रगतीच्या आधारे BLC घटकांतर्गत प्राप्त निधीचे वितरण नगरपरिषद संचालनालयामार्फत व ARH घटकांतर्गत प्राप्त निधीचे वितरण महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत PFMS प्रणालीद्वारे अथवा केंद्र/राज्य शासनामार्फत वेळोवेळी करण्यात येणारी प्रणालीमार्फत वितरित केले जाईल.
- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत MMR क्षेत्र तसेच महानगरपालिका हद्दीपासून 2 कि.मी.पर्यंत, नगरपालिका/नगरपरिषदेच्या हद्दीपासून 1 कि.मी.पर्यंत आणि सर्व प्रादेशिक नियोजन प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रामध्ये प्रकल्पांना मंजुरी दिली जाते. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 मध्ये या क्षेत्रांतर्गत प्रकल्पांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडा प्राधिकरणाने कार्यवाही केली. तथापि, नियोजन प्राधिकरण म्हाडा असले तरी, कचरा उचलणे, सफाई करणे, पाणी पुरवठा, रस्ते इत्यादी मूलभूत व दैनंदिन सुविधा म्हाडा पुरवू शकत नसल्यामुळे भविष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यासाठी या क्षेत्रातील प्रकल्पांकरिता नजीकच्या महानगरपालिका, नगरपालिका नगरपरिषद, प्रादेशिक नियोजन प्राधिकरण हे नियोजन प्राधिकारी राहतील.
- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शहरस्तरीय तांत्रिक सल्लागारांची (CLTC) नियुक्ती अंमलबाजवणी यंत्रणांनी करावी, सध्या कार्यरत असलेल्या CLTC मार्फत काम करून घेण्यास शासनाची हरकत नाही. तथापि, त्यांची कंत्राटीस्तरावर नियुक्ती विहित मार्गाने केली जाईल, याची सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी दक्षता घ्यावी, तसेच, त्यांना कायमस्वरुपी पदांचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत, याबाबतच्या लेखी सूचना/आदेश त्यांच्या नियुक्ती पत्रात व स्थानिक पातळीवरही निर्गमित करण्यात यावे.

**14. या योजनेंतर्गत दर निश्चिती:-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0 अंतर्गत दर निश्चितीबाबत निर्गमित करण्यात आलेले चाया मे दि.11.06.2018 व दि.26.11.2018 रोजीचे आदेश प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 साठीही लागू राहतील.

**15. जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (DLIC):-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून सदर योजना राबवणाऱ्या नगरपरिषदांवर संबंधित जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण असणे व या

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हाधिकारी यांचा सहभाग असणे आवश्यक आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (District-level Implementation Committee (DLIC)) गठित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अध्यक्ष व सदस्य | |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2 | सहायक संचालक, नगर रचना | सदस्य |
| 3 | मुख्याधिकारी, संबंधित विभागीय गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ | सदस्य |
| 4 | मुख्याधिकारी, संबंधित नगरपरिषद | सदस्य |
| 5 | शहर अभियंता, संबंधित नगरपरिषद | सदस्य |
| 6 | सहायक संचालक, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी, कार्यालय | सदस्य सचिव |

प्रत्येक जिल्ह्यासाठी वरीलप्रमाणे समिती स्थापन करण्याची कार्यवाही संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी करावी. तसेच जिल्हाधिकारी यांनी या समितीची बैठक प्रत्येक महिन्यात घेणे अनिवार्य राहील.

या समितीचा उद्देश हा मुख्यत्वे, "त्या-त्या जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजने (शहरी) २.० अंतर्गत नगरपरिषदांना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करुन प्रकल्पांच्या कामांना गती देणे" असा आहे. त्यासाठी समितीवर खालीलप्रमाणे जबाबदारी सोपविण्यात येत आहे:-

1) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व या आदेशातील तरतुदीनुसार तातडीने प्रकल्प अहवाल तयार करुन परिपूर्ण प्रकल्प अहवाल सुकाणू अभिकरण (गृहनिर्माण विभाग) कडे विनाविलंब सादर होण्याच्या दृष्टीने सर्व बाबींची पूर्तता सत्वर होईल, हे सुनिश्चित करणे.
2) या योजनेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासकीय जमिनीची मागणी केल्यास, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र.जमीन-2016/प्र.क्र.213/ज-1, दि.19 सप्टेंबर-2016 मधील तरतूदी नुसार जमीन उपलब्ध करुन देण्यासंबंधी कार्यवाहीचा आढावा घेणे व यासंबंधी कार्यवाही विना विलंब होईल, हे सुनिश्चित करणे.
3) प्रकल्पाचा अभिन्यास (Layout) नकाशा तयार करुन त्यास स्थानिक नियोजन प्राधिकरणाची मान्यता विनाविलंब मिळेल यासाठी आवश्यक बाबींचा आढावा घेणे व त्याकरिता पाठपुरावा करणे.
4) या योजनेचे प्रस्ताव तयार करतानाच, प्रस्तावित योजनेसाठी लागणाऱ्या सामायिक सुविधा जसे पाणी, वीज, मलनिःसारण, रस्ते या व इतर सुविधा पुरविण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याने, त्यासंबंधी कार्यवाहीची सुनिश्चित करणे.
5) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 साठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पात तरतूद सुनिश्चित करणे.
6) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) ने मंजूरी दिल्यानंतर विहित कालावधीमध्ये योजना पूर्ण करुन अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित अंमलबजावणी यंत्रणेव्दारे सुकाणू प्राधिकरणा कडे सादर होतील, हे सुनिश्चित करणे.
7) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत महानगरपालिका हद्दीपासून 2 कि.मी.पर्यंत, नगरपालिका/नगरपरिषदेच्या हद्दीपासून 1 कि.मी.पर्यंत आणि सर्व प्रादेशिक नियोजन प्राधिकरणा च्या अधिसूचित क्षेत्रामध्ये प्रकल्पांना मंजुरी दिली जाते. त्यासाठी या क्षेत्रातील प्रकल्पांकरिता नजीकच्या महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद, प्रादेशिक नियोजन प्राधिकरण हे नियोजन प्राधिकारी राहतील. तथापि, यासंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास सदर समितीने दिलेला निर्णय अंतिम राहील.

**16. राज्यस्तरीय मूल्यमापन समिती (SLAC):-**

महाराष्ट्र शासनाच्या अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय मूल्यमापन समिती (SLAC) चे सदस्य:-

| क्र. | अध्यक्ष व सदस्य | |
|---|---|---|
| 1 | अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय | अध्यक्ष |
| 2 | प्रधान सचिव, नगर विकास 2 | सदस्य |
| 3 | प्रधान सचिव, उर्जा विभाग | सदस्य |
| 4 | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई | सदस्य |
| 5 | आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय | सदस्य |
| 6 | उप सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| 7 | अभियान संचालक (Mission Director), प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 | सदस्य सचिव |

आवश्यकतेनुसार अध्यक्ष, विशेष निमंत्रण म्हणून इतर अधिकाऱ्यांना राज्यस्तरीय मूल्यमापन समितीच्या बैठकीमध्ये समाविष्ट करुन घेऊ शकतील.

**राज्यस्तरीय मूल्यमापन समितीची कार्यकक्षा व अधिकार :-**

1) मुख्याधिकारी, राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU) नागरी स्वराज्य संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करुन असे प्रस्ताव राज्यस्तरीय मुल्यमापन समितीच्या बैठकीसमोर सादर करणे.
2) सदर प्रस्तावावरील टिप्पणी व शिफारशींसह मूल्यमापन अहवाल राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीला सादर करणे.
3) सदस्य सचिवांनी सुकाणू अभिकरण स्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरिता एक कक्ष निर्माण करावा व छाननी करुन त्याचे सादरीकरण समितीसमोर सादर करणे.
4) प्रकल्पांच्या दर सुधारणेच्या प्रस्तावांची छाननी करून राज्यस्तरीय मंजूरी आणि संनियंत्रण समिती (SLSMC) ला सादर करणे.
5) सर्व घटकांतर्गत महाराष्ट्र निवारा निधीतून वितरित करावयाचा निधी SLAC च्या मान्यतेनंतर वितरित करण्यात येईल.

**17. राज्यस्तरीय मंजुरी आणि संनियंत्रण समिती (SLSMC) :-**

मुख्य सचिव यांच्या अधक्ष्यतेखाली राज्यस्तरीय मंजुरी आणि संनियंत्रण समिती (SLSMC) चे सदस्य :-

| क्र. | अध्यक्ष व सदस्य | |
|---|---|---|
| 1 | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| 2 | अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| 3 | अमुस/प्रस/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| 4 | अमुस/प्रस/सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| 5 | अमुस/परस/सचिव, नगर विकास विभाग (नवि-1) | सदस्य |
| 6 | अमुस/परस/सचिव, नगर विकास विभाग (नवि-2) | सदस्य |
| 7 | अमुस/परस/सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| 8 | अमुस/परस/सचिव, महसुल व वन विभाग | सदस्य |
| 9 | अमुस/परस/सचिव, उदयोग विभाग | सदस्य |
| 10 | अमुस/परस/सचिव, उर्जा विभाग | सदस्य |
| 11 | अमुस/परस/सचिव, पाणीपरवठा विभाग | सदस्य |
| 12 | अमुस/परस/सचिव, कामगार विभाग | सदस्य |
| 13 | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकरी, म्हाडा, मुंबई | सदस्य |
| 14 | संयोजक, स्टेट लेव्हल बँकर्स समिती | सदस्य |
| 15 | अभियान संचालक (Mission Director, PMAY(U)2.0 | सदस्य सचिव |

याशिवाय समितीस आवश्यक वाटेल त्यावेळी इतर निमंत्रितांना विशेषरित्या समितीच्या बैठकीस बोलावू शकतील.

**समितीची कार्यकक्षा व अधिकारः-**

1. योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० या अभियानाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी समितीवर असेल.
2. या योजने अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणेनी तयार केलेल्या शहरस्तरीय घरकुलाच्या वार्षिक आराखड्यास मंजूरी देणे.
3. विविध घटकांतर्गत सादर होणाऱ्या तपशीलवार प्रकल्प प्रस्तावास मान्यता देणे.
4. वार्षिक गुणवत्ता संनियंत्रण आराखड्यास मान्यता देणे.
5. राज्याद्वारे शहरांकरिता मान्य करण्यांत आलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेणे.
6. अभियानाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.
7. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता इतर काही संबंधित बाबी उपस्थित झाल्यास त्या विचारात घेण्यांत याव्यात.
8. दर सुधारणेचे प्रस्ताव मंजूर करणे.
9. घरकुलांमध्ये कपात/घरकुले रद्द करणे/नावात बदल इत्यादी प्रस्तावांना मान्यता देणे.
10. या योजनेंतर्गत मंजूर प्रस्तावांची CSMC ची मान्यता घेण्याबाबत शिफारस करणे.

**18. AHP प्रकल्पांतर्गत TPQMA व Social Audit संस्थांची नियुक्तीः-**

1) सद्यस्थितीत संपूर्ण राज्यासाठी केवळ एक TPQMA यंत्रणा व एक Social Audit यंत्रणा कार्यरत आहे. केंद्र हिश्याचा निधी वितरीत करताना दुसऱ्या हप्त्यासाठी संबंधित प्रकल्पाचे TPQMA करणे आवश्यक आहे. तसेच, केंद्र हिश्याच्या तिसऱ्या व अंतिम हप्त्यासाठी संबंधित प्रकल्पाचे TPQMA तसेच Social Audit करणे अत्यावश्यक आहे. तथापि, संपूर्ण राज्यात केवळ एक TPQMA यंत्रणा व एक Social Audit यंत्रणेव्दारे काम केल्यास प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा वेग राखता येणार नाही.
2) त्याअनुषंगाने प्रत्येक महसूल विभागाला किमान 1 TPQMA व 1 Social Audit यंत्रणा निश्चित करण्याकरीता राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.
3) निविदा प्रक्रिया राबवून नियमांनुसार प्रत्येक महसूल विभागाला किमान 1 TPQMA व 1 Social Audit यंत्रणेची नियुक्ती करण्यात यावी.

**19. अनुदानः-**

| अ.क्र. | तपशील | घटक | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अनुदान | BLC | रु.1.5 लक्ष प्रति घरकुल | | अर्थसंकल्पीय तरतुदीतुन |
| | | AHP | | | |
| | | ARH | -- | -- | |
| 2 | Capacity Building (HR, IEC, इत्यादी) | | | राज्य शासनाच्या एकुण अनुदानाच्या 5 टक्के | |
| 3 | नाविन्यपुर्ण बांधकाम तंत्रज्ञान वापरण्यासाठी TIG अनुदान | ARH (प्रतिकृती-2) | रु.3000 प्रति चौ.मी | रुपये 2000 प्रति चौ.मी | |
| | | AHP | रु.1000 प्रति चौ.मी | रुपये 500 प्रति चौ.मी | महाराष्ट्र निवारा निधीतुन |
| 4 | प्रकल्पांतर्गत बांधकाम व्यतिरिक्त नाविन्यपुर्ण कल्पना राबविल्यास | AHP & ARH | | कमाल रुपये 500 प्रति घरकुल | |
| 5 | पर्यावरण समातोल राखण्यासाठी ग्रीन बिल्डिंग साठीच्या Griha, EDGE, ECBC इत्यादी संस्थेचे प्रमाणपत्र असल्यास | AHP & ARH | | कमाल रुपये 500 प्रति चौ.मी | |
| 6 | सौर अनुदान (सामुहिक वापर क्षेत्रात व छतांवर सौर ऊर्जा प्रणालीचा वापर) | AHP & ARH | -- | 1) 1,000 पेक्षा जास्त घरकुलांच्या प्रकल्पासाठी-रुपये 12,000 प्रति घरकुल 2)1,000 घरकुलापर्यंतच्या प्रकल्पासाठी – रुपये | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 10,000 प्रति घरकुल | |
| | सौर अनुदान (घरकुलाच्या छता वर) | BLC | | रुपये 5000 प्रति घरकुल | |
| 7 | PMU स्थापना (मुलभुत सुविधा, कार्यालय, पगार) | | | रुपये 25 कोटी (एकत्रितपणे) | |
| 8 | राज्यस्तरीय पोर्टलची स्थापना (State Housing Integrated Portal -SHIP) | | | रुपये 10 कोटी (एकत्रितपणे) | |
| 9 | PMAY(U)2.0 अंतर्गत द्यायचे विविध वार्षिक पुरस्कार | | | अनुदानाच्या 2 टक्के रुपये 40 कोटी (एकत्रितपणे) | |

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 च्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार capacity building अंतर्गत सर्व IEC, TPQMA, Social Audit, State Level Technical Cell (SLTC)/City Level Technical Cell (CLTC), Trainings/Workshops/ Study/ Exposure Visits, IEC, Social Audit, Third Party Quality Monitoring (TPQM), Information Technology, Geo-tagging, Administrative & Other Expenses (A&OE), activities related to TISM and Research/Documentation इत्यादी उपक्रमासाठी (activity) नमूद मानधन/शुल्क अदा करण्यात येईल.

**20) प्राथमिक सर्वेक्षण:-**

सदर योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांचे प्राथमिक सर्वेक्षण करून त्यांची स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय यादी अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्यामार्फत पुढील ३ महिन्यात पूर्ण करण्यात येईल. तसेच, यासाठी येणारा खर्च महाराष्ट्र निवारा निधीतून करण्यात येईल.

**21) विविध केंद्रीय व राज्यस्तरीय योजनांचा एकत्रित लाभ (Convergence of schemes)**

अमृत 2.0 स्मार्ट सिटी अभियान, स्वच्छ भारत अभियान (SBM-U 2.0), राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (National Urban Livelihoods मिशन) (डे-NULM), प्रधानमंत्री विश्वकर्मा (PM Vishwakarma), राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम), प्रधानमंत्री स्वनिधी (PM SVANidhi), प्रधानमंत्री सूर्यघरः मुफ्त बिजली योजना (PM-Suryghar), आयुष्यमान भारत, उज्ज्वला योजना, उजाला योजना, सुधारित रितिण क्षेत्र योजना (RDSS) इत्यादी केंद्र पुरस्कृत योजना तसेच त्यानुषांगिक राज्य पुरस्कृत योजनांचा लाभ प्रधानमंत्री आवास योजनेस (शहरी) 2.0 लागू करण्यात (Convergence of schemes) यावा.

**22)** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.० योजनेच्या सामाजिक परिणाम/प्रभाव (social impact) चा अभ्यास करण्यासाठी IT, TISS यांसारख्या देशातील नावाजलेल्या शासकीय/निम शासकीय / खाजगी यंत्रणेमार्फत करण्यास व यासाठी येणारा खर्च महाराष्ट्र निवारा निधीतून करण्यात यावा.

**23) महाराष्ट्र निवारा निधीतून करावयाचा खर्च :-**

या शासन निर्णयामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत महाराष्ट्र निवारा निधीतून दर्शविण्यात आलेला खर्च करण्यासाठी आवश्यक निधी बाबतचे आदेश गृहनिर्माण विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील. सदर आदेशात नमूद करण्यात आलेला निधी संबंधित बैंक खात्यामध्ये म्हाडा प्राधिकरणाने सत्वरं जमा करावा.

या योजनेसाठी महाराष्ट्र निवारा निधी मध्ये किमान रुपये १,५००/- कोटी इतका निधी राखीव ठेवण्यात यावा, तसेच महाराष्ट्र निवारा निधीतून या योजनेकरिता त्वरित निर्णय उपलब्ध करून देण्यात यावा.

**24) अर्थसंकल्पीय तरतुदः-**

या योजनेंतर्गत वर प्रस्तावित करण्यात आलेला महाराष्ट्र निवारा निधीतील खर्च बगळता अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येण्याऱ्या खर्चासाठी केंद्र व राज्य हिश्याकरिता तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अंतर्गत प्राप्त होणाऱ्या केंद्र व राज्य हिश्याच्या निधीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात येऊन त्याअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० या योजनेचा खर्च टाकण्यात यावा.

तरि उपरोक्त प्रमाणे निर्गमित शासन निर्णया प्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.00 ची छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत अंमलबजावणी होणेसाठीच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1806/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.पंतप्रधान महोदयांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कत प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.15.10.2024 नुसार सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद 1 ते 24 बाबी अंतर्गत आवश्यकते नुसार हि योजना राबविण्यासाठी नियमाप्रमाणे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1807/2025:- (पशुसंवर्धन विभाग) (दि.05.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.शेख रसुल शेख छोटू, मजुर, पशुसंवर्धन विभाग, मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या मुलाच्या नामे शेख मोहसिन शेख रसुल (अपघात) या आजारावर उपचारासाठी गॅलॅक्सी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उल्कानगरी छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.8,03,978/- (अक्षरी रक्कम रुपये आठ लक्ष तीन हजार नऊशे अठ्ठ्याहत्तर फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (अपघात) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला र.रु.8,03,978/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.79,636/- इतकी असुन 5% र.रु.40,198/- इतकी असुन एकुण र.रु.6,11,709/- संबंधीतास द्यावयाचे आहे.

परंतु सदरील रुग्णालय हे महाराष्ट्र शासन यादीत नसल्यामुळे संबंधीतास र.रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) पर्यंत मिळते त्यामधून 5 टक्के र.रु.5000/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतून वजा करुन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकीय परतावा स्वरुपात अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संबंधीताने गॅलॅक्सी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उल्कानगरी छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वत्रिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/ प्र.क्र.333 /11/राकवि-2, मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुगणालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.शेख रसुल शेख छोटू यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95,000/- संबंधीतास अदा करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1807/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.शेख रसुल शेख छोटू यांनी त्यांच्या स्वत:च्या मुलाच्या नामे शेख मोहसिन शेख रसुल (अपघात) या आजारावर उपचारासाठी गॅलॅक्सी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उल्कानगरी छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. परंतु सदरील रुग्णालय हे महाराष्ट्र शासन यादीत नसल्यामुळे संबंधीतास र.रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) पर्यंत मिळतात. त्यामधुन 5 टक्के र.रु.5000/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञये रक्कमेतून वजा करुन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकीय परतावा स्वरुपात अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1808/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.107, विटखेडा अंतर्गत विलो-67 सोसायटी समोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.30,57,581/-चे अंदाजपत्रक SSR 2022-23 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे.

उक्त नमुद भागातील रस्ता हा मातीचा असल्यामुळे नागरीकांना रस्त्याची मुलभुत सोय उपलब्ध करण्यासाठी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकास रस्त्याचे मजबुतीकरण करून कॉंक्रीटीकरण करणेचे काम प्रस्तावित आहे.

सदरील कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 अंतर्गत पृष्ठ क्र.E-28 वरील मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे (रस्ते) या लेखाशिर्ष अंतर्गत अ.क्र.03(i) वर र.रु.1870.00 लक्ष तरतुद मधुन करता येईल.

करीता, वॉर्ड क्र.107 विटखेडा अंतर्गत विलो-67 सोसायटी समोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.30,57,581/- चा अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1808/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.107 विटखेडा अंतर्गत विलो-67 सोसायटी समोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.30,57,581/- चा अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1809/2025:-</u> (आस्थापना-2 विभाग)** **(दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/साप्रवि/2024/ 1291 दि.10.07.2024 रोजीच्या आदेशान्वये दि.31.05.2024 ते दि.26.11.2024 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.08 | र.रु.424/- |

तसेच सातारा-देवळाई ग्रामपंचायत येथुन औरंगाबाद महानगरपालिकेत समाविष्ठ करण्यात आलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 2. | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | र.रु.424/- |
| 3. | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | र.रु.424/- |
| 4. | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | र.रु.424/- |
| 5. | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.08 | र.रु.424/- |

करीता उपरोक्त प्रमाणे एकुण (05) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.29.11.2024 ते दि.27.05.2025 पर्यंत 06 (सहा) महिन्याकरीता (180 दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1809/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, करीता उपरोक्त प्रमाणे एकुण (05) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.29.11.2024 ते दि.27.05.2025 पर्यंत 06 (सहा) महिन्याकरीता (180 दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीच्या विषयास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1810/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.07, मयुरपार्क अंतर्गत ऑडीटर सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटिंग करणे बाबतचा (पाण्याची टाकी रोड) प्रस्ताव आहे.

करीता, महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाने मंजुर रेखांकनास मान्यता दिलेल्या वॉर्ड क्र.07 मयुरपार्क अंतर्गत ऑडीटर सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंकिटिंग करणेच्या कामाचे अंदाज पत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.49,82,500/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25

मधील लेखाशिर्ष मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे (रस्ते) पान क्र. E-28 (Other Capital Works) अ. क्र.03 वा उपलब्ध निधीची तरतुद र.रु.18.70 कोटी मधुन हाती घेता येईल.

तरी सदरील कामाच्या र.रु.49,82,500/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1810/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.07, मयुरपार्क अंतर्गत ऑडीटर सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटिंग करणे बाबतचा (पाण्याची टाकी रोड) या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.49,82,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1811/2025:- (शिक्षण विभाग) (दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार खालील दर्शविलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या 20-25 पेक्षा कमी असल्याने व सदरील महानगरपालिकेच्या शाळा या भाड्याच्या इमारतीत असल्याने त्या बंद करुन सदरील शाळांचे विद्यार्थी व शिक्षकवर्ग यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करणे आवश्यक आहे. सदरील शाळा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | शाळेची इमारत मनपाची मालकीची/भाड्याची इमारत आहे/नाही | समायोजन करण्यात येणाऱ्या शाळेचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.शा.हनुमाननगर | इमारत भाडेतत्वावर | प्रा.शा.विश्रांतीनगर |
| 2. | प्रा.शा.भारतनगर नं.1 | इमारत भाडेतत्वावर | प्रा.शा.विश्रांतीनगर |
| 3. | प्रा.शा.शताब्दीनगर | इमारत भाडेतत्वावर | प्रा.शा.सिडको एन-11 |

नमुद शाळांचे समायोजन हे विद्यार्थी संख्या सरासरी पेक्षाही अत्यंत कमी असल्याने नजिकच्या शाळेमध्ये समायोजन करण्यासाठी वरील शाळांचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1811/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरील शाळांची विद्यार्थी संख्या सरासरी पेक्षाही अत्यंत कमी असल्याने आणि सदरील शाळा या भाड्याच्या इमारतीत असल्याने नजिकच्या शाळेमध्ये समायोजन करण्या बाबतचा ठराव मंजुर करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1812/2025:- (शिक्षण विभाग) (दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती वंदना विक्रम वडते, सहशिक्षिका, जिल्हा परिष्द प्राथमिक शाळा, मोंढा गेवराई केंद्र जा.व.गेवराई, ता.गेवराई, जि.बीड या शाळेवर उपशिक्षिका म्हणुन सद्यस्थितीमध्ये कार्यररत असुन महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण विभागाच्या आस्थपानेवर खुला प्रवर्गात दुबार एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवा वर्ग करुन घेण्याची विनंती केली आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी श्रीमती वंदना विक्रम वडते, सहशिक्षिका यांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करीता, श्रीमती वंदना विक्रम वडते, सहशिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोंढा गेवराई केंद्र जा.व.गेवराई, ता.गेवराई, जि.बीड यांना महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर खुला प्रवर्गात एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवा वर्ग करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1812/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती वंदना विक्रम वडते, सहशिक्षिका, जिल्हा परिष्द प्राथमिक शाळा, मोंढा गेवराई केंद्र जा.व.गेवराई, ता.गेवराई, जि.बीड यांना दुबार एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थपानेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1813/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक:सिआयडी-3324/प्र.क्र.231/नवि-10 दि.05.02.2025 नुसार केंद्र शासनाच्या 'राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य सन 2024-25 या योजनेच्या भाग-5 औद्योगिक वाढीसाठी चालना' अंतर्गत राज्य शासनास भांडवली गुंतवणुक प्रकल्पांसाठी 50 वर्षाच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात विशेष आर्थीक सहाय्य प्रदान करण्यात येऊन महानगरपालिका क्षेत्रात विविध कॉंक्रीट/डांबरी रस्त्यांची कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस र.रु.40.00 कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहराची वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारीकरण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळुज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक, पर्यटन, व्यावसायीक दृष्ट्या शहर व शहरालगत वाहतुक रहदारी वाढली आहे. यामुळे औद्योगिक वाढीसाठी चालना देणारे महानगरपालिका हद्दीतील विकास योजना रस्ते विकसीत करणे गरजेचे ठरत असल्यामुळे प्रामुख्याने खालील यादीत दर्शविल्याप्रमाणे उक्त नमुद योजनेअंतर्गत निधी वितरीत होणे करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| 1. | गट नं.38 पैकी विनायकनगर, ईटखेडा येथील मंजुर रेखांकनातील रस्त्यांचे कॉंक्रीटकरण करणे. | 1,02,34,487.00 |
| 2. | गट क्र.112 पैकी रवीनगर, नक्षत्रवाडी येथील मंजुर रेखांकनातील रस्त्यांचे कॉंक्रीटकरण करणे. | 1,56,98,513.00 |
| 3. | गट क्र.05/पैकी उत्कर्ष हौसिंग सोसायटी नक्षत्रवाडी येथील मंजुर रेखांकनातील रस्त्यांचे कॉंक्रीटकरण करणे. | 1,83,03,012.00 |
| 4. | ईटखेडा येथील नाथपुरम ते 40 ग्रीन पर्यंतच्या 24 मी.व 30 मी. विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणे बाबत | 3,97,45,934.00 |
| 5. | वॉर्ड क्र.13 भीमनगर (उत्तर) अंतर्गत साकेतनगर, पेठेनगर मंजुरी रेखांकनातील रस्त्यांचे कॉंक्रीटकरण करणे. | 79,78,115.00 |
| 6. | वॉर्ड क्र.13 भीमनगर (उत्तर) अंतर्गत पेठेनगर येथील 15 मी.रुंद विकास योजना रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटकरण करणे बाबत | 3,09,38,997.00 |
| 7. | शेळी, मेंढी पाल ते गट क्र.62 पडेगाव ते गट क्र.63 पडेगाव (L Shape) पर्यंत रस्ता तयार करणे | 7,95,59,191.00 |
| 8. | गट क्र.-47 पडेगाव ते गट क्र.-61 पडेगाव ते 59 पडेगाव (L Shape) पर्यंत रस्ता तयार करणे | 5,01,28,955.00 |
| 9. | वॉर्ड क्र.13 भीमनगर भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत जेतवन कॉलनी येथे पोहोच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणे करणे बाबत | 55,13,753.00 |
| 10. | पडेगाव सबस्टेशन ते सफारी पार्क या 30 मी.रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे | 14,18,80,359.00 |
| | **एकुण** | **39,99,81,316.00** |

सबब, उक्त नमुद यादीतील एकुण 10 कॉंक्रीट/डांबरी रस्ते कामांचे प्रचलित दरसुची नुसार अं.प.र.रु.39,99,81,316/- चे तयार करण्यात आले असुन यास उक्त नमुद प्रमाणे शासन निधी वितरीत होणे करीता प्रशासकीय मान्यतेस्तव व केंद्र शासनाकडून मंजुर निधी र.रु.40.00 कोटीचा निधी राज्य शासनाकडून महानगरपालिकेस वितरीत होणे बाबत प्रस्ताव पाठविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1813/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य सन 2024-25 या योजनेच्या भाग-5 औद्योगिक वाढीसाठी चालना अंतर्गत' महानगरपालिका क्षेत्रात विविध काँक्रीट/डांबरी रस्त्यांची कामे करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस र.रु.40.00 कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्याती आली आहे.

या अनुषंगाने प्रस्तावात नमुद यादीतील एकुण 10 काँक्रीट /डांबरी रस्ते कामांचे प्रचलित दरसुची नुसार अंदाजपत्रक र.रु.39,99,81,316/- चे तयार करण्यात आले असुन यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तसेच केंद्र शासनाकडून मंजुर निधी 40.00 कोटीचा निधी राज्य शासनाकडून महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेकरीता प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येते. तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1814/2025:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.9 कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.103 अंतर्गत रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी.भागातील विविध रस्त्यांचे कॉक्रीटींग करणेच्या कामाचे र.रु.1,13,79,018/- चे अंदाज पत्रक SSR 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकात रेल्वे स्टेशन भागातील सदर एम.आय.डी.सी.भागात जड वाहने व इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने या भागातील रस्त्यांवर जागोजागी खड्डे असल्याने वाहतुकीस त्रास होऊन छोटे-मोठे अपघात होत असल्याने सदरील भागातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणेची मागणी औरंगाबाद मर्यादीत औद्योगिक वसाहत (मर्यादीत) यांनी केलेली असल्याने तसेच सदरील औद्योगिक क्षेत्र हे रस्ते, दिवाबत्ती, ड्रेनेज इ.देखभाल दुरुस्तीसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे सन-1987 साली हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदर भागातील विविध रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे प्रस्तावीत आहे. सदरील प्रस्तावीत रस्त्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 अंतर्गत पृष्ठ क्र.Zone-09-Other Capital Works. P.NO.3 अ.क्र.3(i) वरील मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत अ.क्र.49 वर र.रु.187.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे.

करीता उक्त प्रमाणे र.रु.1,13,79,018/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1814/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.9 कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.103 अंतर्गत रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी.भागातील विविध रस्त्यांचे कॉक्रीटींग करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1815/2025:-** **(यांत्रिकी वाहने विभाग)** **(दि.12.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-208 प्रामणे रस्त्यांच्या कडेला किंवा रस्त्यावर इतर वाहनांना व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही यासाठी प्रतिबंध करण्याचा महानगरपालिकेला अधिकार आहे. त्यानुषंगाने रस्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर ट्राफिक वार्डन (माजी सैनिक) यांच्या सहाय्याने दंडात्मक कारवाई करण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1677 दि.14.10.2024 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. सदरील ठरावानुसार खालील प्रमाणे महानगरपालिकेची रॉयल्टी रक्कम भरणा करुन मनुष्यबळासह वाहने पुरवठा करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | विवरण | मनपा रॉयल्टी |
|---|---|---|
| 1. | दुचाकी उचलणे | र.रु.200/- |
| 2. | हातगाडी उचलणे | र.रु.200/- |
| 3. | चारचाकी टो करणे | र.रु.1000/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | चारचाकीस जामर लावणे | र.रु.500/- |

निविदेच्या दुसऱ्या वेळी 02 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असुन पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विवरण | मे.ॲक्टीव्ह मोटर्स | मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस |
|---|---|---|---|
| 1. | दुचाकी उचलणे | र.रु.300/- | र.रु.400/- |
| 2. | हातगाडी उचलणे | र.रु.300/- | र.रु.350/- |
| 3. | चारचाकी टो करणे | र.रु.4000/- | र.रु.1500/- |
| 4. | चारचाकीस जामर लावणे | र.रु.500/- | र.रु.550/- |

उपरोक्त नुसार मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असुन प्राप्त न्युनतम दर व मंजुर मनपा रॉयल्टी रक्कम समाविष्ठ करुन खालील प्रमाणे द्रव्यदंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | विवरण | एकुण द्रव्यदंड |
|---|---|---|
| 1. | दुचाकी उचलणे | र.रु.500/- |
| 2. | हातगाडी उचलणे | र.रु.500/- |
| 3. | चारचाकी टो करणे | र.रु.5000/- |
| 4. | चारचाकीस जामर लावणे | र.रु.1000/- |

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-208 नुसार रस्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी मनुष्यबळासह वाहने पुरवठा करणे या करीता मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांचे तुलनात्मक दृष्ट्या न्युनतम दर स्विकृत करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1815/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-208 नुसार रस्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी मनुष्यबळासह वाहने पुरवठा करणे या करीता मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांचे दर स्विकृत करण्यास तसेच मनपा रॉयल्टी समाविष्ठ करुन खालील प्रमाणे द्रव्यदंड आकारण्यास मान्यता देण्यात येते.

| अ.क्र. | विवरण | मे.ॲक्टीव्ह मोटर्स | मनपा रॉयल्टी | एकुण द्रव्यदंड |
|---|---|---|---|---|
| 1. | दुचाकी उचलणे | र.रु.300/- | र.रु.200/- | र.रु.500/- |
| 2. | हातगाडी उचलणे | र.रु.300/- | र.रु.200/- | र.रु.500/- |
| 3. | चारचाकी टो करणे | र.रु.4000/- | र.रु.1000/- | र.रु.5000/- |
| 4. | चारचाकीस जामर लावणे | र.रु.500/- | र.रु.500/- | र.रु.1000/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1816/2025:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.14.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत झोन क्र.02 मधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला फुटपाथ करणे/पेव्हर बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची (एस.एस.आर.) सन 2022-23 नुसार र.रु.56,83,941/- चे तयार करुन मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.782/23 दि.11.05.2023 नुसार मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाचा कार्यादेश मे.गुदगे कन्स्ट्रक्शन यांना अं.प.दरापेक्षा 27.50 टक्के कमी दराने देण्यात आल्यानुसार काम प्रगतीपथावर आहे. सदर काम प्रस्तावीत ठिकाणी भागश: पुर्ण झालेला आहे व उर्वरित कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची जलवाहिनीचे काम बाकी असल्यामुळे सदर काम थांबविलेले आहे.

सदर काम राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत मुख्यत: रस्ता धुळीकरण मुक्त होऊन परिसर स्वच्छ राहण्याच्या दृष्टिने करण्यात येत आहे. त्यानुषंगाने महात्मा फुले चौक ते एस.बी.कॉलेज या

मुख्य रस्त्यालगत महानगरपालिकेचे सुलभ शौचालयाचे परिसर स्वच्छ व धुळीकण मुक्त ठेवण्याच्या दृष्टिने प्रस्तावीत करण्यात आले आहे. सदर भग मुळ प्रस्तावीत केलेल्या कामाच्या ठिकाणाच्या संलग्न भाग आहे. त्यामुळे कामामध्ये अंशत: स्थळ बदल करावा लागत आहे. तथापि, सदर काम हे मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादित करण्यात येणार आहे. त्यास अधिन राहून सदर कामामध्ये अंशत: स्थळ बदल करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या समोर ठेवण्याच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1816/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत झोन क्र.02 मधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला फुटपाथ करणे/पेव्हर बसविणेच्या कामात महात्मा फुले चौक ते एस.बी.कॉलेज या मुख्य रस्त्यालगत महानगरपालिकेचे सुलभ शौचालयाचे परिसर स्वच्छ व धुळमुक्त ठेवण्याच्या दृष्टिने अंशत: स्थळ बदल करण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1817/2025:-** **(कार्यकारी अभियंता पापु विभाग)** **(दि.17.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा जायकवाडी व शहर यांत्रिकी विभागाअंतर्गत असलेल्या विविध पंपगृह येथील निरुपयोगी/भंगार साहित्याचे लिलावाबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांची दि.26.07.2023 रोजी मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार शहरातील विविध पंपगृहावरील व जायकवाडी पाणीपुरवठा (यां) विभागाअंतर्गत विविध पंपगृहातील निरुपयोगी/भंगार साहित्य फारोळा पंपगृह येथे एकत्रित जायकवाडी पाणीपुरवठा (यां) विभागाअंतर्गत विविध पंपगृहातील निरुपयोगी/भंगार साहित्य फारोळा पंपगृह येथे एकत्रित करण्यात आले. जमा केलेले साहित्य मुल्यांकन व पुढील लिलाव प्रक्रियेसाठी साहित्याच्या प्रकारानुसार लॉट मध्ये वर्गीकरण करण्यात आले. निरुपयोगी/भंगार साहित्याचे मुल्यांकन करण्यासाठी शासकीय मान्यता प्राप्त मुल्यांकन कर्ता (शासकीय मुल्यांकनकर्ता) मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएट्स, पुणे यांची मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली त्या अनुषंगाने मुल्यांकन कर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएट्स, पुणे यांनी प्रत्यक्षस्थळी पाहणी करुन निरुपयोगी/भंगार साहित्याचे दर दि.10.10.2024 रोजी सादर केले. सदरील प्राप्त दर अंतिम करण्यासाठी याकामी गठीत निर्लेखन समितीची दि.03.12.2024 रोजी मा.अतिरीक्त आयुक्त-1 यांच्या अध्यक्षतेखाली फारोळा पंपगृह येथे पाहणी व बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मुल्यांकन कर्ताकडून प्राप्त निरुपयोगी/भंगार साहित्याच्या दराबाबत समिती अध्यक्ष व सर्व समिती सदस्य यांच्यमध्ये चर्चा हाऊन सध्या बाजारात चालु असलेल्या दराबाबत माहिती प्राप्त करुन घेऊन दोन्ही दरामधील तुलना करुन पुढील बैठकीत निरुपयोगी/भंगार साहित्याचे दर अंतिम करण्यात येतील. यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे निर्लेखन समितीच्या बैठकीत सर्वानुमते सुचविल्यानुसार भंगार साहित्याचे सध्या बाजारात चालू असलेल्या दराबाबत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आाले. सदर दरपत्रके व महानगरपालिकेने नियुक्त केलेले शासनमान्य मुल्यांकनकर्ता यांच्याकडून प्राप्त मुल्यांकन याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. तुलनात्मक मुल्यांकनावर चर्चा करुन अंतिम करण्यासाठी अथवा निर्लेखन समिती निश्चित करेल ते दर अंतिम करण्यासाठी निर्लेखन समितीची दि.10 डिसेंबर 2024 रोजी अतिरीक्त आयुक्त-1 यांचे दालन येथे बैठक संपन्न झाली. समिती अध्यक्ष व सर्व सदस्यांनी एकुण 16 प्रकारच्या सर्व भंगार साहित्याच्या दरासंदर्भात तलुनात्मक तक्त्याचा आढावा घेऊन समिती अध्यक्ष व सदस्यांच्या झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेने नियुक्त केलेले शासनमान्य मुल्यांकनकर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएट्स, पुणे यांनी भंगाराच्या प्रकार निहाय दिलेले किमान दर निश्चितीस सर्वानुमते मान्यता दिली. उक्त किमान दर हे निविदा प्रक्रिया अंतर्गत बोली निश्चित करण्यास किमान दर म्हणुन ग्राह्य धरावे. असे सर्वानुमते ठरले.

निरुपयोगी/भंगार साहित्याच्या लिलाव प्रक्रियेसाठी शासनमान्य ई-ऑक्शनर मे.शंकर रामचंद्र लिलावकर्ता यांना मा.आयुक्त यांची दि.14.10.2024 रोजी मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार दि.10.12.2024 रोजीच्या निर्लेखान समितीच्या बैठकीत अंतिम झालेल्या निर्णयानुसार निश्चित केलेले

किमान दर ग्राह्य धरुन ई-लिलावकर्ता मे.शंकर रामचंद्र यांच्या समवेत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला व त्यानंतर निरुपयोगी/भंगार साहित्याच्या ई-लिलावाची प्रक्रिया दि.05.02.2025 रोजी संपन्न झाली. सदरच्या दिवशी सकाळी 11.30 वाजता प्रत्यक्ष ई-लिलावास सुरुवात झाली याप्रसंगी गठीत लिलाव समितीतील खालील सदस्य उपस्थित होते.

1) मा.अति.आयुक्त-1 तथा समिती अध्यक्ष
2) मा.शहर अभियंता तथा समिती सदस्य
3) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा समिती सदस्य
4) मा.दक्षत कक्ष प्रमुख तथा समिती सदस्य
5) मा.उपआयुक्त तथा विभाग प्रमुख (भांडार) तथा समिती सचिव
6) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पाणी पुरवठा जायकवाडी तथा समिती सदस्य

सदर ई-लिलावात एकुण 16 लॉट होते. यापैकी सर्व 16 लॉटसाठी लिलाव समिती व मा.सर्व साधारण सभा यांनी ठरवुन दिलेल्या आधारभुत मुल्यांपेक्षा अधिकच्या मुल्यांची Bid प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त दरास या कामी गठीत समितीने मान्यता दिलेली आहे. सदरील 16 लॉटचे सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे दर्शविण्यात आले. उक्तनुसार प्राप्त होणारी रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| लॉट क्र. | साहित्याचे विवरण | अंदाजे वजन | UOM | दर | सर्वात जास्तीची बीड | ई.एम.डी. EMD | उर्वरित रक्कम | एजन्सीचे नाव | जी. एस. टी % | जी. एस. टी. % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | CAST IRON ALL TYPES OF VALVE (SLUICE VALVE & NARV) | 6.5 | MT | 40,500 | 263,250 | 65,900 | 197,350 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 2. | CAST IRON OLD PUMP ASSEMBLY | 7 | MT | 50,217 | 351,519 | 87,900 | 263,619 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 3. | EMPTY MS OIL DRUM (CAP 210 LTR) | 202 | NOS | 595 | 120,190 | 30,100 | 90,090 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 4. | CAST IRON & MS COLYMN PIPE & ETC | 2 | MT | 38,000 | 76,000 | 19,000 | 57,000 | BABA TRADERS | 18 | 1 |
| 5. | MS FOUNDATION PLATE +SHUTTER ETC | 3 | MT | 37,000 | 111,000 | 27,800 | 83,200 | BABA TRADERS | 18 | 1 |
| 6. | MS VARIOUS PANNEL BOX | 1.5 | MT | 70,500 | 105,750 | 26,500 | 79,250 | ECO GREEN EREFINE | 18 | 1 |
| 7. | MS & CERAMIC LIGHT FITTING+DO ASSEMBLY | 1.5 | MT | 125,200 | 187,800 | 47,000 | 140,800 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 8. | BREAKER & ELECTRICAL PARTS | 3 | MT | 280,100 | 840,300 | 210,100 | 630,200 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 9. | SCRAP MOTORS | 6 | MT | 120,200 | 721,200 | 180,300 | 540,900 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 10. | MS & GALVANIZED IRON HAND PUMP MATERIAL (LOT-2) | 28 | MT | 37,400 | 1,047,200 | 261,800 | 785,400 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 11. | PVC & ALUMINIUM ARMOURED CABLES | 1.5 | MT | 100,300 | 150,450 | 37,700 | 112,750 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 12. | CAST IRON REDUCTUION GEAR BOX | 0.800 | MT | 85,700 | 68,560 | 17,200 | 51,360 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 13. | SCRAP BEARING | 0.250 | MT | 77,000 | 19,250 | 4,900 | 14,350 | WASIF TRADERS | 18 | 1 |
| 14. | MILD STEEL SS SHAFT & SLEEVES | 1.2 | MT | 60,300 | 72,360 | 18,100 | 54,260 | FALAK TRADERS | 18 | 1 |
| 15. | ALUMINIUM CERAMIX,PLASTIC FILME-CAPACITORS | 3.5 | MT | 74,100 | 229,350 | 64,900 | 194,450 | KHUSHI ENTERPRISES | 18 | 1 |
| 16. | MS OIL DRUM WITH CONTAMINATED OIL (CAP-210 LTR) (AS IS WHERE IS BASIS) (MPCB &CPCB LICENSE REQUIRED) | 14 | NOS | 8,900 | 124,600 | 31,200 | 93,400 | SHREE CHHATRAPATI SAMBHAJI MAHARAJ LUBRICANTS | 18 | 1 |
| | | | | **TOTAL SALE** | **4,518,779** | **1,130,400** | **3,388,379** | | | |

वरील प्रमाणे प्रत्यक्ष ई-लिलावातील प्राप्त दरानुसार एकुण र.रु.45,18,779/- एवढी रक्कम अपेक्षित असुन सदरची रक्कम ही लिलावावेळी गृहीत धरलेल्या अंदाजित वजनानुसारची आहे. प्रत्यक्ष भंगार साहित्य निविदाधारकास ताब्यात देतांना भंगारच्या त्यावेळच्या घट/वाढ नुसार बदलणार आहे.

करीता, वरीलप्रमाणेच्या ई-लिलावात तुलनात्मक सर्वात जास्तीचे दर भरणाऱ्या एजन्सींना व त्यांनी भरलेल्या दराला सर्वानुमते मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1817/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-लिलावातील प्राप्त दरानुसार एकुण र.रु.45,18,779/- अपेक्षित असुन भंगार साहित्य निविदाधारकास ताब्यात देतांना भंगारच्या त्यावेळच्या घट/वाढ नुसार बदलणार आहे. याकरीता ई-लिलावातील तुलनात्मक सर्वात जास्तीचे दर भरणाऱ्या एजन्सींना व त्यांनी भरलेल्या दराला सर्वानुमते मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1818/2025:-** **(झोन नं.7 विभाग)** **(दि.17.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.एकनाथ आबाजी पेटारे, सफाई मजुर, झोन क्र.07, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या (मज्जारज्जुशी संबंधीत आकस्मिक आजार) या आजारावर ऑस्कर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, ठाणे येथे उपचार केलेला असुन उपचारासाठी एकुण र.रु.4,40,375/- इतका खर्च केलेला आहे.

तथापि, संबंधीताने उपचार केलेले रुग्णालय ऑस्कर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, ठाणे हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/ मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही.

सदरच्या प्रस्तावास पडतळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीतास अदा करणेबाबत शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.एकनाथ आबाजी पेटारे, सफाई मजुर, झोन क्र.07, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1818/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.एकनाथ आबाजी पेटारे, सफाई मजुर, झोन क्र.07, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,00,000/- च्या 5% र.रु.5000/- इतकी मनपा फंडात जमा करुन उर्वरित देय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1819/2025:-** **(उद्यान विभाग)** **(दि.17.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-6 येथील महानगरपालिकेचे साईनगर 1/2 उद्यानाचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव असुन या कामाअंतर्गत (1) शोभिवंत झाडे लागवड करणे, (2) लहान मुलांसाठी खेळणी बसविणे, (3) संरक्षक भींतीची उंची वाढवून ग्रील बसविणे, (4) अंतर्गत पाथवे दुरुस्ती करणे (56) पॅगोडा दुरुस्ती करणे, (6) गेट-कमान (7) संपुर्ण रंगकाम इ.कामाच्या र.रु.49,84,099/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.1519/2024 दि.06.08.2024 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

प्राप्त मान्यतेनुसार सदर कामासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. ई-निनिदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेया कागदपत्रांची तपासणी केली असता, सर्व निविदाधारक पात्र होते. त्यानुसार सर्व निविदेचे देकार (Price Bid) उघडण्यात आले, त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन | 28.24%कमी |
| 2. | मे.रॉयल कन्स्ट्रक्शन | 27.30%कमी |
| 3. | मे.सुयोग कन्स्ट्रक्शन | 23.70%कमी |
| 4. | श्री.प्रभाकर मोहिते | 23%कमी |
| 5. | श्री.शेख मसुद शेख अमीन | 22.10% कमी |

| | | |
|---|---|---|
| 6. | श्री.काझी मोहम्मद मुबरिजुद्दीन | 18.18% कमी |
| 7. | श्री.काझी नुर मोहिउद्दीन | 16% कमी |

करीता, महानगरपालिकेच्या सिडको एन-6 येथील महानगरपालिकेचे साईनगर 1/2 उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामासाठी प्राप्त उक्त सात निविदांपैकी मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.24% कमी आहे. करीता मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.24% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1819/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सिडको एन-6 येथील साईनगर 1/2 उद्यानाचे नुतनीकरण करणे (अंदाजपत्रक र.रु.49,84,099/-) या कामासाठी ई-निविदेद्वारे प्राप्त दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.24% कमी दराच्या मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1820/2025:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.17.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत प्राप्त बक्षिस र.रु.2.00 कोटीच्या विनियोग कामी र.रु.1,99,05,857/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाअंतर्गत (1) छत्रपती क्रिडा संकुल, देवळाई येथे फेन्सींग,गेट, कमान व वृक्षारोपण करुन संगोपन करणे, (2) रियॉन शाळा, कांचनवाडी जवळील रेखांकनातील खुल्या जागेत फेन्सींग, गेट कमान व वृक्षारोपण करुन संगोपन करणे, (3) गट नं.44 पडेगाव या रेखांकनातील खुल्या जागेत जागेत फेन्सींग, गेट कमान व वृक्षारोपण करुन संगोपन करणे, (4) सिडको बसस्थानक ते हर्सुल टी-पॉईंट या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या हरितपट्ट्यात व शहरातील नवीन रस्ता दुभाजकांमध्ये वृक्ष लागवड करणे, (5) मनपाच्या स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृतीवन उद्यान एम.जी.एम.परिसर या ठिकाणी पॉली हाऊसची उभारणी करणे इ.कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. एकत्रित अंदाजपत्रकात (अ) उद्यान विषयक कामे र.रु.1,63,82,471/- (ब) स्थापत्य कामे र.रु.30,03,833/- (क) त्रयस्थ पाहणी शुल्क र.रु.2,28,758/- (ड) PMC शुल्क र.रु.2,90,795/- अशा चार बाबींचे (अधिक जीएसटी) र.रु.1,99,05,857/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1075/2023 दि.20.11.2023 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

प्राप्त मान्यतेनुसार सदर कामासाठी दुसऱ्या वेळेस ई-निविदा मागविण्यात आल्या. ई-निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, निविदा सुचना मधील अटी/शर्तीनुसार श्री.मुजीब उर रहेमान खान यांनी आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्र दाखल केले नव्हते. त्यामुळे श्री.मुजीब उर रहेमान खान वगळता एकमेव पात्र निविदाधारक मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि.यांच्या निविदेचे देकार (Price Bid) उघडण्यात आले असता, त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.06% कमी दर दाखल केले आहे.

करीता, माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत प्राप्त बक्षिस रक्कमेच्या विनियोग कामी शहरात मनपाच्या उपलब्ध मोकळ्या जागेत घनवन पध्दतीने वृक्ष लागवड करणे, जॉगिंग ट्रॅक विकसीत करणे या कामासाठी एकमेव पात्र निविदाधारक मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.06% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1820/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत प्राप्त बक्षिस रक्कमेच्या विनियोग कामी शहरात मनपाच्या उपलब्ध मोकळ्या जागेत घनवन पध्दतीने वृक्ष लागवड करणे, जॉगिंग ट्रॅक विकसीत करणे (अं.प.र.रु1,99,05,857/-) या कामासाठी ई-निविदेद्वारे एकमेव पात्र मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि.यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.06% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1821/2025:- (मालमत्ता विभाग)** **(दि.18.02.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाच्या बांधकामामध्ये श्री.नामदेव सुखाजी साळवे यांची मिळकत बाधीत झालेली असल्याने महानगरपालिकेने संबंधीताचे सर्वे क्र.08, कांचनवाडी येथे तात्पुरत्या स्वरुपात 10X15 आकाराची जागा दक्षिणपुर्व बाजुला देऊन नवीन जागा मिळाल्यानंतर जुनी जागा 100% रिक्त करण्याच्या अटीस अधिन राहून पुनर्वसन केले होते.

परंतु श्री.नामदेव सुखाजी साळवे यांना तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेली जागा महानगरपालिका जागेवरील HPCL पेट्रोलपंप व दक्षिण बाजुने खाजगी जागेवरील BPCL कंपनीच्या पेट्रोल पंपामधील क्षेत्रामध्ये असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिने श्री.नामदेव सुखाजी साळवे यांनी मौजे ईटखेडा येथील मंजुर विकास योजनेनुसार विस्तापितांकरीता असणाऱ्या आरक्षित क्षेत्रावरील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या 08 सदनिकेपैकी स्टील्ट फ्लोअर वरील 101 व 102 क्रमांकच्या 02 सदनिका श्री.नामदेव सुखाजी साळवे यांच्या नावे देऊन सदर सदनिकेस नाममात्र भाडे र.रु.100/- प्रती वर्षाने आकारणी करुन सदनिका वाटप पत्र देणे तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1821/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाच्या बांधकामामध्ये श्री.नामदेव सुखाजी साळवे यांची मिळकत बाधीत झालेली असल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरुपात सर्वे क्र.08 कांचनवाडी येथील महानगरपालिकेस मालकीचे कर्मचारी निवासस्थान परिसरातील देण्यात आलेल्या जागेवरील बांधकाम ताब्यात घेऊन मौजे ईटखेडा येथील मंजुर विकास योजनेनुसार विस्तापितां करीता असणाऱ्या आरक्षित क्षेत्रावरील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या 08 सदनिकेपैकी स्टील्ट फ्लोअर वरील 101 व 102 क्रमांकच्या 02 सदनिका श्री.नामदेव सुखाजी साळवे यांच्या नावे देऊन सदर सदनिकेस नाममात्र भाडे र.रु.100/- प्रती वर्षाने आकारणी करुन सदनिका वाटप पत्र देणे तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1822/2025:- (उद्यान विभाग)** **(दि.18.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या हर्सुल येथील उद्यान परिसर जागा CTS No.239 ज्याचे क्षेत्र 15578 चौ.मी.(3.849 एकर) जागेत वॉटरपार्क प्रकल्प राबविण्यास बीओटी समितीची दि.28.11.2024 नुसार मान्यता प्राप्त आहे. प्रस्तुत बीओटी तत्वावरील जागेवर वॉटरपार्क, वाहनतळ (पार्किंग), दुकाने/ऑफीस, फुड प्लाझा, स्टोअर रुम, फिल्टर प्लान्ट, शौचालय/मुतारी/ Changing Room व इतर अनुषंगीक बाबी बीओटी तत्वावर राबविण्यासाठी व स्मृती उद्यान प्रवेशा पासुन ते नियोजीत प्रकल्पापर्यंत विकासकास आवश्यक रुंदीचा रस्ता बांधयाची कामे प्रकल्पात समाविष्ठ आहे. प्रस्तुत बीओटी प्रकल्पासाठी मालमत्ता विभागाने आखुन दिलेल्या 15578 चौ.मी. क्षेत्रफळ जागेसाठी र.रु.98,920/- मासिक भाडे (सिध्दशिघ्रगणकनुसार) आकारण्यासाठी तजवीज आहे. तसेच प्रकल्पाचे विकासकाचे खर्चाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करुन प्रकल्पाचे ड्रॉईंग/डिझाईन यास महानगरपालिकेची मान्यता घेण्यात येईल. काम पुर्णत्वाचा कालावधी दोन वर्ष पर्यंत व प्रकल्पाचे बांधकम पुर्ण झाल्याच्या तारखेपासुन प्रकल्पाचा कालावधी 15 वर्षे राहील. बीओटी तत्वावर उभारणेबाबात प्रकल्पाची विकासकामे विकास नियंत्रण नियमावली अनुसा अनुज्ञेय बांधीव क्षेत्रासाठी आराखडा अंतिम करुन नियमोचित कार्यवाही करणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1822/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या हर्सुल येथील उद्यान परिसर जागा CTS No.239 ज्याचे क्षेत्र 15578 चौ.मी. (3.849 एकर) जागेत वॉटरपार्क प्रकल्प राबविण्यास बीओटी समितीची दि.28.11.2024 नुसार मान्यता प्राप्त आहे. प्रस्तुत बीओटी तत्वावरील जागेवर वॉटरपार्क, वाहनतळ (पार्किंग), दुकाने/ऑफीस, फुड प्लाझा, स्टोअर रुम, फिल्टर प्लान्ट, शौचालय/मुतारी/

Changing Room व इतर अनुषंगीक बाबी बीओटी तत्वावर राबविण्यासाठी व स्मृती उद्यान प्रवेशा पासुन ते नियोजीत प्रकल्पापर्यंत विकासकास आवश्यक रुंदीचा रस्ता बांधयाची कामे प्रकल्पात समाविष्ठ आहे. प्रस्तुत बीओटी प्रकल्पासाठी मालमत्ता विभागाने आखुन दिलेल्या 15578 चौ.मी. क्षेत्रफळ जागेसाठी र.रु.98,920/- मासिक भाडे (सिध्दशिघ्रगणकनुसार) आकारण्यासाठी तजवीज आहे. तसेच प्रकल्पाचे विकासकाचे खर्चाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करुन प्रकल्पाचे ड्रॉईंग/डिझाईन यास महानगरपालिकेची मान्यता घेण्यात येईल. काम पुर्णत्वाचा कालावधी दोन वर्ष पर्यंत व प्रकल्पाचे बांधकम पुर्ण झाल्याच्या तारखेपासुन प्रकल्पाचा कालावधी 15 वर्षे राहील. बीओटी तत्वावर उभारणेबाबात प्रकल्पाची विकासकामे विकास नियंत्रण नियमावली अनुसा अनुज्ञेय बांधीव क्षेत्रासाठी आराखडा अंतिम करुन नियमोचित कार्यवाही करणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर. प्रकल्पात मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1823/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.18.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गट क्र.38,समर्थ कल्याण को.ऑप.हाऊसिंग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांनात कॉंक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.83,93,900/- यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1056/2023 दि.06.11.2023 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच निविदा कार्यवाही अंती मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांच्या सर्वात कमी दराच्या म्हणजेच 3.10% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.1373/2024 दि.15.03.2024 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर कामाचे कायदिश दि.15.03.2024 रोजी कंत्राटदारास निर्गमित करण्यात आले असता, त्यानुसार संबंधीत कंत्राटदाराने प्रस्तावित कामांपैकी बहुतांश रस्त्यांची कामे पुर्ण केलेली आहे. तथापि, एका रस्त्याचे काम शासन निधीतुन पुर्ण करण्यात आलेले असल्याने या कामामध्ये Quantity उरलेली आहे.

दरम्यान गट क्र.42 धिल्लन रेसीडेन्सी जवळ पैठण रोड, कांचनवाडी या भागातील स्थानिक नागरीकांना धिल्लन रेसीडेन्सी जवळील रस्त्याचे काम करुन देणेबाबत मागणी केली असल्याने व सदर काम त्याच भागातील असल्याने यास स्थळ बदल करुन काम करणे आवश्यक आहे.

करीता, गट क्र.38,समर्थ कल्याण को.ऑप.हाऊसिंग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांनात कॉंक्रीट रस्ते कामा अंतर्गत उरलेली Quantity चे काम स्थळ बदल करुन गट क्र.42 धिल्लन रेसीडेन्सी जवळ पैठण रोड, कांचनवाडी येथे वापरण्यासाठी व या प्रमाणे स्थळ बदल करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1823/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गट क्र.38,समर्थ कल्याण को.ऑप.हाऊसिंग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांनात कॉंक्रीट रस्ते कामाअंतर्गत प्रस्तावित कामांपैकी एका रस्त्याचे काम शासन निधीतून पुर्ण करण्यात आलेले असल्याने सदर उरलेली Quantity चे काम स्थळ बदल करुन गट क्र.42 धिल्लन रेसीडेन्सी जवळ पैठण रोड, कांचनवाडी येथे वापरण्यासाठी व या प्रमाणे स्थळ बदल करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1824/2025:-</u> (आरोग्य विभाग) (दि.18.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे National Programme for Prevention & Control of Non-Communicable Diseases छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत Online NCD Portal वर Maping करण्यात आलेली आहे. सदरी मोहिमेसाठी सन-2011 या वर्षांची Plus Polio Population 1394779 ही महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर करीता ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यामध्ये > Adult Population (51608) Screening ही Hypertension, Diabetic & Three Type Of Cancers Oral Cancer, Breast Cancer and Cervix Cancer इ.साठी करणे आवश्यक आहे.

National Programme for Prevention & Control of Non-Communicable Dieseases राबविण्याकरीता खालील प्रमाणे वैद्यकीय उपकरणे व औषधांची खरेदी करण्याकरीता

महाराष्ट्र शासनाच्या Mahatenders.gov.in या प्रणालीवर टेंडर आय.डी. 2024_AMCA_ 1120140_1 Date 31.12.2024 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या निविदेचा व्यापारी लिफाफा दि.21.01.2025 रोजी उघडला असता, M/s.Vighnaharta Medical Pune यांचे एल-1 निविदा दराप्रमाणे खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित राहील.

| Sr. no. | Descriptions of Items | L1 Tenders Rate | Aprozimate Purchase Qty | Total Amount (Including all Taxes) |
|---|---|---|---|---|
| 1. | Tab Amlodipine 5 mg | 2.46 | 408000 | 1003680 |
| 2. | Tab Telmisaratan 40mg | 4.82 | 240000 | 1156800 |
| 3. | Tab Chlorthiadone 6.25mg | 3.47 | 24000 | 83280 |
| 4. | Tab Metformine 500mg | 0.87 | 534800 | 465276 |
| 5. | Tab Glimerpride 1mg | 2.46 | 22800 | 56088 |
| 6. | Tab Glimerpride 2mg | 3.58 | 19600 | 70168 |
| 7. | Glucometer | 470.40 | 115 | 54096 |
| 8. | Glucostrips | 13.22 | 150000 | 1983000 |
| 9. | Lancets | 2.46 | 50000 | 123000 |
| | | | **Total** | **49,95,388.00** |
| **Rupees In Words :** Forty Nine Lakhs Ninety Five Thousand Tree Hundred Eighty Eight Only | | | | |

सदरील खर्चा करीता प्रस्तावित लेखाशिर्ष खालील प्रमाणे

**क-3 सार्वजनिक दवाखाने अ.क्र.02 औषधी व साहित्य खरेदी**
**सांकेतांक क्र.62125320002**

सदरील औषधी व साहित्य खरेदी करीता M/s.Vighnaharta Medical Pune यांच्या एल-1 निविदा दरास मान्यतेसाठी व एकुण र.रु.49,95,388/- (अक्षरी रक्कम रुपये एकोण पन्नास लक्ष पंच्यान्नव हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी फक्त) अपेक्षित खर्चास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1824/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, M/s.Vighnaharta Medical Pune यांच्या एल-1 निविदा दरास मान्यतेसाठी व एकुण र.रु.49,95,388/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास लक्ष पंच्यान्नव हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी फक्त) अपेक्षित खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1825/2025:-</u> (कर निर्धारक व संकलक विभाग)** **(दि.18.02.2025)**

आयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर प्रस्ताव सादर करत आहेत की, सन 2025-26 या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 127 अन्वये आकारण्याचे कर, कलम 99 अन्वये कराचे दर निश्चित करणे आणि परिशिष्ट-ड प्रकरण-8 कराधान नियमानुसार कर योग्य मुल्य निश्चित करणे आदी तरतुदी प्रमाणे महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवुन फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला मालमत्ता कर विषयक सर्व बाबींची निश्चिती करणे आवश्यक आहे.

सन 2025-26 मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायिक, औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे वर्गीकरण करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची -ड मधील प्रकरण 8, नियम 7 आणि 7(अ) मधील तरतुदीच्या अधिन राहुन कर योग्यमुल्य निश्चित करतांना वर्गीकरणा नुसार प्रचलीत दर नविन मालमत्तांच्या कर आकारणीस लागु राहतील. अधिनियमातील तरतुदीनुसार दर सुधारणा करण्यात येत आहे ते पुढील प्रमाणे.

| 01 | मालमत्तेचे / वापराचे प्रकार व करयोग्य मुल्य निर्धारणासाठी वाजवी दर प्रती स्के.मी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1.1 | निवासी मालमत्ता : | आरसीसी छत | रु.19/- | इतर छत | रु.14/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समावेश | 1.1.1 : यामधे सर्वसाधारणपणे नागरीकांच्या राहण्यासाठी वापरात येणारे घर, बंगला, फ्लॅट, सदनिका, रो हाउस या व तत्सम रहिवासी मालमत्तेचा समावेश असेल.<br>1.1.2 माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती ज्या महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-03/सीआर-3911/ आय एनडी-7, दि.12.07.2003 अन्वये डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचेकडे नोंदणीकृत आहेत. | | | | |
| 1.2 | निवासेतर मालमत्ता : | आरसीसी छत | रु.37/- | इतर छत | रु.24/- |
| समावेश | 1.2.1 : वकील, कर सल्लागार यांचे खाजगी घरातील कार्यालय, डॉक्टरांचे खाजगी घरातील क्लिनिक<br>1.2.2 : शैक्षणीक संस्थांशी संलग्न असलेली विद्यार्थी वसतीगृहे, इतर स्वतंत्र वसतीगृहे.<br>1.2.3 : महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम 132 नुसार सार्वजनीक धर्मदाय संस्था.<br>1.2.4 : शासकीय कार्यालये, समुपदेशन केंद्र | | | | |
| 1.3 | औद्योगीक मालमत्ता | आरसीसी छत | रु.22/- | इतर छत | रु.19/- |
| समावेश | 1.3.1 : अधिसूचित औद्योगिक क्षेत्रातील उद्योग, कारखाने यांच्या इमारती. तथापि सदरील अधिसूचित औद्योगिक क्षेत्रात उद्योग आणि कारखाने वगळून विकास झाल्यास किंवा वापराच्या प्रकारात बदल झाल्यास मिळकतीच्या वापरानुसार आणि बांधकामाच्या वर्गीकरणानुसार लागु असलेल्या नियमाने कर आकारणी होईल.<br>1.3.2 : शासन निर्णयानुसार उद्योग म्हणुन मान्यता मिळालेल्या (पर्यटन क्षेत्रातील) इतर इमारती | | | | |
| 1.4 | व्यावसायीक मालमत्ता | आरसीसी छत | रु.47/- | इतर छत | रु.31/- |
| समावेश | 1.4.1 : उपरोक्त वापर वगळता व्यावसायीक / व्यापारी वापर केला जाणा-या इतर सर्व मालमत्ता.<br>1.4.2 : दुकाने, पेट्रोल पंप, मंगल कार्यालय, मॉल, दवाखाने व तत्सम वाणिज्य आस्थापना.<br>1.4.3 : व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिलेल्या जागा, पेड पार्किंग व तत्सम.<br>1.4.4 : व्यावसायीक तत्वावर चालणारी खेळाची मैदाने, हेल्थ क्लब व मनोरंजन पार्क इ.<br>1.4.5 : धर्मदाय तसेच धार्मिक इमारतीतील व्यावसायीक वापराच्या जागा. | | | | |
| 1.5 | खुल्या / मोकळ्या जागा (निवासी) | दर : | रु.6/- | | |
| समावेश | 1.5.1 : केवळ निवासी मोकळ्या जागा, खुले भुखंड इत्यादी.<br>1.5.2 : गुंठेवारी प्रमाणीत खुले निवासी भुखंड<br>1.5.3 : करयोग्य मुल्याच्या 30 % मोकळी जागा कर आकारला जाईल व तो सामान्य कराच्या शिर्षात घेतला जाईल. | | | | |
| 1.6 | खुल्या / मोकळ्या जागा (व्यावसायीक ) | दर : | रु.25/- | | |
| समावेश | 1.6.1 : व्यावसायीक वापर असलेल्या मोकळ्या जागा, खुले भुखंड इत्यादी.<br>1.6.2 : गुंठेवारी प्रमाणीत खुले व्यावसायीक भुखंड, क्रिकेट टर्फ इत्यादी.<br>1.6.3 : पेट्रोल पंप, मंगल कार्यालय यातील खुली जागा, लॉन्स,खुली पेड पार्किंग.<br>1.6.4 : प्रदर्शनासाठी वापरात येणा-या खुल्या जागा / मैदाने.<br>1.6.5 : टेरेस गार्डन रेस्टॉरंट व तत्सम व्यावसायीक वापर असलेली गच्ची इत्यादी.<br>1.6.6 : करयोग्य मुल्याच्या 45 % मोकळी जागा कर आकारला जाईल व तो सामान्य कराच्या शिर्षात घेतला जाईल. | | | | |
| 1.7 | शैक्षणीक मालमत्ता (अनुदानीत) | आरसीसी छत | रु. 24/- | इतर छत | रु.19/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समावेश | 1.7.1 : अनुदानीत शिक्षण संस्था असल्याबाबत शासन निर्णय / प्रमाणपत्र असलेल्या संस्था.<br>1.7.2 : अशा संस्थांना सामान्य कर निवासी दराने व इतर कर निवासेतर दराने आकारले जातील. | | | | |
| 1.8 | शैक्षणीक मालमत्ता (विना अनुदानीत) | आरसीसी छत | रु.29/- | इतर छत | रु.23/- |
| समावेश | 1.8.1 : उपारोक्त प्रमाणे प्रमाणीत नसलेल्या शैक्षणीक संस्था.<br>1.8.2 : व्यावसायीक शैक्षणीक संस्था.<br>1.8.3 : अशा संस्थांना सामान्य व इतर कर निवासेतर दराने आकारले जातील. | | | | |

| 02 | सामान्य कराचे वापर निहाय दर | | |
|---|---|---|---|
| | वापराचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावीत दर |
| 2.1 | निवासी वापर | 30 % | 30 % |
| 2.2 | निवासेतर वापर | 37.5 % | 37.5 % |
| 2.3 | औद्योगिक वापर | 36 % | 36 % |
| 2.4 | व्यावसायीक वापर | 45 % | 45 % |

| 03 | इतर करांचे वापर निहाय दर | | | |
|---|---|---|---|---|
| | कराचे नाव | वापराचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावीत दर |
| 3.1 | साफसफाई कर | निवासी वापर | 3 % | 3 % |
| 3.2 | | निवासेतर वापर | 10 % | 10 % |
| 3.3 | | औद्योगिक वापर | 10 % | 10 % |
| 3.4 | | व्यावसायीक वापर | 10 % | 10 % |
| 3.5 | वृक्ष कर | कोणत्याही वापरासाठी | 1 % | 1 % |
| 3.6 | अग्निशमन कर | कोणत्याही वापरासाठी | 1.5 % | 1.5 % |
| 3.7 | मनपा शिक्षण कर | कोणत्याही वापरासाठी | 2 % | 2 % |
| 3.8 | पथ कर | कोणत्याही वापरासाठी | 2 % | 2 % |
| 3.9 | जल लाभ कर | कोणत्याही वापरासाठी | 1.5 % | 1.5 % |
| 3.10 | जल नि:सारण लाभ कर | कोणत्याही वापरासाठी | 1.5% | 1.5% |
| 3.11 | सेवरेज कर | निवासी वापर | 10 % | 10 % |
| 3.12 | | निवासेतर व व्यावसायीक वापर | 15 % | 15 % |
| 3.13 | | औद्योगिक वापर | 5 % | 5 % |
| 3.14 | | औद्योगिक वसहतीत निवासी वापर | 10 % | 10 % |

| 3.15 | उपभोक्ता कर (प्रती वर्ष) | |
|---|---|---|
| | वापर | सध्याचे दर |
| | निवासी वापर | 365/- |
| | निवासेतर / औद्योगिक, | 730/- |
| | शैक्षणीक संस्था व्यावसायीक | 3650/- |
| | हॉटेल्स रेस्टॉरंट बिअर बार | 3650/- |
| | लॉजिंग बोर्डिंग मोठे हॉटेल्स | 7300/- |
| | 50 बेड पर्यंतचे हॉस्पिटल | 730/- |
| | 50 बेडच्या पुढचे हॉस्पिटल | 730/- |
| | लॉन्स, मंगल कार्यालय | 730/- |

| | प्रस्तावीत दर कर योग्यमुल्या नुसार प्रती वर्ष | | |
|---|---|---|---|
| 3.15.1 | निवासी : | रु.20 हजार पर्यंत रु.400/- | रु.20 हजार च्या वर रु.500/- |
| 3.15.2 | निवासेतर : | रु. 20 हजार पर्यंत रु.750/- | रु.20 ते 50 हजार रु.1000/- |
| 3.15.3 | | रु.50 हजार ते 1 लक्ष रु.2000/- | रु.1 लक्ष च्या वर रु.2500/- |
| 3.15.4 | औद्योगिक : | रु. 1 लक्ष पर्यंत रु. 4000/- | रु.1 लक्ष च्या वर रु. 5500/- |
| 3.15.5 | मिश्र : | रु.20 हजार पर्यंत रु.600/- | रु.20 हजार च्या वर रु.800/- |
| 3.15.6 | व्यावसायीक : | रु.20 हजार पर्यंत रु.750/- | रु.20 हजार ते 50 हजार रु.1000/- |
| 3.15.7 | | रु.50 हजार ते 1 लक्ष रु.1500/- | रु.1 ते 2 लक्ष पर्यंत रु.2000/- |
| 3.15.8 | | रु.2 ते 4 लक्ष पर्यंत रु.4000/- | रु. 4 लक्षच्या वर रु.6000/- |

| 04 : | शासनाचे कर | | | |
|---|---|---|---|---|
| | करयोग्य मुल्य रुपये | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी कर |
| | | निवासी | निवासी वगळुन इतर | निवासी वगळुन इतर |
| 4.1 | 75 ते 150 | 2 % | 4 % | 1 % |
| 4.2 | 151 ते 300 | 3 % | 6 % | 1.5 % |
| 4.3 | 301 ते 3000 | 4 % | 8 % | 2 % |
| 4.4 | 3001 ते 6000 | 5 % | 10 % | 2.5 % |
| 4.5 | 6001 ते पुढे | 6 % | 12 % | 3 % |

| | |
|---|---|
| 05. : | भारत सरकारच्या मिळकतींवरील सेवा शुल्क : |
| 5.1 : | भारत सरकारच्या प्रत्यक्ष मालकीच्या तसेच भारत सरकार अंगीकृत असलेल्या विभागांची कार्यालये व इतर मिळकती / मालमत्ता यांना वापरानुसार कर आकारणी केली जाईल. |
| 5.2 : | त्या मालमत्तेस महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या 75 टक्के / 50 टक्के किंवा 33.33 टक्के एवढी रक्कम सेवा शुल्क म्हणुन आकारण्यात येईल. (मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार.) |
| 06. : | मोबाईल टॉवरला कर आकारणी : |
| 6.1 : | मोबाईल टॉवर भाडेपट्टा करारात नमूद भाडे किंवा सिध्द शिघ्र गणकाचे दर यापैकी जे अधिक असेल त्याआधारे कर योग्य मुल्य निश्चित करण्यात येईल. |
| 6.2 : | करयोग्य मुल्याच्या 15 % मालमत्ताकर आकारला जाईल व तो सामान्य कराच्या शिर्षात घेतला जाईल. (नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्व शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2021/सी.आर.242/नवि-20 दिनांक 19.12.2022 मधील मुद्दा क्रमांक 20 नुसार) |
| 07. : | नामांतर शुल्क :- |
| 7.1 : | खरेदी/विक्री, दिर्घ भाडेपट्टा करारनामाने किंवा इतर कोणत्याही दस्त आधारे नामांतरा साठी, मालमत्तेच्या हस्तांतरणच्या दस्तावरील व्यवहाराच्या रकमेवर 0.1% किंवा रू.2500/- या पैकी जे अधिक असेल ती रक्कम नामांतर शुल्क म्हणुन आकारण्यात येईल. |
| 7.2 : | वारसपत्र,बक्षिसपत्र,हिबानामाद्वारे मालमत्ता कराच्या नामांतरासाठी 0.01% किंवा रू.2500/- या पैकी जे अधिक असेल ती रक्कम नामांतर शुल्क म्हणुन आकारण्यात येईल. |
| 7.3 | निवासी नळखात्यास रू.2500/- व व्यावसायीक नळखात्यास रू.5000/- नामांतर शुल्क आकारण्यात येईल. |
| 08. : | अदत्त रकमेवरील शास्ती :- |
| 8.1 : | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 30, 41 अन्वये देय मालमत्ता करातील |

| | | |
|---|---|---|
| | प्रथम सहामाही देयकाची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 30 जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम 31 डिसेंबर पूर्वी भरणे आवश्यक आहे. | |
| 8.2 : | सदरील नियमानुसार जुन्या आणि नविन कर आकारणी करण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्‌त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण-8 कराधान नियम 41 अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या 2 टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणुन लागु असेल. | |
| 09. : | अवैध इमारतीवर शास्ती बसविणे :- | |
| 9.1 : | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 267 - अ प्रमाणे दि.01-04-2008 पासुन व शासन निर्णय क्र. संकिर्ण-2015/प्र.क्र.305/ नवि-20, मंत्रालय मुंबई, दिनांक 11 जानेवारी 2017 रोजीच्या शासन निर्णयानुसार अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते. | |
| 9.2 : | अधिनियमातील कलम 267 - अ पोट कलम (1) मध्ये नमूद केलेल्या (अ) (ब) (क) (ड) मधील नमूद मिळकत धारक कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर महानगरपालिकेकडुन पुढे दर्शविलेल्या दराने शास्ती भरण्यास पात्र असेल. | |
| | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारण्याच्या शास्तीचा दर |
| 9.3 : | 600 चौ. फुटांपर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येणार नाही. |
| 9.4 : | 601 ते 1000 चौ. फुटापर्यतचे बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या 50 टक्के दराने शास्ती आकारण्यात येईल. |
| 9.5 : | 1001 चौ. फुटापुढील बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या 100 टक्के दराने शास्ती आकारण्यात येईल. |
| 9.6 : | शासन परिपत्रकानुसार निवासी व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामाच्या मालमत्ता करावर मालमता कराच्या 100 टक्के दराने अनधिकृत बांधकाम शास्ती लागु राहील. | |
| 9.7 : | परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असतो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम नियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो. | |
| 9.8 : | या कलमातील पोट कलम (2) (1) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात येते, करिता सदर शासन निर्णय प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. | |
| 10. : | कर निर्धारण झाले नसेल अशा प्रकरणांमध्ये आकारणी करण्याचा अधिकार :- | |
| 10.1 : | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 150-अ अन्वये एतदविरूध्द काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये आकारण्यायोग्य असलेले कोणतेही कर किंवा शुल्क यांचा भरणा करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही कारणास्तव, जर कोणत्याही वर्षातील करनिर्धारण केले गेले नसेल तर, आयुक्तास, ज्या दिनाकांस ती व्यक्ती, आकारणी करण्यास पात्र झाली असेल त्या दिनांकापासून सहा वर्षाच्या आत, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तीवर कराची आणि देय शुल्काची आकारणी करणारी नोटीस बजावता येईल, आणि अशी नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत | |

| | |
|---|---|
| | तीद्वारे त्यावरील प्रदानाची मागणी करता येईल आणि या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, ज्या वर्षात कर किंवा शुक्ल आकारणी करण्यात आली होती असे समजून, लागू करण्यात येईल. |
| 10.2 : | सदरील नियमानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1961 च्या तरतुदीमुळे बांधकाम परवानगी प्राप्त असलेल्या तसेच या अधिनियमांतर्गत परवानगी नसलेले बांधकाम हे विनापरवानगी, अवैध बांधकाम गृहित धरुन देय असलेल्या शास्ती सह कलम 150-अ नुसार कर निर्धारण करण्यात येईल. |
| 11. : | न्यायालयीन प्रकरणांमधे विवादीत रकमेबाबत :- |
| | न्यायालयीन प्रकरणात निर्णयाच्या अधिन राहुन विवादीत रक्कम सोडुन निर्विवादीत कराची रक्कम भरणा करुन घेताना थकबाकीवर प्रत्येक वर्षी 6 टक्के व्याज/ शास्ती लावण्यात येइल. |
| 12. : | अनादरीत धनादेशाची वसुली व दंड :- |
| 12.1 : | धनादेशावर स्वाक्षरीमध्ये फरक, खाडाखोड, Non-CTS, रकमेच्या अंकात व अक्षरात फरक, तारीख व्यवस्थीत न लिहीणे इत्यादी कारणांमुळे अनादरीत धनादेशाच्या रकमेच्या 5% दंड वसुली करण्यात येईल. |
| 12.2 | खात्यावर पुरेशी रक्कम नसल्यामुळे अथवा रक्कम अदागयी थांबवल्यामुळे (Stop Payment) महानगरपालिकेला दिलेला धनादेश न वटता परत आल्यास अनादरीत धनादेशाच्या रकमेच्या 10% दंड वसुली करण्यात येईल. |
| 12.3 | धनादेशावर रकमेच्या अंकात व अक्षरात फरक, खाडाखोड, Non-CTS, तारखेत चुक इत्यादी कारणांमुळे धनादेश न वटता परत आल्यास संबंधित रोखपालाकडून प्रती धनादेश रू.200/- दंड वसूल करण्यात येईल. |
| 13. : | विशेष सवलती :- |
| 13.1 : | महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम च्या कलम 140 अ नुसार जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा मालमत्ताकर आगावु आणि केवळ ऑनलाईन भरणा करतील अशा मालमत्ता धारकांना मालमत्ता करातील सामान्य करात पुढील नमुद महिन्यात भरणा केल्यास पुढील प्रमाणे सूट देय असेल. |
| 13.1.1 | माहे एप्रील महिन्यात पुर्ण रक्कम भरणा केल्यास चालु वर्षीच्या सामान्य कारात 10 % सुट |
| 13.1.2 | माहे मे महिन्यात पुर्ण रक्कम भरणा केल्यास चालु वर्षीच्या सामान्य कारात 8 % सुट |
| 13.1.3 | माहे जुन महिन्यात पुर्ण रक्कम भरणा केल्यास चालु वर्षीच्या सामान्य कारात 6 % सुट |
| 14. : | माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना करात सवलत :- |
| 14.1 : | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिकांना, त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या फक्त एकाच निवासी वापराच्या मिळकतीचे सामान्य कर, वृक्ष कर, मनपा शिक्षण कर व पथकर या करातून सुट लागु राहील. उर्वरित कराचा भरणा करणे आवश्यक राहील. |
| 14.2 : | सन -2025-26 या आर्थिक वर्षात माजी सैनिकांना, स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस देय असलेल्या पाणीपट्टीसाठी सुट लागु असणार नाही. |
| 15. : | सप्त तारांकित धोरण :- |
| 15.1 : | महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम 140-ब नुसार परिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातुन सुट किंवा परतावा देण्याची बाब अंतर्भुत आहे. त्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांसाठी सप्त तारांकीत मुल्यांकनाचे धोरण अवलंबण्यात येत आहे. नमुद बाबींची पुर्तता करणा-या मालमत्ताधारकास प्राप्त गुणांकनानुसार सामान्य करातुन सुट देण्यात येईल. मालमत्ताधारकास याकरीता किमान 5 तारांकीत मुल्यांकन प्राप्त करणे अवश्यक राहील. या धोरणाद्वारे महानगरपालिका ऑनलाईन संगणकीय प्रणालीस प्रोत्साहन देणे, |

| | |
|---|---|
| | अपारंपारीक उर्जा स्त्रोत, आरोग्यदायी, पर्यावरणनुकूल आणि महिला सक्षमीकरण उद्देश ठेऊन धोरण अंतिम करण्यात आले आहे. या धोरणा अंतर्गत नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि त्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी मालमत्ता करातील सामान्य करात सुट देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. या करिता एकुण 7 तारांकीत मुल्यांकनाआधारे गुणांकन खालील प्रमाणे करण्यात येते.<br>1. वृक्षारोपण करणे :- या मध्ये मालमत्तेचा सज्जा, गच्ची, अंगणातील वृक्षारोपण यांचा समावेश राहील.<br>2. ओला आणि सुका कच-याचे 100 टक्के वर्गीकरण करणे.<br>3. (रेन वॉटर हार्वेस्टींग) पावसाचे पाण्याचे जलपुनर्भरण<br>4. सौर ऊर्जा.(ग्रीडवर / विरहीत)<br>5. इलेक्ट्रीक वाहन.(दुचाकी/चार चाकी (सायकल वगळून))<br>6. महिलांच्या नावे मालमत्ता असणे.<br>7. मालमत्ता कर व पाणीपट्टी कर मुदतीत आणि ऑनलाईन भरणा करणे. |
| 15.2 : | उपरोक्त प्रमाणे प्राप्त तारांकीत गुणांकन आधारे महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात सुट देण्यात येईल. तथापि, सप्त तारांकित गुणां पैकी सुट देण्यासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी कर ऑनलाईन वेळेत भरणा करणे हा तारा सुट मिळण्यासाठी पाच तारांकित, सहा तारांकित, सात तारांकित गुणांकन प्राप्त करण्यासाठी अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने मालमत्ताधारकांना देय मालमत्ता करामधील सामान्य करात पुढीलप्रमाणे सुट देण्यात येत आहे. |

| अ क्र. | प्राप्त तारांकीत गुणांकन | एकुण सुट (%) |
|---|---|---|
| 1 | 7 | 10 % |
| 2 | 6 | 8 % |
| 3 | 5 | 6 % |

| | |
|---|---|
| 16. : | महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम 132 (1) नुसार सुट देताना करावयाची कार्यवाही : - |
| | महानगरपालिका हद्दीतील (अ) केवळ मृतांच्या विल्हेवाटीशी संबंधित जमिनी, (ब) केवळ सार्वजनीक पुजा अर्चा किंवा सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठीच भोगवट्यात असलेल्या इमारती व जमीनींना कलम 132 मधील तरतुदींनुसार सामान्य करात सुट आहे. सदर सुट मिळण्या साठी प्राप्त अर्ज निकाली काढण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी. |
| 16.1 : | सवलत मिळण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्जासोबत संस्थेने सादर करावयाची कागदपत्रे |
| 16.1.1 | धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडील भारतीय विश्वस्त कायदा 1882 अंतर्गत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| 16.1.2 | आयकर कायदा 1961 कलम 10,11 आणि 12 अनुसार धर्मदाय संस्थेस मालमत्तेतुन मिळणा-या उत्पन्नासाठी प्राप्तीकरातुन सुट देण्यात आली आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र. (उदा. कलम 10 (23 सी) किंवा 12 ए,12 ए ए, 12 ए बी, (नियम 10 ए सी/ 17 ए/ 11 ए ए/2 सी) नुसारचे तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र (Provisional Order of Registration) किंवा कायमचे नोंदणी प्रमाणपत्र (Order of Approval) |
| 16.1.3 | संस्थेच्या घटनेची प्रत व पदाधिका-यांचे ओळखपत्र. |
| 16.1.4 | संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षित ताळेबंद (Audited accounts). |
| 16.2 : | सवलत देण्याची कार्यपद्धती : |
| 16.2.1 | संस्थेच्या अंतर्गत असलेल्या सर्व मालमत्तांचे मोजमाप करुन त्यांच्या वापरानुसार कर आकारणी केली जाईल. |
| 16.2.2 | सुट मिळण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यावर कागदपत्रांची छाननी होइल व सर्व कागदपत्र |

| | |
|---|---|
| | परिपुर्ण असल्यास कलम 132 (1)(ब) नुसारची सवलत देण्याचा आदेश निर्गमीत होइल. |
| 16.2.3 | कलम 132 मधे नमुद असल्यानुसार संस्थेअंतर्गत असलेल्या मालमत्तांमधे व्यापार चालविला जात असल्यास अथवा मालमत्तेपासुन संस्थेस भाडे मिळत असल्यास ( जरी त्या भाड्याचा उपयोग धर्मदाय कार्यासाठी केला जात असेल तरीही) उपरोक्त सवलत नाकारण्यात येइल तसेच पुर्वी सवलत देण्यात आली असल्यास रद्द करण्यात येइल. |
| 16.2.4 | उपरोक्त 2 नुसारचे तात्पुरते प्रमाणपत्र रद्द झाल्यास उपरोक्त सवलत नाकारण्यात येइल तसेच पुर्वी मिळाली असल्यास रद्द करण्यात येइल. |
| 16.2.5 | विहीत कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरल्याने सवलत नाकारलेल्या किंवा प्रमाणपत्र रद्द झालेल्या संस्थेच्या मालमत्तांना वापरानुसार पुर्ण मालमत्ता कर आकारण्यात येइल. |

**ठराव क्रमांक 1825/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2025-26 मध्ये कर आकारणी करणेसाठी प्रस्तावात नमुद करण्यात आल्या नुसार निवासी, निवासेत्तर, व्यावसायिक, औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकार च्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे पूर्वीप्रमाणेच वर्गीकरण करण्यात आलेले आहेत. तसेच नविन मालमत्तांची कर आकारणी करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची -ड मधील प्रकरण 8, नियम 7 आणि 7(अ) मधील तरतुदीच्या अधिन राहुन कर योग्यमुल्य निश्चित करण्या साठी वर्गीकरणानुसार प्रचलीत दर लागु राहतील. अधिनियमातील तरतुदीनुसार दर सुधारणा करण्यात मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1826/2025:- (विद्युत विभाग)** **(दि.18.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नवीन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे देवळाई चौक ते आर.के.वॉशिंग सेंटर रस्त्यांमधील महावितरण कंपनीचे एच.टी./एल.टी. लाईन शहराच्या वाढत्या विस्तारामुळे त्वरीत स्थलांतरीत करण्याचे काम मे.रिलायबल इलेक्ट्रिकल यांच्या तर्फे कामपुर्ण करण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र. जिनिस/ जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासाठी र.रु.7 कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. त्यात सिडको एन-7 येथील स्थलांतरीत करण्याच्या कामाचा खर्च (आधी गृहीत धरलेला) फुटपाथ आणि Carriage Way मधील 53 पोल स्थलांतरीत करण्यासाठी र.रु.1,62,22,668,99/- इतकी होती. आता सुधारित अंदाजपत्रकानुसार फक्त Carriage Way मधीलच 4 पोल स्थलांतरीत करण्यासाठी र.रु.1,44,139/- खर्च करण्यात येणार आहे. म्हणजेच त्यामुळे उर्वरित र.रु.1,60,75,350/- च्या निधी मधुन मे.रिलायबल इलेक्ट्रिकलचे देयक र.रु.72,48,239/-अदा करता येवु शकते.

33 के.व्ही.भूमिगत केबल टाकणे आवश्यक असल्याने मुळ अंदाजपत्रकास (Extra Item) मध्ये त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरील ठिकाणी केबल जुनी असल्यामुळे तसेच Single Run असल्यामुळे या केबलला भरपुर ठिकाणी जॉईट आहेत.

केबलला जॉईट असल्यामुळे भविष्यात अपघात होवु नये यासाठी अखंड 1.7 किमी केबल टाकण्यासाठी म.रा.वि.वि.कंपनीचा अभिप्राय प्राप्त आहे. त्यामुळे 1.7 कि.मी.केबलसाठीचे र.रु.72,48,241/- चे अंदाजपत्रक आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1709/2024 दि.28.11.2024 अन्वये अं.प.र.रु.72,48,241/- मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त आहे. सदरचे कामासाठी र.रु.22.4 लक्ष रुपयांचे निधी तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2024-25 यातून र.रु.50 लक्ष असे एकूण र.रु.72.48 च्या निधीतुन सदरील काम प्रस्तावित केले होते. तद्नंतर सुधारीत प्रस्तावात नमुद काम जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 र.रु.7 कोटीचा निधीतुनच करावयाचे आहे. त्यानुसार अतिरीक्त बाब

(Extra item):- र.रु.72,48,239/- चा सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1826/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे देवळाई चौक ते आर. के. वॉशिंग सेंटर रस्त्यांमधील महावितरण कंपनीचे 33 केव्ही भुमिगत केबल टाक. गेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधुन प्राप्त 7.00 कोटी निधीमधून सन 2023-24/2024-25 या लेखाशिर्षका अंतर्गत अंदाजपत्रकीय रक्कम अतिरीक्त बाब (Extra item): मे.रिलायबल इलेक्ट्रीकलचे देयक र.रु.48,239/- सर्वानुमते अदाईगीची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1827/2025:-</u> (कार्य.अभि.विद्युत विभाग)** **(दि.21.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये आजमितीस एकुण 39 वाहतुक संकेतांक आहेत. सदर वाहतुक संकेताकांची यंत्रणा यामध्ये असणारे 6 मीटर पोल, Cantiliver Poles, Control Panel, Box Timers फार जुने झाले असुन त्यासाठी असणा-या पोलचे आयुष्यमानही संपले आहे. वारंवार सदर वाहतुक संकेतांकाची दुरुस्ती करावी लागते. नविन 09 स्मार्ट वाहतुक संकेतांक सिल्लेखाना चौक, शरद टि पॉईंट, कार्तिकी चौक, धुत हॉस्पीटल चौक, महानुभव आश्रम चौक, रेल्वेस्टेशन चौक, शहानुरमियाँ दर्गा चौक, समर्थनगर चौक, गजानन महाराज मंदीर चौक या ठिकाणी बसविण्यासाठी राष्ट्रीय शुष्द हवा या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात आले आहे.

तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील 16 चौकामध्ये केवळ स्मार्ट सिटीचे एकुण 32 पोल उभारण्यात आले आहे परंतु त्यासाठी कुठलेही नियोजन करण्यात आलेले नाही. शहरामध्ये वास्तव्यास असणारे लोक व वाढती लोकसंख्या यामुळे वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. परिणामी वाहतुक नियंत्रण ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. वाहतुकीस नियंत्रित करण्यासाठी नियमांचे उल्लंघन करणा-या विरुध्द त्वरीत कार्यवाही होणाच्या दृष्टीने अत्याधुनिक सोयींनी परीपुर्ण असणारे स्मार्ट वाहतुक संकेतांक बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

समावेश करण्यात आलेले स्मार्ट वाहतुक सांकेतांक (झोन क्र.1 ते 9 आरोग्य केंद्र या लेखा शिर्षकातुन प्रस्तावित)

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| 1 | कैब्रिज चौक |
| 2 | मुकुंदवाडी चौक |
| 3 | टि.व्ही. सेंटर चौक |
| 4 | उध्दवराव पाटील चौक |
| 5 | सेव्हन हील चौक |

जुना ठराव क्र.1433/24 दि.24.06.2024 अन्वये समावेश केलेल्या 5 वाहतुक संकेतांकापैकी सावरकर चौक (पोलिस मेस रोड) ऐवजी सेव्हन हील चौकाचे समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार शहरातील 05 चौकामध्ये स्मार्ट वाहतुक संकेतांकांचे अं.प.र.रु.1,66,82,507/- तयार करण्यात आलेले आहे. सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1827/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील 05 चौकामध्ये स्मार्ट वाहतुक संकेतांकांचे अंदाजपत्रकीय र.रु.1,66,82,507/- चे अंदाजपत्रकाच्या सुधारीत प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1828/2025:-</u> (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.21.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा मुख्यालयातील मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.गटनेता व मा.विरोधी पक्षनेता यांच्या दालनाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम

विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.79,34,046/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1756/2025 दि.08.01.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.64,03,588.17/- च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता यामध्ये पात्र L1 निविदाधारक श्री.कुरैशी मोहम्मद कफिल अब्दुल जलील हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 4.25% कमी दराने म्हणजेच र.रु.61,31,435.68/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर काम संबधीत कंत्राटदाराकडून करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ टेन्डर क्र.आय.डी. 2025_ AMCA_1136452_01 सन 2024-2025

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | मनपा मुख्यालयातील मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.गटनेता व मा. विरोधी पक्षनेता यांच्या दालनाचे नुतनीकरण करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1756/2025 दि.08.01.2025 नुसार र.रु.79,34,046/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.64,03,588.17/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ –महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.10.01.2025 |
| 5. | आ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.10.01.2025 ते दि.16.01.2025 |
| 6. | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.31.01.2025 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती | प्रथम ( 01) |
| 7. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मे.मोना कस्ट्रक्शन | र.रु.62,56,305.65 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.30% कमी दराने |
| 2. | श्री.कुरैशी मोहम्मद कफिल अब्दुल जलील | र.रु.61,31,435.68 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25% कमी दराने |
| 3. | काझी मुबारिजुद्दीन | र.रु.62,75,516.41 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत उपलब्ध तरतुद र.रु.80.00 लक्ष मधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | --- |

| | | |
|---|---|---|
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक श्री.कुरैशी मोहम्मद कफिल अब्दुल जलील,कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा रक्कमेपेक्षा 4.25% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.61,31,435.68/- (GST वगळुन) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. | | |

**ठराव क्रमांक 1828/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा मुख्यालयातील मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.गटनेता व मा.विरोधी पक्षनेता यांच्या दालनाचे नुतनीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.79,34,046/- (18% GST वगळुन) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक श्री.कुरैशी मोहम्मद कफिल अब्दुल जलील, कंत्राटदार हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 4.25% कमी दराने म्हणजेच र.रु.61,31,435.68/- (GST वगळुन) चे प्राप्त असुन सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1829/2025:-** **(कार्य.अभि.जलनि:स्सारण विभाग)** **(दि.21.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गांधीनगर येथे उभारण्यात येणाऱ्या Decentralised STP चे स्थळ बदल करुन स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान येथे उभारणेस मा. सर्व साधारण सभा ठराव क्र.1598/2024 दि.23.09.2024 अन्वये मान्यता प्राप्त आहेत. सदर ठिकाणी प्रक्रियायुक्त पाण्याचा संभाव्य वापर लक्षात घेता या ठिकाणी प्रक्रिया युक्त पाण्यास Tertiary Treatment देणे आवश्यक आहे. या करिता अंदाजपत्रकात बदल करुन सुधारित अंदाजपत्रकात 2 ML.D क्षमते ऐवजी 1.5 MLD क्षमतेचा STP घेण्यात आला आहे. तसेच या सुधारित अंदाजपत्रकात Tertiary Treatment Including Electromechanical Equipments and Media समाविष्ट करण्यात आले आहेत. यानुसार अं.प.र.रु.3,27,40,093/- ऐवजी सुधारीत अंदाजपत्रक र.रु.3,26,51,850/- एवढे झाले आहे. या सुधारीत अंदाजपत्रकासाठी मुळ अंदाजपत्रकाकरीता वापरण्यात आलेली सा.बां./मजीप्रा विभागाची दरसुची सन 2023-24 मधील दर विचारात घेण्यात आले आहेत.

करिता स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान 1.5 MLD क्षमतेचा Decentralised STP Tertiary Treatment सह उभारणे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.3,26,51,850/- मा.सर्व साधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1829/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान 1.5 MLD क्षमतेचा Decentralised STP Tertiary Treatment सह उभारणे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.3,26,51,850/- यांस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1830/2025:-** **(उद्यान विभाग)** **(दि.21.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.03 अंतर्गत नेहरुनगर युनुस कॉलनी कटकट गेट रेखांकनातील खुल्या जागेत सरंक्षित भिंत बांधुन वॉकींग ट्रॅक तयार करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2021-22 च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय र.रु.38,07,934/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2024-25 च्या अर्थसंकल्पातील क्र.6-2 शहर विकास अंतर्गत विविध विकास कामे विकास योजना अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे Other capital works 3 Sr no.02 नुसार चालु आर्थिक वर्षाच्या नविन कामासाठी तरतुद र.रु.578.02 लक्ष कामासाठी ठेवण्यात आली आहे. विकास कामे करण्यासाठी हया कामाचे समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1830/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.03 अंतर्गत नेहरुनगर युनुस कॉलनी कटकट गेट रेखांकनातील खुल्या जागेत सरंक्षित भिंत बांधुन वॉकींग ट्रॅक तयार करणे बाबत या कामासाठी अं.प.र.रु.38,07,934/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1831/2025:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.25.02.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, “आम्हाला खेळु द्या” अभियाना अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील खालील ठिकाणी असलेले खेळाच्या मैदानासाठीचे आरक्षणतील क्रिडांगण सिध्दशिघ्रगणकाप्रमाणे येणारे भाडे रक्कमेपैकी 50% भाडे रक्कम आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी इच्छुक व्यक्ती/संस्था यांच्याकडून स्वारस्य (E.O.I.) जाहिर प्रगटन मागविण्यात येत आहे. क्रिडांगणाच्या जागांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | ठिकाण | भाडेतत्वावर द्यावयाचे क्षेत्र | सिध्दशिघ्र गणका प्रमाणे येणारे वार्षिक भाडे | सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे येणारे 50% वार्षिक भाडे |
|---|---|---|---|---|
| 1. | सिडको एन-7, रामलिला मैदाना समोरील खुली जागा | 744.00 चौ.मी. | र.रु.17,14,176/- | र.रु.8,57,088/- |

**स्वारस्य प्रगटनाच्या (E.O.I.) अटी शर्ती खालील प्रमाणे**

1. सदर स्वारस्य जाहिर प्रगटन (E.O.I.) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होईल.
2. महानगरपालिका मालकीच्या व ताब्यातील मैदाने विकास करुन 10 वर्षापेक्षा अधिक नसेल या अटीवर चालविणे करीता देण्यात येत आहे.
3. सदरील ठिकाणी केवळ क्रिडा/खेळणेसाठी वापर करणे बंधनकारक राहील.
4. या ठिकाणी करण्यात येणारे टर्फ/मैदानाचे स्वरुप तात्पुरते किंवा कायम स्वरुपी बांधण्यास/विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम-1966 आणि विकास नियंत्रण नियमावली (UDCPR) च्या नियमावलीनुसार महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाची परवानगी बंधनकारक असेल.
5. सदरील जागा ही “आम्हाला खेळु द्या” या अभियानाअंतर्गत खेळण्यास प्रोत्साहन मिळावे या करीता भाडेकरारनामा देण्यात येणार असल्याने व याचा वापर व्यापारी तत्वावर होणार नाही ही बाब विचारात घेता सिध्दशिघ्रगणकाच्या 50 टक्के भाडे आकारणी करण्यात येईल.
6. स्वारस्य (E.O.I.) भरण्यासाठी क्रिडा क्षेत्रात काम पाहणारी सामाजिक/क्रिडा क्षेत्रातील संस्था अथवा खेळाडू पात्र असतील.
7. पात्रतेचे निकष पुढील प्रमाणे आहेत.
   I. संस्था असल्यास किमान 03 वर्षांचा सामाजिक अथवा क्रिडा विषयक कामाच अनुभवाचे कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
   II. खेळाडू असल्यास जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय सहभागाचे प्रमाणपत्रे, पुरस्कार सादर करावीत.
   III. संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचे पॅनकार्ड, मागील 03 वर्षाचा वार्षिक लेखा आढावा पत्रक Balance Sheet /IT Return लेखापाल प्रमाणित देणे आवश्यक आहे.
8. वरील सर्व बाबींचा तांत्रिक लिफाफा प्रथम तपासण्यात येईल.
9. पात्र संस्था/व्यक्तीस सादरीकरणासाठी बोलाविण्यात येईल.

10. क्रिडांगणावर कोणते उपक्रम/खेळ खेळण्यास येणार आहे. यासाठी लागणारा खर्च व विकास कामाची माहित प्रिबीड मिटींगमध्ये द्यावी लागेल.
11. सादरीकरणात दोन मुख्य बाबी इंतभुत असणे आवश्यक आहे. संभाव्य क्रिडांगण बाबतच्या योजना,विकासाचा प्रारुप आराखडा, अंदाजे खर्च नमुद करावा.
12. सादरीकरणानंतर गुणवत्तेनुसार पात्र संस्थाचे आर्थिक लिफाफे उघडले जातील.
13. संबंधीतास निश्चित भाडे रक्कम दर माह आकारण्यात येईल. तसेच प्रकल्प किंमतीच्या अंदाजीत रक्कमेच्या 25% रक्कम सुरक्षा ठेव करारनामा पुर्वी महानगरपालिकेकडे 10 वर्षांकरीता अनामत रक्कम आर्थिक लिफाफ्यामध्ये नमुद करावी लागेल.
14. जागेचा ताबा मिळाल्यानंतर 01 वर्षाच्या कालावधीमध्ये विकासकामे पुर्ण बंधनकारक असेल.
15. 01 वर्षे किंवा प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करुन वापर सुरु केल्याच्याप्रथम दिनांकापासुन भाडेपट्टा कालावधी सुरु होईल. भाडेपट्टा करारनामा करण्यापुर्वी 06 महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणुन भरणा करावी लागेल.
16. निश्चित करण्यात आलेल्या भाडे रक्कमेत दर 03 वर्षांनी 10% नैसर्गिक भाडेवाढ होईल.
17. भाडेपट्टा सुरु झाल्यानंतर अर्धी अनामत रक्कम परत केली जाईल. उर्वरित अर्धी अनामत रक्कम 10 वर्षानंतर जागेचा ताबा घेताना परत करण्यात येईल.
18. तात्कालीन नियमानुसार आणि समुचिक प्राधिकरणाच्या मान्यतेने संबंधीताने विनंती केल्यास महानगरपालिकेच्या धोरणानुसार भाडेपट्टा वाढवून दिला जाईल.
19. इतर अटी शर्ती करारनामामध्ये नमुद करण्यात येईल.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील विविध ठिकाणी असलेले खेळाचे मैदानेवरील अटी शर्तीस अधिन राहून भाडेतत्वावर देणेसाठी स्वारस्य (E.O.I.) प्रस्तावाद्वारे दर मागविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1831/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील सिडको एन-7 रामलिला मैदानासमोरील खुली जागा वरील अटी शर्तीस अधिन राहून सिध्द शिघ्र गणका प्रमाणे येणारे भाडे रक्कमेपैकी 50% भाडे रक्कम आकारणी करुन इच्छुक व्यक्ती/संस्था यांना भाडे तत्वावर देणेसाठी स्वारस्य (E.O.I.) जाहिर प्रगटनाद्वारे दर मागविण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1832/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.25.02.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालया समोरील बंद पडलेली भाजी मंडईच्या इमारतीमधील सर्व गाळे छोटे असल्याने 10 गाळे जिजाऊ महिला बचत गटास प्रती माह र.रु.1,000/- प्रमाणे देणेसाठी विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने जिजाऊ महिला बचत गट नोंदणीकृत बचत गट असल्याने व महिलांना सक्षमीकरण करण्याच्या दृष्टिने 10 गाळे प्रती गाळा प्रती माह र.रु.1,000/- व इतर कर वेगळे आकारणी करुन 03 वर्षाच्या कालावधी करीता भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1832/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालया समोरील बंद पडलेली भाजी मंडईच्या इमारतीमधील 10 गाळे जिजाऊ महिला बचत गटास महिला सक्षमिकरणाच्या दृष्टिने प्रतिगाळा प्रतीमाह र.रु.1,000/- व इतर कर वेगळे आकारणी करुन 03 वर्षाच्या कालावधी करीता भाडेतत्वावर देणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1833/2025:- (एनयुएचएम विभाग)** **(दि.25.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे दि.18.12.2022 च्या पत्राच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटी महाराष्ट्र राज्य यांच्या 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके करीता 3 ठिकाणी Health Wellness Center (HWC) याकरीता खाजगी मालकीच्या इमारतीमध्ये आरोग्य सेवा सुरु करण्याचे प्रस्तावीत आहे. मालमत्ता विभागामार्फत जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येऊन 3 ठिकाणी भाडेतत्वावरील इमारती उपलब्ध आहे. इमारत भाडे हे 15 व्या वित्त आयोगामार्फत उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून अदा करण्यात येणार आहे.

मालमत्ता विभागामार्फत भाडेतत्वावरील रेडिकरेकनरनुसार भाडे निश्चिती करुन देण्यात आलेली आहे. खालीलप्रमाणे भाडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जागा मालकीचे नाव | HWC चे नाव | जागा स्के.फुट | प्रति माह भाडे |
|---|---|---|---|---|
| 1. | श्रीमती शुभांगी बढे | पिसादेवी रोड हर्सुल | 107.3 | र.रु.25,340/- |
| 2. | श्री.महेश दुबे | एन-9 | 40.25 | र.रु.13,370/- |
| 3. | श्री.शफीक बेग | हर्सुल | 80.63 | र.रु.15,596/- |

या व्यतिरीक्त प्रतिमाह लाईटबील उपलब्ध अनुदानातून (15 व्या वित्त आयोगातून) अदा करावयाचे आहे. तसेच इतर सर्व प्रकारचे टॅक्स भरण्याची जबाबदारी इमारत मालकाकडे राहील. प्रस्तावित केल्याप्रमाणे यांच्या मालकीची बांधीव इमारत आरोग्य केंद्रासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लागेल तेवढ्या कालावधीसाठी व उपरोक्त तक्त्याप्रमाणे अ.क्र.1 ते 5 मध्ये दर्शविल्यानुसार प्रतिमाह मासिक भाडे अदा कराण्यात येईल. तसेच 11 महिन्यानंतर 10 टक्के भाडेवाढ करण्यात येईल. इमारत ताब्यात घेतल्यानंतर इमारतीची देखभाल व दुरुस्ती उपलब्ध अनुदानातून करावी लागणार आहे.

करीता, संबंधीत इमारत मालकासोबत वरील अटी शर्तीच्या अधिन राहून रितसर करारनामा करुन घेण्याबाबत व सदरील उपरोक्त 3 इमारती आरोग्य केंद्राकरीता भाडेतत्वावर घेण्याबाबत व सदरील भाडे फक्त शासनामार्फत 15 व्या वित्त आयोगाच्या एनएसएम (NHM) मार्फत अध्यक्ष, जिल्हा आरोगय समिती (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर) यांच्याकडुन उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून अदा केले जाईल. मनपा फंडावर कोणतेही आर्थिक दायित्व निर्माण करता येणार नाही. प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1833/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तक्त्यामधील अ.क्र. 1 ते 3 इमारती जिल्हा आरोग्य समिती 15 व्या वित्त आयोगामार्फत भाडेतत्वावर घेण्यास व प्रस्तावामधील रकाना क्र.5 मध्ये नमुद प्रतिमाह भाडे व 11 महिन्यानंतर 10 टक्के भाडेवाढ व 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस लागेल तेवढ्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी मंजुरी देण्यात येते. तसेच इमारत ताब्यात घेतल्यानंतर इमारतीची देखभाल व दुरुस्ती उपलब्ध अनुदानातून करावी लागणार आहे. तसेच विद्युत देयक 15 व्या वित्त आयोग एनएचएम मार्फत व सर्व प्रकारचे कर इमारत मालकामार्फत अदा करण्यात यावे. सदरील भाडे 15 व्या वित्त आयोग एनएचएम मार्फत उपलब्ध अनुदानातून अदा केले जाईल. महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व राहणार नाही. सर्व संबंधीत इमारतधारका समवेत करारनामा करण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1834/2025:- (झोन क्र.2,आस्थापना-1 विभाग)** **(दि.25.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.निलेश अशोक पगारे, (सफाई मजुर), झोन कार्यालय-2 (जी) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या मुलीचे नामे दिव्यांशी निलेश पगारे यांच्या (तब्येत ठिक नसल्यामुळे) यावर वेदांत बाल रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला

असुन र.रु.1,81,294/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख एक्याऐंशी हजार दोनशे चौऱ्यांन्नव फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (तब्येत ठिक नसल्यामुळे) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,81,294/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.45,994/- वजा जाता र.रु.1,35,300/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.1,21,770/- इतकी असुन व 5% र.रु.9,064/- इतकी असुन संबंधीतास एकुण निव्वळ देय र.रु.1,12,706/-एवढी येते.

संबंधीताने वेदांत बाल रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2 मंत्रालय मुंबई 32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट (अ) शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ठ खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली नाही.

दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीतास अदा करणे योग्य.

करीता, श्री.निलेश अशोक पगारे, (सफाई मजुर), झोन कार्यालय-2 (जी) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95,000/-(अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1834/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.निलेश अशोक पगारे, (सफाई मजुर), झोन कार्यालय-2 (जी) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या मुलीचे नामे दिव्यांशी निलेश पगारे यांच्या (तब्येत ठिक नसल्यामुळे) यावर वेदांत बाल रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. एकुण केलेला खर्च र.रु.1,81,294/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.45,994/- वजा जाता र.रु.1,35,194/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या रक्कमेच्या 90% र.रु.1,21,770/- इतकी असुन व 5% र.रु.9,064/- इतकी असुन संबंधीताने एकुण निव्वळ देय र.रु.1,12,706/-एवढी येते. दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्न्व हजार फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1835/2025:-</u> (कार्य.अभि.इमारत व उद्यान विभाग)** **(दि.27.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको बस स्टँड जवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक SSR 2022-23 नुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.28,02,500/- चे अंदाजपत्रक व ठरावास मा.प्रशासक महोदय यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी मा.प्रशासक महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने दिलेल्या निर्देशानुसार इतिवृत्तास मान्यता प्राप्त झाली असुन त्यानुसार यापुढील निविदेची कार्यवाही संबंधीत विभागाने त्वरीत करणे बाबत आदेशित केले आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र झाल्या. पात्र निविदा उघडण्यात आल्या असता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.रविराज आर्ट क्रिशन्स | अं.प.दरापेक्षा 9.00% |
| 2. | मे.मॉडल आर्ट वर्क्स | अं.प.दरापेक्षा 0.60% |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाज पत्रकीय दरापेक्षा 9.00% कमी दराची निविदा मे.रविराज आर्ट क्रिएशन्स यांची आहे. तरी मे.रविराज आर्ट क्रिशन्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.00% कमी दराची निविदा मंजुरी बाबतचा मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवावचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1835/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको बस स्टँड जवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे या कामाची मे.रविराज आर्ट क्रिएशन्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.00 टक्के कमी दराची निविदा मंजुरी बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1836/2025:- (मालमत्ता विभाग)** **(दि.28.02.2025)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा.स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सावंगी तलावात मस्त्य व्यवसाय करण्यासाठी निविदा मागविण्यात आलेली होती. मागविण्यात आलेल्या निविदेत 06 निविदा धारक प्राप्त झाले होते. प्राप्त 06 निविदाधारकांपैकी 03 निविदाधारकांनी अटीशर्ती प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केली असून 03 निविदाधारक तांत्रिक बिडमध्ये अपात्र ठरले आहे.

त्यानुषंगाने तांत्रिक बिडमध्ये पात्र 03 निविदाधारकांचे आर्थिक बिड खुले करण्यात आले असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नाव | प्राप्त निविदा | आधारभुत वार्षिक रक्कम | निविदेत नमुद वार्षिक दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री.फय्युम हसन पठाण | 03 | र.रु.4,49,213/- | र.रु.7,75,000/- |
| 2. | श्रीगणेश महिला कल्याण मंडळ | | | र.रु.7,11,000/- |
| 3. | श्री.जावेद लड्डुखान पठाण | | | र.रु.7,11,000/- |

उपरोक्त प्रमाणे मागविण्यात आलेल्या सावंगी तलाव मत्स्य व्यवसायासाठीच्या निविदेत श्री.फय्युम हसन पठाण यांनी सर्वाधिक वार्षिक दर र.रु.7,75,000/- (जी.एस.टी.वगळून) निविदेत नमुद केले आहे. त्यानुषंगाने निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 03 वर्षाचा करारनामा करण्यासाठीच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1836/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सावंगी तलाव मत्स्य व्यवसायासाठीच्या निविदेत श्री.फय्युम हसन पठाण यांनी सर्वाधिक वार्षिक दर र.रु.7,75,000/- (जी.एस.टी.वगळून) निविदेत नमुद केले आहे. त्या अनुषंगाने श्री.फय्युम हसन पठाण यांच्या सोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 03 वर्षाचा करारनामा करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1837/2025:- (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.28.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.13 भीमनगर उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील 15 मी.रुंद विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.3,09,38,997/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1539/2024 दि.16.08.2024 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.2,48,15,366.95/- च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पोत्र L1 निविदाधारक मे.गोल्ड कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 2.89% कमी दराने म्हणजेच र.रु.2,30,57,481.98/- (GST वगळून) चे प्राप्त असुन सदर काम संबंधीत कंत्राट दाराकडून करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ :- टेन्डर क्र.आय.डी. 2024_ AMCA_1089595_01 सन 2024-2025

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.13 भीमनगर उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील 15 मी.रुंद विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीटीकरण करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1539/2024 दि.16.08.2024 नुसार र.रु.3,09,38,997/-यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.2,48,15,366.95/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ – महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.21.08.2024 |
| 5. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.21.09.2024 ते दि.27.09.2024 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.06.02.2025 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | व्हि.टी.पाटील इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर | र.रु.2,33,87,519.05 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.50% कमी दराने |
| 2. | मे.गोल्ड कन्स्ट्रकशन | र.रु.2,30,57,481.98 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.89% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सन 2024-25 केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना भाग-05 अंतर्गत मनपा क्षेत्रात कॉँक्रीट /डांबरी कामे करणे मधील तरतुदी र.रु.40.00 कोटी मधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक मे.गोल्ड कस्ट्रक्शन, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 2.89% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.2,30,57,481.98/- (GST वगळुन) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1837/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.13 भीमनगर उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील 15 मी.रुंद विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.3,09,38,997/- (18% GST सह) चे

तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक मे.गोल्ड कस्ट्रक्शन, कंत्राटदार, हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर रक्कमेपेक्षा 2.89% कमी दराने म्हणजेच र.रु.2,30,57,481.98/- (GST वगळुन) चे प्राप्त असुन सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1838/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.28.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरुप भरती केलेल्या घड्याळी तासिका तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपातील माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात दि.16.11.2024 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्ट्या) लागे पर्यंत दर 29 दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात यावी.

सद्यस्थितीत खालील काळानुरुप भरती केलेल्या तासिका तत्वावरील खालील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ. क्र. | शाळेचे नाव | घड्याळी तासिका त.मा.शिक्षकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापना चे विषय | प्रति तास |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मा.वि.बेगमपुरा | श्रीमती सुलाखे निलीमा | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 2. | मा.वि.मिटमिटा | श्री.म्हस्के दिनेश जगन्नाथ | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान | र.रु.180/- |
| 3. | मा.वि.मिटमिटा | श्रीमती खरात निता मोतीराम | बी.ए.बी.एड. | मराठी | र.रु.180/- |
| 4. | मा.वि.किराडपुरा नं.1 | श्री.खान शहेबाज खुदायार खान | एम.ए.बी.एड. | उर्दु | र.रु.180/- |
| 5. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्री.शेख जफर | बी.एस्सी.बी.एड. | उर्दु भुगोल | र.रु.180/- |
| 6. | मा.वि.शहाबाजार | श्रीमती पटेल हुमैरा अ.बारी | बी.एस्सी.बी.एड. | गणित | र.रु.180/- |
| 7. | मा.वि.सिडको एन-7 | श्री.जाधव व्यंकट भिमराव | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 8. | मा.वि.नारेगाव | श्री.श्रीकांत किसनराव शिंदे | एम.एस्सी.बी.एड | विज्ञान | र.रु.180/- |
| 9. | मा.वि.नारोगाव मराठी | श्री.मिर्झा अजमल बेग | एम.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 10. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती सुरेखा द.आक्षे | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान | र.रु.180/- |
| 11. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव | बी.ए.बी.एड. | हिंदी इतिहास | र.रु.180/- |
| 12. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री.इंगळे प्रकाश विष्णु | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 13. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव | बी.ए.बी.एड. | हिंदी | र.रु.180/- |
| 14. | मा.वि.बन्सीलालनगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 15. | मा.वि.चिकलठाणा | श्रीमती फुलंब्रीकर अरुणा प्रभाकर | बी.एस्सी.बी.एड. | गणित | र.रु.180/- |
| 16. | मा.वि.बनेवाडी | श्री.सोनवणे राजेंद्र कडूबा | बी.एस्सी.बी.एड. | गणित | र.रु.180/- |
| 17. | मा.वि.सिडको एन-7 | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव | एम.ए.बी.एड. | मराठी | र.रु.180/- |
| 18. | मा.वि.हर्सुल | श्री.संजय शंकर मोकळे | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | र.रु.180/- |
| 19. | मा.वि.नारेगाव | श्रीमती भिलेगावकर प्रेरणा | बी.ए.बी.एड. | मराठी | र.रु.180/- |
| 20. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव | बी.ए.बी.एड. | मराठी इतिहास | र.रु.180/- |

वरील प्रमाणे शिक्षक त्यांच्या नावासमोर दर्शविलेले अध्यापनाचे विषय नियुक्त केलेल्या शाळेत अध्यापन करतील. कमाल तासांची मर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही. याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास किंवा शाळेच्या कामकाजाच्या पुर्ण वेळ (5 तास) शाळेत उपस्थित राहून काम केल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व त्यांनी प्रमाणित केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

उपरोक्त तक्त्यामधील अ.क्र.9 वरील श्री.अजमल बेग, मा.शा.नारेगाव उर्दु माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस द्वितीय शैक्षणिक सत्रात मुदतवाढ देण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तद्नंतर नियुक्ती मुदतवाढ देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.13 वरील श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव या आजारी असल्यामुळे अध्यापन कौशल्य तपासणी समितीने घेतलेल्या मुलाखतीत अनुपस्थित होत्या, त्यामुळे सदरशिक्षिका कामावर रुजु झाल्यानंतर अध्ययापन कौशल्य व विषयज्ञान तपासणी करुन मा.आयुक्त यांची मान्यता घेऊन तद्रंतर नियुक्ती मुदतवाढ देणे बाबत कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.15 वरील श्रीमती फुलंब्रीकरअरुणा प्रभाकर माध्यमिक शाळा चिकलठाणा येथे गणित विषयाचा शिक्षक नसल्यामुळे नियुक्ती मा.शा.चिलकठाणा येथे मुदतवाढ देणे योग्य.

उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.9 व 13 वरील शिक्षकांना वगळून उर्वरित शिक्षकांच्या नियुक्तीस सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्र दि.16.11.2024 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागे पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1838/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, काळानुरुप भरती केलेल्या अ.क्र.1 ते 20 वरील शिक्षकांपैकी अ.क्र.9 व 13 वरील शिक्षकांना वगळून उर्वरित घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेले अध्यापनाचे विषय नियुक्त केलेल्या शाळेत अध्यापन करतील. कमाल तासांच्या ठरवुन दिलेल्या मर्यादेप्रमाणे तसेच त्यापेक्षा कोणत्याही तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदान करणे, याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरीक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यासह वरील एकुण 18 कर्मचाऱ्यांना सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात प्रथम सत्रात दि.16.11.2024 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागे पर्यंत दर 29 दिवसांनी एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस मुदतवाढ देण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1839/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.28.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर भरती केलेल्या घड्याळी तासिका तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपातील माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस सन 2024-25या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात दि.16.11.2024 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

सद्यस्थितीत खालील रितसर प्रक्रियेने भरती केलेले तासिका तत्वावरील खालील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ क्र | शाळेचे नाव | घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | प्रति तास |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती तेहरीम शे. बाबर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 2 | मा.वि. हर्सुल (म.) | श्री.हिरेकर सुनिल दौलतराव | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 3 | मा.वि. किराडपुरा नं.1 | श्रीमती शेख मावीया तबस्सुम शे.नजमुद्दिन | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 4 | मा.वि. किराडपुरा नं. 1 | श्रीमती सय्यदा शाहीन अंजुम तौफिक अली | बी.ए. बी.एड. | इतिहास (सा.शास्त्रे) | 180/- |
| 5 | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती पवार किरण भारत | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 6 | मा.वि. सिडको एन-7 | श्रीमती राठोड मंजुश्री गणपतराव | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 7 | मा.वि. सिडको एन-7 | श्रीमती देशमुख वैशाली दिनकर | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 8 | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्री.उमेश अशोक गायकवाड | बी.ए. बी.एड. | मराठी | 180/- |
| 9 | मा.वि.हर्सुल (म) | श्रीमती पाटील वैशाली कैलास | बी.ए. बी.एड. | मराठी | 180/- |
| 10 | मा.वि. चिकलठाणा | श्री.पठाण जावेद खान साहेब खान | बी.ए. बी.एड. | हिन्दी | 180/- |
| 11 | मा.वि. मुकूंदवाडी | श्रीमती ढोबळे राखी राम | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 12 | मा.वि. चिकलठाणा | श्रीमती मनिषा बळीराम शिंदे | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 13 | मा.वि. हर्सुलगाव मराठी | श्रीमती कुऱ्होडे सुमन संतोष | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 14 | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती चौधरी संगीता लक्ष्मण | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 15 | मा.वि. बन्सीलालनगर | श्री काकडे रोहिदास मुरलीधर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 16 | मा.वि. बनेवाडी | श्री.उन्हाळे प्रकाश भगवान | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | 180/- |
| 17 | मा.वि. मिटमिटा | श्री.नन्नवरे श्रीकांत सोमकांत | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |
| 18 | मा.वि. बनेवाडी | श्री.भुतेकर भाग्येश्वर श्रीकिशन | बी.ए.बी.एड. | मराठी | 180/- |
| 19 | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती वामन सरीता रामकृष्ण | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | 180/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती जंजाळ उज्वला परसराम | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 21 | मा.वि. नारेगांव | श्रीमती रेखा दशरथ महाजन | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 180/- |

वरील प्रमाणे शिक्षक त्यांच्या नावासमोर दर्शविलेले अध्यापनाचे विषय नियुक्त केलेल्या शाळेत अध्यापन करतील. कमाल तासांची मर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही, याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास किंवा शाळेच्या कामाकाजाच्या पुर्ण वेळ (5 तास) शाळेत उपस्थित राहून काम केल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व त्यांनी प्रमाणीत केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल,

करीता, वरील माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात दि.16.11.2024 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागे पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1839/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यदत असलेल्या रितसर प्रक्रियने भरती केलेल्या प्रस्तावातील अ.क्र.01 ते 21 घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक श्क्षिकांना त्यांच्या नावा समोर दर्शविलेले अध्यापनाचे विषय नियुक्त केलेल्या शाळेत अध्यापन करावे. कमाल तासांच्या ठरवून दिलेल्या मर्यादेप्रमाणे तसेच त्यापेक्षा कोणत्याही घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा न करणे, याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरीक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यासह वरील एकुण 21 कर्मचाऱ्यांना सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात दि.16.11.2024 ते 30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागेपर्यंत रितसर भरती केलेल्या घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्तीस मुदतवाढीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1840/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.28.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माध्यमिक शाळा इयत्ता 9 व 10 वी शालेय व्यवस्थापन समितीने प्रस्तावित केलेले घड्याळी तासिका तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपातील खालील माध्यमिक शिक्षकांना सन 2024-25 शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात दि.16.11.2025 ते दि.30.04.2025 (उन्हाळी सुट्टी) लागे पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव सादर.

| अ क्र | शाळेचे नाव | घड्याळी तासिका माध्यमिक शिक्षकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | प्रति तास |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मा.वि.बेगमपुरा | श्रीमती इंगळे आम्रपाली शेषराव | एम.ए.बी.एड. | मराठी व सामाजिक शास्त्र | 180/- |
| 2. | मा.वि.अशोक नगर | श्री.गणेश विलास देहाडे | एम.ए.बी.एड. | मराठी,इतिहास, भुगोल | 180/- |
| 3. | मा.वि.अशोकनगर | श्रीमती अनुराधा श्रीराम मोकासे | बी.एस्सी.बी.एड. | गणित | 180/- |
| 4. | मा.वि.अशोकनगर | श्रीमती मधुश्री श्रीकांत देवकाते | एम.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 180/- |
| 5. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्री.मोमीन फरहाना आरीफोद्दीन | एम.ए.बी.एड. | इंग्रजी | 180/- |
| 6. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्री.मोह.इरफान शेख मन्सुर | बी.एस्सी.बी.एड. | गणित | 180/- |
| 7. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्रीमती आस्मा बेगम मो.खाजा | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान, भुगोल | 180/- |
| 8. | मा.वि.किराडपुरा नं.1 | श्रीमती मोमीन अलमास मुस्तफा | बी.एस्सी.बी.एड. एम.ए.एम.एड | मराठी, इतिहास | 180/- |
| 9. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्री.कादरी स.शहा मुबश्शीर उलहक | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान, गणित | 180/- |
| 10. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्रीमती आफरीन बेगम शेख हनीफ | बी.एस्सी.बी.एड. | भुगोल | 180/- |
| 11. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्रीमती सबा नौशीन अलीम अहेमद | बी.ए.बी.एड. | इंग्रजी, इतिहास | 180/- |
| 12. | मा.वि.शहाबाजार उर्दु | श्रीमती सय्यद आसेमा सय्यद मुमताज | एम.एस्सी. बी.एड. | विज्ञान, भुगोल | 180/- |
| 13. | मा.वि.शहाबाजार उर्दु | श्रीमती अलमास निखत अजहर शेख | बी.ए.बी.एड. | इंग्रजी, भुगोल | 180/- |
| 14. | मा.वि.यशोधरा कॉलनी उर्दु | श्री.सय्यद जफर सय्यद अफसर | एम.ए.बी.एड. | इंग्रजी, इतिहास | 180/- |
| 15. | मा.वि.यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमत फातेमा जोहरा मौलवी मोहम्मद जकी | बी.एस्सी.बी.एड. | गणित, विज्ञान | 180/- |

| 1. | मे.एस.यु.बी.इंजिनियर्स वर्क्स | र.रु.50,30,343/- | 40,24,777.44 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.99% कमी दराने |
| 2. | मे.एस.ए.एस.इंजिनियर्स | र.रु.50,30,343/- | 41,60,093.66 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.30% कमी दराने |
| 3. | मे.रिलायबल इलेक्ट्रिकल्स | र.रु.50,30,343/- | 42,50,136.80 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.51% कमी दराने |
| 4. | मे.एच.के.मगर इलेक्ट्रिकल्स | र.रु.50,30,343/- | 44,88,575.06 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.77% कमी दराने |
| 5. | मे.पुजा इलेक्ट्रिकल्स वर्क्स | र.रु.50,30,343/- | 45,77,612.13 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.00% कमी दराने |

| **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | **शेरा** |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |

| | | |
|---|---|---|
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षका वर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय (जिल्हा वार्षिक योजना) |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |

उक्त निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.एस.यु.बी.इंजिनियरींग वर्क्स यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.99% कमी दराची आहे. तरी मे.एस.यु.बी.इंजिनियरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.99% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1855/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्मार्ट सिटी अंतर्गत नवीन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे गुलमंडी येथील जेथेलिया टॉवर जवळ असलेल्या विद्‌युत उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या स्थलांतरीत करणे बाबत (अंदाजपत्रकीय र.रु.56,81,292/-) या कामासाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी मे.एस.यु.बी.इंजिनियरींग वर्क्स यांची आहे. तरी मे.एस.यु.बी.इंजिनियरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.99% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1856/2025:-</u> (कार्य.अभि.पापु विभाग)** **(दि.11.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-5 जलकुंभ परिसरात कॉंक्रीट पेव्हमेंट करणे व पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप ड्रेन बांधणे.

संदर्भ:- Tender ID :- 2025_ AMCA_1134280_01

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप | विकास योजनेअंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, र.रु.1,08,80,700/- |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.91,00,254/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | www.mahatenders.gov.in 08.01.2025 |
| 5. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.28.01.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.30.01.2025 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 09 (नऊ) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | र.रु.62,78,265/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा-31.01% कमी दराने |
| 2. | श्री.प्रभाकर जी.मोहिते | र.रु.62,79,175/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -31.00% कमी दराने |
| 3. | मे.खुशी कन्स्ट्रक्शन | र.रु.63,00,106/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -30.77% कमी दराने |
| 4. | मे.रॉयल एंटरप्राईजेस | र.रु.67,09,617/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -26.27% कमी दराने |
| 5. | मे.गुडगे कन्स्ट्रक्शन | र.रु.68,43,391/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -24.80% कमी दराने |
| 6. | मे.पद्मावती कन्सट्रक्शन | र.रु.71,75,550/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -21.15% कमी दराने |
| 7. | मे.वंडर कन्स्ट्रक्शन | र.रु.72,92,943/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -19.86% कमी दराने |
| 8. | श्री.सिद्दीकी जलीसोद्दीन मोईजोद्दीन | र.रु.73,68,475/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -19.03% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 होय |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद आहे काय? | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय?<br>अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

तरी विषयांकीत कामाची पहिल्या वेळेस निविदा मागविली असता, पात्र आठ निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा -31.01% कमी दराची प्राप्त आहे. तरी मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा -31.01% कमी दराची म्हणजेच र.रु.62,78,265/- रक्कमेचे काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव क्रमांक 1856/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-5 जलकुंभ परिसरात कॉंक्रीट पेव्हमेंट करणे व पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप ड्रेन बांधणे बाबत या कामाची ई-निविदा मागविली असता सर्वात कमी दराची निविदा मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा -31.01% कमी दराची (र.रु.62,78,265/-) असुन सदर निविदेस व करारनामा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1857/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.17.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1437/2024 दि.25.06.2024 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2267 दि.02.0.2024 अन्वये दि.05.06.2024 ते दि.04.12.2024 या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | र.रु.525/- |
| 2. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | र.रु.525/- |

तथापि, उक्त आदेशाची मुदत दि.04.12.2024 रोजी संपलेली आहे. तसेच उक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत संबंधीत शाखा प्रमुख यांच्याकडून पत्र प्राप्त झालेले आहेत.

त्यानुषंगाने श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे, संगणक ऑपरेटर व श्री.सतिश राम जाधव, वाहन चालक या 02 कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.09.12.2024 ते दि.08.06.2025 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1857/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे, संगणक ऑपरेटर व श्री.सतिश राम जाधव, वाहन चालक या 02 कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी

दि.09.12.2024 ते दि.08.06.2025 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1858/2025:-** **(उद्यान विभाग)** **(दि.17.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्क चा एक भाग/उपांग असलेल्या "आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAH India)" यांनी दि.03.12.2024 च्या पत्रान्वये बेगमपुरा स्मशानभुमी समोरील अंतर्गत पोच रस्त्यास लागुन मोकळ्या जागेवर जैवविविधता पार्क उद्यान स्वखर्चाने विकसीत करण्याचा प्रस्ताव दिला आहे. AKAH India यांनी जैविविधता पार्क/उद्यान कामांतर्गत (1) Waste Disposal System (2) Benches and Seating Arrangements with Grass Roof (3) Water Features- Small Ponds (4) Water Features-Lotus Ponds (5) Water Features-Waterfall (6) Fencing- Precast wall with Paint (7) Signage and Interpretive Boards (8) Plantation of Native Trees (Saplings) (9) Ornamental flowers Garden (10) Pathway Construction (Gravel, Stone, Pevar Block) (11) Irrigation System (Drip, Sprinkler) (12) Plantation of Shrub and Ground Covers (Lawn) (13) Solar street light (14) Medicinal/ Herbal Garden (15) Entrance Gate (16) Bambu Plants (Internal side of Fencing) (17) Butterfly Garden (18) Toilet with water tank and tap system (19) Land Preparation (Clearing, Levelling) (20) Soil Enhancement-Black Soil (21) Soil Enhancement-Vermi Compost (22) Soil Enhancement- Manure इत्यादींचा विकास करणार असल्याचे दि.03.03.2025 च्या पत्रान्वये कळविले आहे.

मंजूर विकास योजना नुसार प्रस्तावीत जागेचा वापर अ.क्र.117 "Garden" तसेच अस्तित्वातील "Cremation Ground" असे दर्शविला आहे. प्रस्तावीत विकास हा जायमोक्यावरील स्मशानभुमी शेडच्या उत्तर बाजुस असलेल्या अंदाजे 4500 चौ.मी. मोकळ्या जागेवरील आहेत. सदर जागेच्या पूर्व व उत्तर बाजुस वळसा घेऊन पोच रस्ता जातो. त्यामुळे अस्तित्वातील स्मशानभुमीस बाधा न येऊ देता जैवविविधता पार्क/उद्यान विकसीत करण्याचा प्रस्ताव आहे.

करीता बेगमपुरा स्मशानभुमी समोरील अंतर्गत पोच रस्त्यास लागुन मोकळ्या जागेवर स्वखर्चाने जैवविविधता पार्क/उद्यान विकसीत करणेसाठी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAH India) यांना खालील अटी शर्तीस अधीन राहुन परवानगी देण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

1. प्रस्तावीत कामाच्या ड्रॉईंग व डिझाईन ला महानगरपालिकेची मंजुरी घेऊनच काम करणे.
2. स्थापत्य काम महानगरपालिका अभियंत्याच्या निगराणी खाली तर, Horticulture work उद्यान सहाय्यक यांच्या निगराणी खाली पुर्ण करणे.
3. जैवविविधता पार्क/उद्यान विकसीत करण्याचे काम 18 महिने कालावधी पर्यंत पुर्ण करणे. पार्क/ उद्यान विकसीत झाल्याच्या तारखे पासुन पुढील एक वर्ष संगोपन, देखभाल व दुरुस्ती करणे. या कालावधीनंतर जायमोक्यावरील सर्व स्ट्रक्चर सह पार्क उद्यान महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे.
4. जैवविविधता पार्क/उद्यान विकसीत करणे अंतर्गत अन्य सर्व साहित्य, वस्तु, मनुष्यबळ व इतर सर्व खर्च विकासकास करावा लागेल.
5. स्थापत्य कामांसह Horticulture work अंतर्गत रोपे, माती, व इतर साधन सामुग्री आणणे, लागवड करणे तसेच लागवडीसाठी लागणारे औषधी, खत, कापणीचे साहित्य, मजुर यासाठी येणारा सर्व खर्च विकासक यांनी करावा.
6. करार कालावधीत कामे करताना प्रचलीत कामगार कायदे पालन करणे.
7. सदर काम व त्याचे पालकत्व हे अहस्तांतरणीय असून, विकासक यांना हे काम/पालकत्व अन्य कोणाकडे ही हस्तांतरीत करता येणार नाही.
8. विकासक यांचेकडून पार्क/उद्यान विकसीत करण्याचे पुर्ण झाल्यानंतर, सदर ठिकाणी त्यांना केवळ आपली संस्था/कंपनी/फर्म ची छोटीशी जाहीरात/फलक लावता येईल. आर्थिक उत्पन्न मिळविणे साठी वा इतर कोणत्याही कारणास्तव त्रयस्थ संस्था/कंपनी/फर्म इ.ची जाहीरात/फलक लावता

येणार नाही. तसेच विकासक करणार असलेल्या सौंदर्याकरणामुळे कोणाही नागरिकाची कोणत्याही प्रकारे राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक भावना दुखावली जाणार नाही अशा प्रकारे जागेचा विकास/सौंदर्याकरण करावे लागेल.

9. विकासक यांना जागेचा वापर कोणत्याही व्यापारी/आर्थिक फायद्यासाठी करता येणार नाही.
10. ठिकाण/परिसर विकसीत करताना सार्वजनिक वाहतूक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता विकासक यांनी घ्यावी.
11. नमुद प्रयोजनासाठी विकासकास प्रायोजकत्व देण्यात येत आहे. जागेवर प्रायोजकाचा मालकीहक्क राहणार नाही/देण्यात येणार नाही/सांगता येणार नाही. जागेची मालकी महानगरपालिकेची राहील.
12. करार कालावधीत कोणताही वाद उद्भवल्यास पालिका आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर करण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतीम राहील आणि तो उभय पक्षकारांना बंधनकारक राहील. न्यायीक स्वरुपाचे वादांसाठी छत्रपती संभाजीनगर न्यायीक क्षेत्र राहील.
13. कोणत्याही कारणावरुन विकासकाचे काम समाधानकारक न वाटल्यास कामात सुधारणा करण्या संदर्भात 15 दिवसाची नोटीस देण्यात येईल. तरीही कामात सुधारणा न झाल्यास एक महिन्याची नोटीस देऊन सदर करार संपुष्टात आणण्यात येईल.

करीता उक्त अटी शर्तीस अधीन राहुन बेगमपुरा स्मशानभूमी समोरील अंतर्गत पोच रस्त्यास लागुन मोकळ्या जागेवर स्वखचनि जैवविविधता पार्क उद्यान विकसीत करणेसाठी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAH India) परवानगी देणे तसेच कामांतर्गत आवश्यकतेनुसार अटी शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगीक कार्यवाही करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1858/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा स्मशानभुमी समोरील अंतर्गत पोच रस्त्यास लागुन 4500 चौ.मी. मोकळ्या जागेवर स्वखर्चाने जैवविविधता पार्क उद्यान विकसीत करणेसाठी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटेंट इंडिया (AKAH India) यांना अटी शर्तीस अधीन राहुन परवानगी देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार अटी शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगीक कार्यवाही करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येते.मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1859/2025:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.17.03.2025)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.चिश्ती मोहम्मद शकीलद्दीन, औषध निर्माण अधिकारी, आ.के.कैसर कॉलनी रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या पत्नीच्या नामे श्रीमती रुखसाना बेगम चिश्ती (हृदयाचे आजार) या आजारावर उपचारासाठी नारायण हेल्थ हॉस्पीटल, बेंगलोर, कर्नाटक राज्य येथे उपचार केलेला असून र.रु.6,54,532/- (अक्षरी रक्कम रुपये सहा लाख चोपन्न हजार पाचशे बत्तीस फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (हृदयाचे आजार) या आजारावार उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.6,54,532/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,24,689/- वजा जाता र.रु.5,29,843/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.4,76,858/- इतकी असुन 5% र.रु.32,726/- इतकी असुन संबंधतास निव्वळ देय र.रु.4,44,132/- एवढी येते.

संबंधीताने नारायण हेल्थ हॉस्पीटल, बेंगलोर, कर्नाटक राज्य येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णयक्र.वैखप्र.2011/प्र.क्र.333/11/ राकावि-2 मंत्रालय मुंबई दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंयिांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णलय प्रमाणे प्रतिपुर्ती

अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

तसेच मा.आयुक्त यांनी जा.क्र./मनपा/आस्था-1/2024/3312 दि.12.09.2024 नुसार आदेशित केल्याप्रमाणे मा.अति.आयुक्त यांना कर्मचारी/अधिकारी यांची वैद्यकीय उपचाराकरीता अग्रिम व वैद्यकीय देयक र.रु.1.50 लक्ष पर्यंत मंजुर करणे बाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत व र.रु.1.50 लक्ष वरील वैद्यकीय परताव्याच्या संचिका मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य.

करीता, श्री.चिश्ती मोहम्मद शकीलद्दीन, औषध निर्माण अधिकारी, आ.के.कैसर कॉलनी रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.4,44,132/- (अक्षरी चार लाख चौरेचाळीस हजार एकशे बत्तीस फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1859/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.चिश्ती मोहम्मद शकीलद्दीन, औषध निर्माण अधिकारी, आ.के. कैसर कॉलनी रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वतःच्या पत्नीच्या नामे श्रीमती रुखसाना बेगम चिश्ती (हृदयाचे आजार) या आजारावर खाजगी रुग्णालय नारायण हेल्थ हॉस्पीटल, बेंगलोर, कर्नाटक राज्य येथे उपचार घेतलेला आहे. एकुण केलेला खर्च .रु.6,54,532/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,24,689/- वजा जाता र.रु.5,29,843/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.4,76,858/- इतकी असुन 5% र.रु.32,726/- इतकी असुन संबंधतास निव्वळ देय र.रु.4,44,132/- एवढी येते इतकी रक्कम संबंधीतास द्यावयाची आहे.

करीता, संबंधीतास अदा करावयाच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1860/2025:-</u> (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.04 अंतर्गत हर्सुल येथे मध्यवर्ती कारागृह असुन जळगाव महामार्गावरील जटवाडा टी-पॉईट ते कारागृहाला जोडणारा रस्ता तसेच सदर कारागृह परिसरात अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. येथील अंतर्गत रस्ते कच्चे असल्याने वाहनाच्या वर्दळीमुळे मोठ्या प्रमाणात धुळ निर्माण होऊन परिसरातील अधिकारी, कर्मचारी त्यांचे कुटूंबीय,कैदी व इतर नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. या कारणाने कारागृहातील अंतर्गत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे काम दि.31.03.2024 पुर्वी पुर्ण करणे गरजेचे आहे.

या कामाचे अंदाजपत्रक र.रु.2,99,63,000/- (18% जीएसटीसह) चे तयार करण्यात आले असून यासाठी सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-23 मधील दर विचारात घेण्यात आले आहेत. या कामाचा खर्च जिल्हा वार्षिक नियोजन समिती (DPDC) अंतर्गत निधीमधून प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता, झोन क्र.04 अंतर्गत जळगाव महामार्गावरील जटवाडा टी-पॉईट ते कारागृहाला जोडणारा रस्ता तसेच अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.2,99,63,000/- (18% जीएसटीसह) यास मंजुरी देणे ई-निविदेची कार्यवाही करणे, अल्प मुदतीची (3 दिवसांची) बी-1 निविदा काढणे तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबींस मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1860/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.04 अंतर्गत जळगाव महामार्गावरील जटवाडा टी-पॉईट ते कारागृहाला जोडणारा रस्ता तसेच अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.2,99,63,000/- (18% जीएसटीसह) यास मंजुरी देणे ई-निविदेची कार्यवाही करणे, अल्प मुदतीची (3 दिवसांची) बी-1 निविदा काढणे तसेच या कामाच्या अनुषंगाने आता

किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबींस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1861/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभरस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करून देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत गट क्र.215 येथे श्री.हाके यांच्या घरापासून ते चौधरी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.86,77,270/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यदित उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1861/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत गट क्र.215 येथे श्री.हाके यांच्या घरापासून ते चौधरी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.86,77,270/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1862/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभरस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी एकुण ०६ रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत स्व. आनंद दिघे उद्यान पासून ते पारके यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.99,89,145/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर

कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादेत उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1862/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत स्व.आनंद दिघे उद्यान पासून ते पारके यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.99,89,145/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1863/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभरस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करून देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत अहिल्यादेवी होळकर उद्यान पासून ते ॲड. झागडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.48,06,236/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादेत उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1863/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत अहिल्यादेवी होळकर उद्यान पासून ते ॲड.झागडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.48,06,236/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1864/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभरस्ते उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा. लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करून देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कार्माकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गांव अंतर्गत रेणुका माता कमान पासून ते प्रभु श्री. विश्वक्रमा चौक पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.1,56,12,646/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादित उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर आहे.

**<u>ठराव क्रमांक 1864/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गांव अंतर्गत रेणुका माता कमान पासून ते प्रभु श्री.विश्वक्रमा चौक पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.1,56,12,646/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाचतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1865/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभरस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा. लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करून देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत राजे यशवंतराव होळकर चौक पासून ते रेणुका माता पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.1,46,78,324/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादित उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर आहे.

**<u>ठराव क्रमांक 1865/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत राजे यशवंतराव होळकर चौक पासून ते रेणुका माता पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प. र.रु.1,46,78,324/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते.

तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1866/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभ रस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मनपा वार्ड क्र.115 सातारा गांव अंतर्गत स्व. बाळासाहेब ठाकरे मार्ग ते अप्रतिमपुष्प पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.1,22,85,127/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव, सदर कामास अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरण होणे करीता परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणेच्या मान्यतेस्तव आणि सदर कामासाठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादेत उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर आहे.

**ठराव क्रमांक 1866/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.115 सातारा गांव अंतर्गत स्व. बाळासाहेब ठाकरे मार्ग ते अप्रतिमपुष्प पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अं.प.र.रु.1,22,85,127/- चे तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1867/2025:- (कर निर्धारक व संकलक विभाग)** **(दि.21.03.2025)**

आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या झोन-7 कार्यालय कार्यक्षेत्रात असलेल्या विभागीय क्रिडा संकुलातील मालमत्तांवर मार्च-25 पर्यंत पुढील प्रमाणे मालमत्ता कर येणे आहे.

| अ. क्र. | नाव | मालमत्ता क्र. | मुळ कराची रक्कम | 2% शास्ती/ विलंब शुल्क | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल मुलींचे होस्टेल | F0035055 | 504046 | 349161 | 853207 |
| 2. | उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल इन डोअर हॉल | F0035056 | 2772574 | 9281752 | 12054326 |
| 3. | उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल मुलांचे होस्टेल | F0035057 | 504049 | 978608 | 1482657 |
| 4. | उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल | F0035059 | 1289942 | 1193172 | 2483114 |
| 5. | उपसंचालक क्रिडा व युवक सेवा | F0024660 | 167378 | 9770 | 177148 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एकुण** | | **5237989** | **11812463** | **17050452** |

माहे जानेवरी-2022 मध्ये तात्कालीन उप संचालक (क्रिडा) यांनी मालमत्ता कर सवलतीच्या दराने आकारणे तसेच मार्च-2022 पर्यंतच्या मागणी वरील विलंब शुल्काची रक्कम माफ करण्याबाबत पत्राद्वारे विनंती केली होती. त्यावर तात्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी सुनावणी घेऊन सदर दोन्ही मागण्या मान्य केल्या होत्या. परंतु सदर सुट वजा जाता उर्वरित रक्कम विहित मुदतीत एक रक्कमी भरण्याच्या अटीचे क्रिडा विभागाकडून पालन न झाल्यामुळे संगणकात पुर्ण वजावट मिळालेली नाही. त्यामुळे ती रक्कम पुन:श्च मागणीत जमा झाली होती.

विद्यमान उपसंचालक (क्रिडा) यांनी पत्र जा.क्र.उपसं/विक्रीसंस/सुसेखं/2023-24/370 दि.06.08.2024 देऊन मागील वेळी काही तांत्रिक कारणामुळे रक्कम भरणे शक्य झाल्याचे नमुद करुन क्रिडा संकुल हे शासकीय कार्यालय असल्याने विलंब शुल्कातील सुट पुन: एकदा कायम केल्यास एक रक्कमी कर भरण्याची तयारी दर्शविली आहे.

याबाबत मा.पालकमंत्री महोदय संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय क्रिडा संकुल येथे दि.31.01.2025 रोजी बैठक झाली असुन त्यात मा.मंत्री महोदयांनी व उपस्थित समिती सदस्यांनी प्रकरणात सुनावणी घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिका मुख्यालयात दि.21.03.2025 रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी आयुक्त तथा प्रशासक व उप संचालक (क्रिडा) यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. सुनावणीत उपरोक्त तक्त्यात एकुण मध्ये दर्शविलेली मुळ कराची रक्कम (र.रु.52,37,989) क्रिडा विभागाने महानगरेपालिकेस 31 मार्च 2025 पावेतो एकरक्कमी भरणा केल्यास विलंब शुल्काची रक्कम माफ करुन निर्लेखीत करण्यात येईल. असा निर्णय देण्यात आला आहे. सदर रक्कमेची माफी देण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे कर भरणा झाल्यास विलंब शुल्काची र.रु.1,18,12,463/- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 152 मधील तरतुदींनुसार निर्लेखीत करण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1867/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रिडा विभागाने मुळ कराची रक्कम (र.रु.52,37,989/-) महानगरपालिकेस दि.31 मार्च 2025 पावेतो एकरक्कमी भरणा केल्यास विलंब शुल्क र.रु.1,18,12,463/- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 152 मधील तरतुदींनुसार निर्लेखीत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1868/2025:-</u>** **(कार्य.अभि.ड्रेनेज विभाग)** **(दि.21.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ऐतिहासिक कमल तलावाचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे काम प्रथम टप्प्यांतर्गत प्रगतीपथावर आहे. सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता, PMC यांना आदेशित केल्या प्रमाणे कमल तलाव येथे दुसऱ्या टप्प्यांतर्गत इको पार्क विकसित करणे बाबत अंदाजपत्रक PMC यांनी तयार करुन सादर केले आहे.

या Gazebe, Board Walkway, Bridge over the Culvert at the inlet point, Crossover Bridge at outlet point, Café, Pathway, Amphitheatre, Circular seating, Kids play area + Gym area, Constructed flowerbed, Gate अंदाजपत्रकात या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

यासाठी उक्त नमुद बाबींचा समावेश असलेले अंदाजपत्रक सा.बां.दरसुची सन 2022-23 नुसार तसेच ज्या बाबींचे दर हे दरसुचीमध्ये समाविष्ट नाहीत त्या बाबींचे दर GeM पोर्टलवरुन विचारात घेण्यात आले आहेत. या सर्व बाबींचे अंदाजपत्रक निव्वळ र.रु.3,12,02,447/- चे तयार करण्यात आले असुन या व्यतिरीक्त 18%GST,1% Insurance, Contingency Charges 5%, Architect Charges 2%, TPTA Charges 1% या बाबींचा समावेश करुन असे एकुण अंदाजपत्रक

र.रु.3,96,27,107/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाच्या खर्चाकरीता केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 Water Body Rejuvenation योजनेअंतर्गत शासन निधीची मागणी करण्यात येईल.

करीता ऐतिहासिक कमल तलावाचे पुनरुज्जीवन व संवर्धन करणे या कामाअंतर्गत इको पार्क विकसित करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.3,96,27,107/- यास मंजुरी देणे, ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1868/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ऐतिहासिक कमल तलावाचे पुनरुज्जीवन व संवर्धन करणे या कामाअंतर्गत इको पार्क विकसित करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.3,96,27,107/- यास मंजुरी देणे, ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1869/2025:- (वाहने विभाग)** **(दि.21.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्जदार श्रीमती आशा शिवाजी गाडेकर यांनी त्यांच्या पतीच्या स्व.शिवाजी शिवराम गाडेकर (मयत), वाहनचालक, यांत्रिकी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर (फुफ्फुसाचा विकार) यावर उपचार करण्यासाठी ओरीयन सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिलीटी, छत्रपती संभाजीनगर येथे दि.17.09.2023 ते दि.20.09.2023 या कालावधीत उपचार केलेला असुन एकुण र.रु.2,46,092/- इतका खर्च केलेला आहे. अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून (फुफ्फुसाचा विकार) या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1. | एकुण खर्च | र.रु.2,46,092/- |
| 2. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | र.रु.82,684/- |
| 3. | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | र.रु.1,63,408/- |
| 4. | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | र.रु.1,47,067/- |
| 5. | मनपा, फंडात 5 टक्के (अ.क्र.1 च्या रक्कमेवर) | र.रु.12,304/- |
| 6. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | र.रु.1,34,763/- |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.1,34,763/-.

संबंधीताने उपचार घेतलेले ओरीयन सिटी केअर सुपर स्पेशालिटी, छत्रपती संभाजीनगर हे असुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुगणालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ठ खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची दि.16.11.2011 पर्यंतच्या अद्ययावत प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरच्या रुग्णालयांचे नाव समाविष्ठ नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिफारस केलेली आहे.

करीता, स्व.शिवाजी शिवराम गाडेकर (मयत), वाहन चालक, यांत्रिकी विभाग महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर (फुफ्फुसाचा विकार) यावर उपचार करण्यासाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,34,763/- एवढी आहे. परंतु दि.14.05.2023 च्या परिपत्रका नुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1869/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्व.शिवाजी शिवराम गाडेकर (मयत), वाहन चालक, यांत्रिकी विभाग महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर (फुफ्फुसाचा विकार) यावर उपचार करण्यासाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,34,763/-एवढी आहे. परंतु दि.14.05.2023 च्या परिपत्रकानुसारवैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्याण्णव हजार फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1870/2025:-** **(पाणी पुरवठा शहर यांत्रिकी विभाग)** **(दि.21.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-5 पंपगृह येथील सबस्टेशन करीता 1600KVA क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आवश्यक उपकारणांसह पुरवठा करणे, बसविणे व यशस्वी चाचणी देणे बाबत कामासाठी एकुण र.रु.77,55,124/- (जीएसटी सह) रक्कमेच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1682 दि.15.10.2024 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नंतर 18% GST वगळून ई-निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, निविदे च्या दुसऱ्या फेरीत एकुण 2 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त दोन्ही निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र असल्याने त्यांची व्यापारी निविदा उघडली असता, निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्तदर (जीएसटी शिवाय) |
|---|---|---|
| 1. | मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस छ.संभाजीनगर | र.रु.54,43,703.00 |
| 2. | मे.अमित इंजिनियर्स छ.संभाजीनगर | र.रु.62,82,308.00 |

उपरोक्त प्रमाणे मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस छ.संभाजीनगर यांची एल-1 निविदा प्राप्त झाली असुन अंदाजपत्रकापेक्षा 17.17% ने कमी व र.रु.54,43,703.00 (जीएसटी शिवाय) दराची आहे. त्यामुळे सदरील निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांची अंदाजपत्रकापेक्षा 17.17% ने कमी व र.रु.54,43,703/- दराची निविदा स्विकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1870/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-5 पंपगृह येथील सबस्टेशन करीता 1600KVA क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आवश्यक उपकारणांसह पुरवठा करणे, बसविणे व यशस्वी चाचणी देणे बाबत कामासाठी मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांची अंदाजपत्रकापेक्षा 17.17% ने कमी व र.रु.54,43,703/- (जीएसटी शिवाय) दराची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1871/2025:-** **(कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.21.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा पश्चिम मतदार संघातील रस्त्यांची दुरावस्था पाहता तसेच त्या भागात वाढती नागरी वसाहत पाहता वाहतुकीसाठी सुलभ रस्ते उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर मतदार संघाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी एकुण 06 रस्ते कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन-2024-25 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे बाबत मागणी केली आहे.

सदर कामांकरीता जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन 2022-23 नुसार सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

करीता, मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशाकीय मान्यता दिलेल्या पत्रान्वये वॉर्ड क्र.115 अंतर्गत विविध 06 रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याच्या कामाचे मा.सर्वसाधारण सभेचे प्रस्ताव घेण्यात आले होते. तथापि, सदरच्या प्रस्तावांना सुधारीत करुन सर्व कामे एकत्रित रित्या प्रस्तावित करण्यात येत असून त्याचे एकुण अंदाजपत्रक र.रु.6,60,48,750/- असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| 1. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत स्व.बाळासाहेब ठाकरे मार्ग ते अप्रतिमपुष्प पर्यंत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.1,22,85,127/- |
| 2. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत राजे यशवंतराव होळकर चौक पासुन ते रेणुका माता पर्यंत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.1,46,78,324/- |
| 3. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत रेणुका माता कमान ते प्रभु श्री.विश्वकर्मा चौक पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.1,56,12,646/- |
| 4. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत अहिल्यादेवी होळकर उद्यान पासून ते ॲड.झागडे यांच्या घरा पर्यंत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.48,06,236/- |
| 5. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत स्व.आनंद दिघे उद्यानपासुन ते पारके यांच्या घरा पर्यंत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.99,89,145/- |
| 6. | मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत गट क्र.215 येथे श्री.हाके यांच्या घरापासुन ते चौधरी यांच्या घरा पर्यंत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत | र.रु.86,77,270/- |
| | **एकुण** | **र.रु.6,60,48,750/-** |

करीता, उपरोक्त कामांकरीता कामनिहाय स्वतंत्र मा.सर्वसाधारण सभेचे ठराव मान्य झाले होते तसेच सर्व प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यात आले असता, त्यांनी दि.21.03.2025 अन्वये सर्व कामांना एकत्रित रित्या प्रशासकीय मान्यता दिली आहे. करीता उपरोक्त प्रमाणे मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत विविध रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक एकुण र.रु.6,60,48,750/- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसतव तसेच सदर कामा साठीचा निधी हा दि.31.03.2025 च्या कालमर्यादेत उपलब्ध होणार असल्याने अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1871/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत विविध 06 रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे एकुण अंदाजपत्रक र.रु.6,60,48,750/- चे तयार करण्यात आले असुन यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदर कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत निधी उपलब्ध होणार असल्याने या बाबतचा परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सादर करणे व अंतिम प्रशासकीय मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1872/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.24.03.2025)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा.स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले टी.व्ही.सेंटर, एन-10, सिडको, संभाजी महाराज चौक, छत्रपती संभाजीनगर येथील गाळा क्र.41 साठी 30 वर्षांच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आले होते. निविदेत प्राप्त सर्वाधिक दर खाली प्रमाणे.

| अ. क्र. | गाळा क्र. | प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे नाव | आधारभुत रक्कम रुपये | निविदेत प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| 1. | 41 | श्री.हेमंत सदानंद सुर्वे | र.रु.35,00,000/- | र.रु.44,44,311/- |
| | | श्री.संतोष रामराव डक | | र.रु.37,40,000/- |

उपरोक्त प्रमाणे दुकान क्र.41 साठी श्री.हेमंत सदानंद सुर्वे यांचे निविदेत र.रु.44,44,311/-प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने त्यांच्या सोबत 30 वर्षाचा करारनामा करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1872/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले टी.व्ही. सेंटर, एन-10, सिडको, संभाजी महाराज चौक, छत्रपती संभाजीनगर येथील गाळा क्र.41 साठी श्री.हेमंत सदानंद सुर्वे यांचे निविदेत सर्वाधिक दर र.रु.44,44,311/-प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने संबंधीता सोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 30 वर्षाचा करारनामा करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1873/2025:-</u>** **(पाणी पुरवठा, जायकवाडी, यांत्रिकी विभाग)** **(दि.24.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नवीन जायकवाडी पंपगृह येथील 33/3.3 के.व्ही.ए.1600 के.व्ही.ए. चे ट्रान्सफॉर्मर क्र.03 हे दि.16.10.2024 रोजी खराब झाल्यामुळे पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता 67 (3)(C) अंतर्गत मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनुसार मे.ट्रान्सडेल्टा ट्रान्सफॉर्मर प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत दुरुस्त करुन बसविण्यात आला असुन सद्यस्थितीत सदरील ट्रान्सफॉर्मर कार्यरत आहे.

तथापि, तपासणी अंती मे.ट्रान्सडेल्टा ट्रान्सफॉर्मर प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांनी या ट्रान्स्फॉर्मरची व तसेच इतर पार्टस अतिशय खराब झाले असुन यापुढे या ट्रान्सफॉर्मर बिघाड झाल्यास दुरुस्ती करता येणार नाही. तसेच दुरुस्त केलेला सध्याचा ट्रान्सफॉर्मर किती दिवस कार्यरत राहील? याबाबत शाश्वती दिली नाही.

सदरील ट्रान्सफॉर्मर 100 दलली योजना सन 1992 रोजी पासुन उभारणी केल्यापासून कार्यरत असुन जवळपास 31 वर्ष या ट्रान्सफॉर्मर द्वारे सेवा घेण्यात आली आहे. तसेच सदरील ट्रान्सफॉर्मर वारंवार दुरुस्ती करण्यात आला आहे. सद्यस्थितीत स्टँडबाय म्हणुन वापरला जातो. परंतु भविष्यात नवीन जायकवाडी पंपगृह येथील एखादा ट्रान्सफॉर्मर खराब झाल्यास योजनेवर एमर्जन्सीसाठी स्टँडबाय ट्रान्सफॉर्मर राहणार नाही.

तसेच सद्यस्थितीत छत्रपती संभाजीनगर शहरासाठी 630 दलली क्षमेतची (2780कोटी) नवीन पाणी पुरवठा योजना उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेअंतर्गत हेडवर्क्स येथून अस्तित्वा तील 100 दलली योजनेचे पंप व अनुषंगीक कामे होणार आहे. परंतु तथीत हेडवर्क्स येथुन अतित्वातील 100 दलली योजनेसाठी पंप बसवुन कार्यान्वित होण्यास किती वेळ लागेल? याबाबत निश्चितीता नाही. त्यामुळे तोपर्यंत अस्तित्वातील योजनेवरील 100 दलली योजना कार्यान्वित ठेवण्यासाठी व पाणी पुरवठ्या मध्ये खंड होऊ नये म्हणुन स्टँडबाय ट्रान्सफॉर्मर कार्यरत असणे आवश्यक आहे.

उपरोक्त नुसार नवीन योजना उभारणीस वेळ लागल्यास व एक वर्षाच्या कालावधीपेक्षा जास्त काळ सद्यस्थितीतील 100 दलली योजना कार्यरत ठेवावयाची असल्यास स्टँडबाय ट्रान्सफॉर्मर घेणे योग्य राहील.

वरील प्रमाणे 1600 के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर नवीन खरेदी करण्यासाठी अं.प.र.रु.47,12,627/- चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. मान्यता मिळाल्यास ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागवून सदरील 1600 के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर नवीन खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1873/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवीन जायकवाडी पंपगृह येथील 33/3.3 के.व्ही.ए.1600 के.व्ही.ए. चे ट्रान्सफॉर्मर खरेदी करण्यासाठी र.रु.47,12,627/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1874/2025:-** **(आरोग्य विभाग)** **(दि.25.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्मार्ट सिटी मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या तीन मजली इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. लवकरच तेथे शहरातील गरजु रुग्णांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.सदरील रुग्णालय सुसज्ज व कार्यान्वीत करण्यासाठी विविध संवर्गातील मनुष्यबळाची व विविध साहित्य सामग्रीची आवश्यकता लागणार आहे व त्यासाठी निधी उपलब्ध करणे करीता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार निधीची मागणी राज्य शासन किंवा राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडे करावयाची आहे.

स्मार्ट सिटी मल्टीस्पेशालिटी रुग्णालय सुसज्ज व कार्यान्वीत करण्यासाठी खालील बाबींकरीता निधीची आवश्यकता आहे. निधीचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr No | Name of Post | No.of Post | Approx. Salary (Rs.) Per Month Per Person | Approx.Total Salary (Rs.) Per Month Per Person | Approx.Total Salary (Rs.) Per year in |
|---|---|---|---|---|---|
| **Administrative Staff** | | | | | |
| 1. | Nursing Incharge (Administrative Com Clinical Staff) | 01 | 20000 | 20000 | 240000 |
| 2. | Hospital Manager | 01 | 35000 | 35000 | 420000 |
| 3. | Management Professional/Medical Record Analyst/ Medical Record Assistant | 01 | 18000 | 18000 | 216000 |
| 4. | Accountant | 01 | 18000 | 18000 | 216000 |
| 5. | Data Entry Operator/Statistical Assistant | 04 | 18000 | 72000 | 864000 |
| 6. | Sanitary Inspector | 01 | 15000 | 15000 | 180000 |
| 7. | Registration Clerk | 01 | 15000 | 15000 | 180000 |
| **Specialists and Medical Officers** | | | | | |
| 1. | Physicial/Family Medicine Specialist | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 2. | Surgeon | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 3. | Obstretricial & Gynecologist | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 4. | Pediatrician | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 5. | Anesthesiologist | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 6. | Microbiologist/athoogist/Biochemist | 01 | 75000 | 75000 | 900000 |
| 7. | GDMO | 07 | 60000 | 360000 | 4320000 |
| 8. | MO Dental | 01 | 30000 | 30000 | 360000 |
| **Allied Health Professionals** | | | | | |
| 1. | Clinical Psychologist or Psychiatrist Socal Worker | 01 | 30000 | 30000 | 360000 |
| 2. | Social Workder/Community Based Rehabilitation Worker | 01 | 18000 | 18000 | 216000 |
| 3. | Counselor | 03 | 18000 | 54000 | 648000 |
| 4. | Physiotherapist | 01 | 20000 | 20000 | 240000 |
| **Other Allied Health Professionals** | | | | | |
| 1. | Medical Laboratory Techologist/Lab Technicial | 05 | 17000 | 85000 | 1020000 |
| 2. | OT Technologist/OT Technicial | 02 | 17000 | 34000 | 408000 |
| 3. | Readiologhy and Imaging Technologist/Radiology Technician | 01 | 17000 | 17000 | 204000 |
| 4. | ECG Technologist /ECG Technician | 01 | 17000 | 17000 | 204000 |
| 5. | TSSU Assistant | 02 | 17000 | 34000 | 408000 |
| 6. | Dental Assistant | 01 | 17000 | 17000 | 204000 |
| 7. | Optometrist/Ophthalmic Assistant/Vision Technician | 01 | 17000 | 17000 | 204000 |
| 8. | Cold Chain/Vaccine Logistic Assistant | 01 | 17000 | 17000 | 204000 |
| **Pharmacists** | | | | | |
| 1. | Pharmacist (Allopathic) | 02 | 17000 | 34000 | 408000 |
| 2. | Store Keeper/Store In Charge | 01 | 18000 | 18000 | 216000 |
| **Sanitation Staff** | | | | | |
| 1. | OT/LDR | 03 | 13000 | 39000 | 468000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | Floor Including, blood stsorage unit, OPD,Wards,KitchenUtensils/premises and other areas | 03 | 13000 | 39000 | 468000 |
| 3. | Outer Premiss | 02 | 13000 | 26000 | 312000 |
| **Other Staff** | | | | | |
| 1. | Dresser | 02 | 13000 | 26000 | 312000 |
| **Staff Nurses** | | | | | |
| 1. | IPD | 24 | 20000 | 480000 | 5760000 |
| 2. | NBSU | 03 | 20000 | 60000 | 720000 |
| 3. | Emergency | 06 | 20000 | 120000 | 1440000 |
| 4. | OT | 11 | 20000 | 220000 | 2640000 |
| 5. | LDR | 09 | 20000 | 180000 | 2160000 |
| 6. | OPD | 05 | 20000 | 100000 | 1200000 |
| | **TOTAL** | **114** | **1108000** | **2735000** | **32820000** |

< Approx.Monthly Recurring Cost - Rs.27,35,000 > Approx.Yearly Recurring Cost- Rs.3,28,20,000

उपरोक्त नमुद प्रमाणे मनुष्यबळाच्या एका वर्षासाठी लागणाऱ्या मानधनाकरीता अंदाजीत र.रु.3,28,20,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी अठ्ठावीस लक्ष वीस हजार रुपये फक्त) इतका खर्च अपेक्षित राहणार आहे.

करीता प्रस्तावास दर्शविल्याप्रमाणे मनुष्यबळाच्या एका वर्षासाठी लागणाऱ्या मानधनाकरीता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचना 2023-24 च्या अनुषंगाने अंदाजीत अपेक्षित खर्च र.रु.3,28,20,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी अठ्ठावीस लक्ष वीस हजार रुपये फक्त) तसेच औषधी, वैद्यकीय उपकरणे, साहित्य व फर्निचरसाठी (One Time Cost) र.रु.7,71,60,044/- (अक्षरी रक्कम रुपये सात कोटी एकाहत्तर लक्ष साठ हजार चौरेचाळीस फक्त) अशा एकुण र.रु.10,99,80,044/- (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी नव्यान्नव लक्ष ऐंशी हजार चौरेचाळीस फक्त) च्या निधीची मागणी राज्य शासन किंवाराष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडे करणेकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव क्रमांक 1874/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनुष्यबळाच्या एका वर्षासाठी लागणाऱ्या मानधनाकरीता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचना 2023-24 च्या अनुषंगाने अंदाजीत अपेक्षित खर्च र.रु.3,28,20,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी अठ्ठावीस लक्ष वीस हजार रुपये फक्त) तसेच औषधी, वैद्यकीय उपकरणे, साहित्य व फर्निचरसाठी (One Time Cost) र.रु.7,71,60,044/- (अक्षरी रक्कम रुपये सात कोटी एकाहत्तर लक्ष साठ हजार चौरेचाळीस फक्त) अशा एकुण र.रु.10,99,80,044/- (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी नव्यान्नव लक्ष ऐंशी हजार चौरेचाळीस फक्त) च्या निधीची मागणी राज्य शासन किंवाराष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडे करणेकरीता प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1875/2025:-** **(संगणक विभाग)** **(दि.26.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागा मार्फत CCTV Surveillance System पुरवठा करुन उभारणी करणे व कार्यान्वीत करणे बाबत अंदाजित र.रु.35.00 लक्षची (Itemwise Rate) निविदा क्र. 2024_AMCA_1097763_1 नुसार मागविण्यात आली यात चार पात्र निविदाधारकांना पात्र ठरविण्यात आलेले होते. त्यापैकी M/s Sunrise Computers and Multy Services हे L1असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr. no. | Item Description | Units | Estimated Rate |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | High Definition 4MP IP CCTV Camera 4mm Lens 30 MtrIR,1080p Al Time COLOR inbuilt Mic, Water Proof, Dome and Bullet CP Plus, Dahua, Truview, Hikvision, Axvision, Mecline etc. | Nos | 7434.00 |
| 2. | High Defination 4MP PTZ IP Camera, 100Mtr Rand, IR Night | Nos | 32568.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| | Vision | | |
| 3. | 16 Channel 4MP supported NVR, 1080p Resoultiona, USB, LAN,VGA, HDMI, (CP Plus, Hikvision, Truview, Axvision, Dahua, Hikvision) | Nos | 14455.00 |
| 4. | 08 Channer 4MP supported NVR,1080p Resolution, USB, LAN,VGA, HDMI, (CP Plus, Hikvision, Truview, Axvision, Dahua, Hikvision) | Nos | 9794.00 |
| 5. | Hard Disk for storage 2TB Toshiba/Seagate/WD/Consistane etc | Nos | 18054.00 |
| 6. | CCTV Cable Cat-6 per mtr WTC,DG sole,D-link, etc | Nos | 76.00 |
| 7. | Rack Wall Mounted 6U D-link/Valrack etc | Nos | 7198.00 |
| 8. | Network POE Switch 08 Port D-link, CP-Plus, Dahua, Truview, etc | Nos | 9600.00 |
| 9. | Network POE Switch 16 Port D-link, CP-Plus, Dahua, Truview, etc | Nos | 2180. |
| 10. | Network Switch 08 Port D-link, CP-Plus | Nos | 4484.00 |
| 11. | Fiber Cable 4 Core Per Mtr D-Link/Kriz india,etc | Nos | 180.00 |
| 12. | Fiber Media Convertor | Nos | 749.00 |
| 13. | Fiber Splicing | Nos | 6785.00 |
| 14. | LED Monitor 32" LG, Croma, Micromax, Smart LED etc | Nos | 22500.00 |
| 15. | LED Monitor 40" LG/Camera/Consistant/,etc | Nos | 46001 |
| 16. | HDMI Cable 20Mtr Original | Nos | 3700.00 |
| 17. | Power Supply 12V | Nos | 4100.00 |
| 18. | Providing and supply internet fiber optic connectivity for cameras online monitoring 1 year | Nos | 44014.00 |
| 19. | Ups 600va for Backup Intex/Micortek,etc | Nos | 6490.00 |
| 20. | Service and complete installation charges per side | Nos | 12390.00 |
| 21. | Electric board installation per side with material | Nos | 4484.00 |
| **Item Wise Rate Total Rs.257160.00** | | | |

उपरोक्त मंजुर झालेल्या दराने M/s Sunrise Computers and Multy Services यांना कायदिश निर्गमित करणे असुन या कामासाठी अंदाजित खर्च र.रु.35.00 लक्ष आहे. तथापि, सीसीटीव्ही कार्यान्वीत करण्यासाठी होणारा खर्च हा विभागाचा आतील भाग, बाहेरील भाग, संपुर्ण सभोवतालचा परिसर व नंतर विभागातील कर्मचाऱ्यांनी किंवा विभाग प्रमुखांनी ठरवुन दिलेले स्थान यानुसार Cabling यावर अंतिम करण्यात येतो.

आजमितीस मनपाच्या विविध विभागांकडून या बाबत मागणी पत्रे प्राप्त होत असुन यात विशेष करुन जा.क्र.मनपा/आरोग्य/2024/2737 दि.30.09.2024 या पत्रानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मनपाच्या 40 आरोग्य केंद्रात सीसीटीव्ही कार्यान्वीत करणे बाबत मागणी केलेली आहे. या शिवाय मनपाच्या सर्व शाळेत सीसीटीव्ही कार्यान्वीत करणे आहे. या बाबत शिक्षण विभागाच्या विविध शाळां कडून मागणी पत्रे येत आहेत. या कामासाठी सन 2024-25 च्या अर्थसंकल्पात र.रु.75.00 लक्षची तरतुद आहे. मा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार व वरिष्ठ अधिकारी यांनी सुचित केल्यानुसार तसेच विभागा च्या मागणीनुसार सीसीटीव्ही पुरवठा करुन कार्यान्वीत करण्यासाठीचे निविदेनुसार उपरोक्त तक्त्या तील Item Wise Rate मंजुर दरामध्ये कायदिश L1असलेल्या निविदाधारकास निर्गमित करणे आहे. तरी मंजुर दर असलेल्या निविदाधारकांकउडून सीसीटीव्ही कार्यान्वीत करणे व यासाठीच्या वार्षिक अंदाजित खर्च र.रु.35.00 लक्षचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1875/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभागाच्या मागणीनुसार सीसीटीव्ही कार्यान्वीत करण्यासाठी सन 2024-25 च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद र.रु.75.00 लक्ष लेखाशिर्ष सीसीटीव्ही/संगणक/प्रिंटर देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षातून प्रस्तावित असुन निविदेतील अटीशर्तीनुसार अंमलबजावणी होईल. या बरोबर Item Wise निविदा दर हे कार्यादेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन कार्यान्वीत राहील. मा.आयुक्त व वरिष्ठ अधिकारी यांच्या निर्देशानुसार व विविध विभागाच्या मागणीनुसार L1 असलेल्या

निविदा धारकाकडून सीसीटीव्ही पुरवठा करुन कार्यान्वीत करुन घेण्यास व यासाठीच्या र.रु.35.00 लक्षच्या अंदाजित खर्चास मंजुरी प्रदान कण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1876/2025:-** **(कार्य.अभि.पापु, उपविभाग)** **(दि.26.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्राची स्थापित क्षमता ही 10 दलली प्रतिदिन इतकीअसुन सदर जलशुध्दीकरण केंद्र सन-1954 साली बांधण्यात आल्यामुळे आज रोजी शुध्दीकरण प्रक्रियेचा दर कमी झालेला आहे भविष्यात हर्सुल धरणावरुन 15 ते 17 दलली पाणी वाढ झाल्यास नवीन 7.5 दलली क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची आवश्यकता राहणार आहे. प्राप्त निर्देशा नुसार मजीप्राच्या दरसुची सन 2021-22 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अं.प. र.रु.4,30,64,542/- इतकी आहे. सदरील काम टंचाई परिस्थितीमध्ये अचानक उद्भवल्यामुळे आर्थिक तरतुद ठेवण्यात आली नव्हती. सदरचे काम करणे आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या चालु अर्थसंकल्प (सन – 2022-23) सुधारित करतांना सदर कामासाठी र.रु.4,30,64,542/- ची तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करण्यात येईल. या अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.507/2022 दि.12.09.2022 अन्वये प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली आहे. अनुषंगाने निविदा कार्यवाही करुन कामाचे कार्यदिश देण्यात येऊन काम प्रगतीपथावर आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती तसेच शहर पाणी परिस्थिती लक्षात घेता, सन 2023-24 चा अर्थसंकल्प पुर्व तयारी बैठकीत सदरील कामाचा समावेश 15 वा वित्त आयोगातील प्राप्त निधीतून करण्याच्या सुचना प्राप्त असल्याने या कामाचा समावेश अर्थसंकल्पात 15 वा वित्त आयोगातील प्राप्त निधीत करण्यात आलेला आहे. या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.827/2023 दि.20.06.2023 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. प्राप्त मान्यतेनुसार काम पुर्ण होऊन दि.01.04.2024 पासुन जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या परंतु निविदेत अंतर्भुत नसलेल्या बाबी जसे की, 450 मीमी व्यासाची बाधीत होणारी गुरुत्ववाहीनी स्थलांतरीत करणे, नवीन संप पासुन अस्तित्वातील वितरण वाहीनी पर्यंत 300 मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणे ही काम करुन घेण्यात आली असून जलशुध्दीकरण केद्रातुन वाया जाणारे पाणी साठविण्या करीता कच्ची विहीर करणे ही कामे देखील करणे गरजेचे आहे. मुळ अंदाजपत्रकात या बाबींचा समावेश केलेला नव्हता.

जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी खालील कामे करणे गरजेचे होते.

अ) जलशुध्दीकरण केंद्राच्या कामात बाधीत होणारे 450 मीमी जलवाहीनी स्थलांतरीत करणे.

आ) नवीन संप ते अस्तित्वातील वितरण वाहिनी पर्यत 300 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.

इ) दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रातून वाया जाणाऱ्या पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी खोदकाम करुन विहीर तयार करणे व विहीरीस कठडा बांधणे.

उपरोक्त बाबींचे सविस्तर सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मुळ कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.3,64,95,357/- |
| ब) | अतिरीक्त बाबी रक्कम | रु.57,25,474/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **रु.4,22,20,831/-** |
| क) | जी.एस.टी. | रु.75,99,750/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **रु.4,98,20,581/-** |

मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कामाची अंदाजपत्रकीय र.रु.15.68% जास्त होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय र.रु.4,98,20,581/- इतकी आहे. उपरोक्त रक्कमेपेक्षा र.रु.4,30,64,542/- या रक्कमेचा समावेश 15 व्या वित्त आयोगात करण्यात आलेला आहे. उर्वरित र.रु.67,56,039/- रक्कमेचा खर्च जायकवाडी पाणी पुरवठा स्थापत्य विभागा साठी उपलब्ध असलेल्या जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात येत आहे.

जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या व निविदेत अंतर्भुत नसलेल्या बाबींची करुन घेण्यात आली आहेत. तसेच जलशुध्दीकरण केंद्रातून वाया जाणाऱ्या पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी आवश्यक असलेली कामे लक्षात घेता सुधारित अंदाजपत्रक र.रु.4,98,20,581/- मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1876/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ व्हावी. याकरीता हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त पाण्यावरप्रक्रिया करणेसाठी 7.50 दलली प्रतिदिन क्षमतेचे पारंपारीक जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करतांना निविदेत अंतर्भुत नसलेल्या परंतु आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश करुन तयार करण्यात आलेले सुधारित अंदाजपत्रक र.रु.4,98,20,581/- तसेच 15 व्या वित्त आयोगातील निधी वगळता उर्वरित र.रु.67,56,039/- रक्कमेचा खर्च जायकवाडी पाणी पुरवठा स्थापत्य विभागासाठी उपलब्ध असलेल्या जायकवाडी जलवाहिनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून करण्यास मान्यता प्रदान येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1877/2025:-</u> (लेखा विभाग)** **(दि.26.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2024-25 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2025-26 चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार अंतिम मान्यता देणे बाबत.

**<u>ठराव क्रमांक 1877/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2024-25 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2025-26 चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार जमा व खर्चाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच अर्थसंकल्पात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत नियोजीत नावीन्यपुर्ण विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या साठी र.रु.148.42 कोटी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्रति वॉर्ड र.रु.50 लक्ष महसुली व भांडवली कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. शहर सौंदर्यीकरण विशेष प्रकल्प तसेच आरोग्य, शिक्षण क्रिडा, घनकचरा व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन विभागा अंतर्गत पुरेशी तरतुद उपलब्ध केलेली आहे. गरवारे क्रिडा संकुल विकसीत करण्यातकरीता अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अपेक्षित जमा व खर्चाच्या तरतुदीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2024-25 चे सुधारीत अंदाज जमा र.रु.1720 कोटी 78 लक्ष 10 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक र.रु.126 कोटी 66 लक्ष 79 हजार यासह एकुण जमा र.रु.1847 कोटी 44 लक्ष 89 हजार आणि एकुण खर्च र.रु.1707 कोटी 40 लक्ष 60 हजार लक्षात घेता र.रु.140 कोटी 04 लक्ष 29 हजार शिल्लकीचे सुधारित त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 नुसार सन 2025-26 चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक र.रु.140 कोटी 04 लक्ष 29 हजार व अपेक्षित जमा र.रु.2943 कोटी 36 लक्ष 70 हजार असे एकुण र.रु.3083 कोटी 40 लक्ष 99 हजार आणि अपेक्षित खर्च र.रु.3082 कोटी 45 लक्ष 40 हजार विचारात घेता र.रु.95 लक्ष 59 हजार शिल्लकीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1878/2025:-</u> (कार्य.अभि.ड्रेनेज विभाग)** **(दि.27.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, Administrator Commandor, छावणी छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र प्राप्त झाले असुन, सदर पत्रात छावणी परिसरातील झाडे जगविण्यासाठी व हिरवळ वाढीसाठी पाण्याची कमतरता असल्याने महानगरपालिकेच्या STP चे प्रक्रियायुक्त पाणी मिळणे बाबत विनंती केली आहे. या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता छावणी नगरपरिषदेस, महानगरपालिकेद्वारे सिध्दार्थ उद्यान येथे उभारण्यात आलेले 4 MLD क्षमतेच्या Decentralized STP मधून प्रक्रियायुक्त पाण्याचा पुरवठा करणे योग्य वाटते.

त्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक PWD / MJP SSR 2022-23 अन्वये तयार करण्यात आले आहे. या अंदाजपत्रकात खोदकाम, सोलिंग करणे, PCC करणे, 160 मी.मी. व्यासाची HDPE ची पाईप लाईन टाकणे, N.H. प्राधिकरणाचे निगराणी शुल्क सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक दि.07/04/2014 अन्वये घेण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 मधील शुध्द हवा नियंत्रण कार्यक्रम (NCAP) या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

करिता छावणी नगरपरिषद येथे हिरवळ वाढीकरीता सिध्दार्थ उद्यान येथील 4 MLD STP मधून प्रक्रियायुक्त पाण्याचा पुरवठा करणे या कामाचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. 30,36,801/- यांस मंजुरी देणे, ई-निविदेची कार्यवाही करणे, अल्प मुदतीची बी-। निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बार्बीस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1878/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छावणी नगरपरिषद येथे हिरवळ वाढीकरीता सिध्दार्थ उद्यान येथील 4 MLD STP मधून प्रक्रियायुक्त पाण्याचा पुरवठा करणे, या कामाचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.30,36,801/- यांस मंजुरी देण्यात येते, तसेच या कामाचा खर्च शुध्द हवा नियंत्रण कार्यक्रम (NCAP) या शिर्षकातुन करणेस, ई-निविदेची कार्यवाही करणे, अल्प मुदतीची बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे, या बाबीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1879/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.27.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ब) नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे एन-10, टी.व्ही. सेंटर व्यापारी संकुलातील दुकान क्र.47, ज्याचे क्षेत्रफळ 30.00 चौ.मी. (322.75 चौ. फुट) क्षेत्रा करीता जा.क्र.मनपा/मामअ/2025/1682, दि.28.02.2025 रोजी निविदा मागविण्यात आली असता, सदर निविदेमध्ये 02 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. उक्त निविदा धारक तांत्रिक बीडमध्ये पात्र झालेले असल्याने, त्या निविदा धारकांचे आर्थिक बीड उघडण्यात आले असून, उक्त निविदा धारकांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नांव | वार्षिक भाडे (विना GST) आधारभूत रक्कम | वार्षिक भाडे (विना GST) आधारभूत रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | श्री. अजय नाना राऊत | रु.1,12,171/- | रु.1,21,111/- |
| 2 | श्री. हेमंत सदानंद सुर्वे | | रु.1,19,050/- |

वरील तक्त्यात नमुद श्री. अजय नाना राऊत यांनी दुकान क्र.47 करीता वार्षिक भाडे रक्कम रु.1,21,111/- (विना जी.एस.टी.) उच्च दर भरणा केलेले असल्यामुळे, सदर निविदाधारक यांच्या सोबत निविदेच्या अटी शर्ती नुसार 03 वर्षाच्या कालावधी करीता करारनामा करणे साठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1879/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे एन-10, टी.व्ही. सेंटर व्यापारी संकुलातील दुकान क्र.47, ज्याचे क्षेत्रफळ 30.00 चौ.मी. (322.75 चौ. फुट) क्षेत्राकरीता श्री.अजय नाना राऊत यांनी दुकान क्र.47 करीता वार्षिक भाडे रक्कम रु.1,21,111/- (विना जी.एस.टी.) उच्च दर भरणा केलेले असल्याने, सदर निविदा धारक यांच्या सोबत निविदेच्या अटी शर्ती नुसार 03 वर्षाच्या कालावधी करीता करारनामा करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1880/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.28.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ईटखेडा येथील अग्रसेन शाळा ते पैठण रोडया उर्वरीत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रु.3,25,54,148/- चे अंदाजपत्रक SSR 2022 23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.

उक्त नमुद भागातील रस्ता हा 24.00 मी. रुंद विकास योजना रस्ता असुन या पुर्वी या रस्त्याचा काही भाग विकसीत झाला आहे. परंतु सदर रस्त्याचे उर्वरीत भाग विकसीत झाल्याशिवाय थेट पैठण रोडवर जाणे शक्य नाही. त्यामुळे सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकात सुमारे 900.00 मी. लांब व 14.00 मी. रुंद रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरणेचे काम प्रस्तावित आहे.

सदरील कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024 25 अंतर्गत पृष्ठ क्र. E 28 वरील विकास योजने अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत अ. क्र. 02 वर रक्कम रू. 57.80 लक्ष तरतुद मधुन करता येईल.

करीता ईटखेडा येथील अग्रसेन शाळा ते पैठण रोड या उर्वरीत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रु.3,25,54,148/- चा अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1880/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ईटखेडा येथील अग्रसेन शाळा ते पैठण रोड या उर्वरीत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रु.3,25,54,148/- चा अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1881/2025:-</u> (कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.28.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा नियोजन समितीच्या प्राप्त निधीमधुन महानगरपालिका शाळेमध्ये 36 ठिकाणी प्री-फॅब्रीकेटेड कंटेनर लायब्ररी उभारण्यात आल्या आहेत. सदर कामाचे अंदाज पत्रक 9,99,54,000/- असुन सदर कामी 36 कंटेनर बसवण्यात आले आहेत. या कामाचे तिसरे व दरम्यान देयकानंतर या कामात रु.52,10,986/- एवढी बचत झालेली आहे. या बचतीमधुन महानगरपालिकेने एन-11, सिडको येथील शाळेच्या आवारात व एक कंटेनर अभ्यासिका बाबा पेट्रोल पंप जवळ येथे असे दोन कंटेनर चे काम वाढीव काम दोन कंटेनर अभ्यासिका स्वरुपाने करण्यात आले आहे. यातील एक कंटेनर पेट्रोल पंप येथे शहर पोलिस, वाहतुक शाखा यांना सामाजिक बांधिलकी म्हणुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

करीता एन-11, सिडको महानगरपालिका शाळा व बाबा पेट्रोल पंप येथे वाहतुक शाखेसाठी कंटेनर उभारणे या कामास व मुळ कामातील बचतीमधून करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1881/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-11, सिडको महानगरपालिका शाळा व बाबा पेट्रोल पंप येथे वाहतुक शाखेसाठी कंटेनर उभारणे या कामास व मुळ कामातील बचतीमधून करणेचा प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. आवश्यकता असल्यास विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर करावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1882/2025:-</u> (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.30.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.04 अंतर्गत जटवाडा कॉर्नर येथील मध्यवर्ती कारागृह अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1860/2025 दि.20.03.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च जिल्हा वार्षिक नियोजन समिती (DPDC) वर्ष 2024-25 या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येणार आहे.

या कामासाठी शासनाच्या संकेतस्थळावरुन निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांका पर्यंत 05 निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलल्या कागदपत्रान्वये प्राप्त 05 निविदाधारकांपैकी 02 निविदाधारक मे.गणराज कन्स्ट्रक्शन व

श्री.अभय किसनराव भोसले यांना अपुर्ण दस्ताऐवजांची पुर्तता न केल्याने ते तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्याने उर्वरित 03 निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र 03 निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.श्रीनिवास वास्तुनिर्माण प्रा.लि. यांची असुनती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे.

| संदर्भ:- Tender ID : 2025_AMCA_1164706_1 दि.28.03.2025 | | |
|---|---|---|
| **अ.क्र** | **विवरण** | **शेरा** |
| 1. | विभागाचे नाव | उप अभियंता, झोन क्र.04 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, अं.प.र.रु.2,99,63,000/-/- मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1680/2025 दि.20.03.2025 |
| | त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.2,42,14,522/- |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | दि.27.03.2025 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक (वाणिज्य देकार) | दि.28.03.2025 |
| | क) निविदा काढण्याची वेळ | प्रथम |
| 5. | ड) एकुण प्राप्त निविदा | 05 |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे आहे)

| **अ क** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | **र.रु.** | **टक्केवारी** |
| 1. | मे.श्रीनिवास वास्तुनिर्माण प्रा.लि. | रु.2,42,14,522/- | र.रु.2,41,90,307/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने |
| 2. | मे.देवपुळकर अँण्ड ब्रदर्स | रु.2,42,14,522/- | र.रु.2,55,77,799/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.63% जास्त दराने |
| 3. | मे.के.एच.कन्स्ट्रक्शन | रु.2,42,14,522/- | र.रु.2,59,09,538 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.00% जास्त दराने |

| **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | **शेरा** |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षका वर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | जिल्हा वार्षिक योजना (DPDC) |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

उक्त निविदाकारांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.श्रीनिवास वास्तुनिर्माण प्रा.लि. यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची आहे. करीता सर्वात कमी दराची निविदा मे.श्रीनिवास वास्तुनिर्माण प्रा.लि. यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1882/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.04 अंतर्गत जटवाडा कॉर्नर येथील मध्यवर्ती कारागृह अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत या कामाच्या प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.श्रीनिवास वास्तुनिर्माण प्रा.लि. यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1883/2025:-** **(कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.30.03.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत झोन क्र.08 अंतर्गत मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत विविध रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1871/2025 दि.21.03.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाकरीता जिल्हा वार्षिक नियोजन समिती (DPDC) वर्ष 2024-25 या योजनेअंतर्गत करण्यात येणार आहे.

सदर कामासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांका पर्यंत 05 निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागद पत्रान्वये प्राप्त 05 निविदाधारकांपैकी 02 निविदाधारक मे.व्ही.बी.ए.इन्फ्रा व अविनाश मिटकरी हे निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्याने उर्वरित 03 निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र 03 निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा पी.एस.बागडे यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे.

संदर्भ :- TENDER ID_2025_ AMCA_1164454_01

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता रस्ते |
| 2. | कामाचे स्वरुप | जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 झोन क्र.08 अंतर्गत मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत विविध रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, अं.प.र.रु.6,60,48,750/- यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1871/2025 दि.21.03.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.5,31,14,890/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडरची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ - महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.24.03.2025 |
| 5. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.25.03.2025 ते दि.28.03.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.29.03.2025 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम वेळ |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 05 (पाच) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालीलप्रमाणे आहे)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | पी.एस.बागडे | र.रु.5,31,14,890.35 | र.रु.5223221 | 0.99% कमी दराने |
| 2. | अभिजीत चव्हाण | र.रु.5,31,14,890.35 | र.रु.52754491 | 0.00% कमी दराने |
| 3. | व्ही.टी.पाटील | र.रु.5,31,14,890.35 | र.रु.54864670 | 4.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | जिल्हा वार्षिक नियोजन समिती (DPDC) | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | | --- |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |

मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1871/2025 दि.21.03.2025 अन्वये जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत झोन क्र.08 अंतर्गत मनपा वॉर्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत विविध रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.6,60,48,450/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. उक्त नमुद कामाची निविदा ई-टेंडरींग माध्यमातून मागविण्यात आली आहे.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक पी.एस.बागडे यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 0.99% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.5,22,32,221/- ची प्राप्त असुन निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1883/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना सन-2024-25 अंतर्गत झोन क्र.08 अंतर्गत मनपा वार्ड क्र.115 सातारा गांव अंतर्गत विविध रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाज पत्रकास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1871/2025 दि.21.03.2025 अन्वये मान्यता प्रदान असून या कामाकरीता प्राप्त L1 निविदाधारक पी.एस.बागडे यांची निविदा, निविदा रक्कमेच्या 0.99% कमी दराने प्राप्त आहे.

करीता सदरील कामाचे L1 निविदाधारक पी.एस.बागडे यांची निविदा, निविदा रक्कमेच्या 0.99% कमी दराची म्हणजेच र.रु.5,22,32,221/- ची निविदा स्विकृतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1884/2025:-</u> (जलतरण विभाग)** **(दि.01.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलावाचे कार्यान्वियन व संचलन महानगरपालिकेतर्फे करण्यात येते. सिध्दार्थ जलतरण तलाव कार्यान्वीत ठेवणे अंतर्गत कार्यरत 10 कर्मचा-यांच्या मासीक वेतनावरील खर्च, रासायनिक साहित्य खर्च, विदयुत देयके, जलतरण तलावाची देखभाल व दुरुस्ती तसेच पाण्याची उपलब्धता इत्यादी खर्च विचारात घेता, मासीक उत्पन्नाच्या तुलनेत खर्चात भर पडत आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील इतर खाजगी व्यवसायीक उदा.हॉटेल अजिंठा ॲम्बेसिडर, राकाज लाईफ स्टाईल क्लब, औरंगाबाद जिमखाना, एमजीएम हेल्थ ॲण्ड स्पोर्टस क्लब इ.ठिकाणच्या जलतरण तलावाचे उपभोग शुल्क हे महानगरपालिकेच्या उपभोग शुल्कापेक्षा 4 ते 5 पटीने जास्तीचे आहे.

करीता सिध्दार्थ जलतरण तलावाचे सदस्य/लाभार्थ्यांद्वारे प्राप्त उत्पन्न व तलावाचा कार्यान्वयीन खर्च हा किमान ना नफा ना तोटा या तत्वावर येणेसाठी सिध्दार्थ जलतरण तलावाच्या उपभोग/सभासद शुल्कात खालील प्रमाणे वाढ करण्याचा प्रस्ताव आहे.

अ**) <u>मुले (12 वर्ष वरील)पुरुष/महिला</u>**

| **अ. क्र.** | **कालावधी** | **वर्तमान दर** | **प्रस्तावीत शुल्क वाढ** | |
|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला (दरात 20% सुट) |
| 1. | मासिक | 1200/- | 1700/- | 1360/- |
| 2. | त्रेमासिक | 3000/- | 4000/- | 3200/- |
| 3. | वार्षिक | 7000/- | 12000/- | 9600/- |
| 4. | अजीव सभासद (विस वर्षे मर्यादित) | 31050/- | 51000/- | 40800/- |

**ब) 12 वर्षाखालील मुले/मुली**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावीत शुल्क वाढ |
|---|---|---|---|
| 1. | मासिक | 800/- | 1000/- |
| 2. | त्रैमासिक | 2000/- | 2500/- |
| 3. | वार्षिक | 4000/- | 6000/- |

क) **कौटुंबिक (आई-वडील व दोन मुलांकरीता मर्यादीत)**

| अ.क्र | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावीत शुल्क वाढ |
|---|---|---|---|
| 1. | मासिक | 4000/- | 6000/- |
| 2. | त्रैमासिक | 8000/- | 10000/- |
| 3. | वार्षिक | 15000/- | 20000/- |

**ड) इतर शुल्क**

| अ.क्र. | विवरण | वर्तमान दर | प्रस्तावीत शुल्क वाढ |
|---|---|---|---|
| 1. | ओळखपत्र | 25/- | 25/- |
| 2. | चाचणी | 20/- | 20/- |
| 3. | प्रवेशअर्ज | 5/- | 5/- |
| 4. | प्रशिक्षण | 500/- | 1000/- |
| 5. | एक तासाकरीता | 150/- | 300/- |
| 6. | दंड | 50/- | 100/- |
| 7. | जलतरण तलाव स्पर्धेसाठी भाडेपोटी शुल्क प्रति तास एक दिवसाकरिता | | 3000/- 10,000/- |

सिध्दार्थ जलतरण तलाव करीता ऑनलाईन सभासद नोंदणी प्रक्रिया प्रकल्प संचालक, स्मार्ट सिटी यांच्या सहाय्याने अंतीम टप्प्यात आहे. करीता सिध्दार्थ जलतरण तलावाचे उपभोग/सभासद शुल्कात उक्त अ, ब, क, ड वाढ करणे, शुल्क वाढ दिनांक 01 एप्रिल 2025 पासुन लागु करणे, तसेच पुढील आर्थिक वर्ष सन 2026-27 पासुन प्रत्येक वर्षी उपभोग/सभासद शुल्कात 10% वाढ करण्यास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1884/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उदयान येथील सिध्दार्थ जलतरण तलावाचे उपभोग/सभासद शुल्कात 'अ', 'ब', 'क', 'ड' नुसार प्रस्तावीत केलेल्या शुल्क वाढीस मान्यता देण्यात येते. तसेच सदरची शुल्क वाढ दिनांक 01 एप्रिल 2025 पासुन लागु करणे, तसेच आर्थिक वर्ष सन 2026-27 पासुन पुढील प्रत्येक वर्षी उपभोग/सभासद शुल्कात 10% वाढ करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1885/2025:-</u> (कार्य.अभि.पापु विभाग)** **(दि.02.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने वरील विश्वभारती पंपगृह येथे 40 अ.श. क्षमतेचे दोन सेन्ट्रीफ्युगल पंपसेट कार्यरत असून, याव्दारे ज्योती नगर येथील जलकुंभ भरणे व आसपासच्या परिसरात पाणी पुरवठा करण्याचे काम केले जाते. सदरील ठिकाणी 2.00 लक्ष लिटर क्षमतेचे बेठे जलकुंभ (GSR) नव्याने उभारण्यात आले असून, या जलकुंभा मधुन विश्वभारती जलकुंभ भरण्याचे नियोजन आहे. यासाठी 32 Mtr. हेड, 200 $M^3$ Hr. डिस्चार्ज क्षमतेचे दोन सबमर्शिबल विद्युत पंप (एक कार्यरत व एक स्टॅण्डबाय) व त्यासाठी पुरक क्षमतेचे एक एटीएस पॅनल बसविणे गरजेचे असुन, यामुळे एकाच वेळी ज्योतीनगर येथील जलकुंभ भरणे व आसपास च्या परिसरात नियमीत पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे.

उपरोक्त नमुद कामासाठी नामांकीत पंप व एटीएस पॅनल यांच्या उत्पादकांमार्फत बजेटरी ऑफर्स मागवून. प्राप्त न्युनतम दर व DSR/MJP/PWD/Ele/Mech/Civil 2023-24 नुसार अंदाज पत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रकानुसार एटीएस पॅनलसहीत नविन 40 अ.श.

क्षमतेचे दोन हॉरीझॉन्टल सबमर्ल्ड सेन्ट्रोफ्युगल मोटार पंपसेट आवश्यक उपकरणांसह पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे या कामासाठी एकूण र.रु.38,24,890/- खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च सन 2024-25 आर्थिक वर्षातील "यंत्र देखभाल दुरुस्ती-शहर" या लेखाशिर्षाच्या तरतुदी मधून करण्यात येईल.

करीता विश्वभारती जलकुंभ येथे 40 अ.श. क्षमतेचे दोन हॉरीझॉन्टल सबमर्ज्ड सेन्ट्रीफ्युगल पंपसेट पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे बाबत कामासाठी एकुण रु.38,24,890/- अंदाजपत्रकीय रकमेचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1885/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विश्वभारती जलकुंभ येथे 40 अ.श.क्षमतेचे दोन हॉरीझॉन्टल सबमज्डे सेन्ट्रीफ्युगल पंपसेट पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे बाबत कामासाठी एकुण रु.38,24,890/- अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1886/2025:- (कार्य.अभि.ड्रेनेज विभाग) (दि.02.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेस उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्या पत्रान्वये, विभागीय क्रीडा संकुलास मुबलक प्रमाणात प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी विनंती केली आहे. सदरच्या पत्रान्वये, विभागीय क्रीडा संकुलास 5 ते 6 लक्ष लीटर पाण्याची आवश्यकता असुन, त्यापेक्षा जास्त प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यास, या पाण्याचा वापर उद्यान विकसित करणेसाठी, तसेच विभागीय क्रीडा संकुलात होऊ घातलेल्या नैसर्गिक गवताच्या फुटबॉलच्या मैदानासाठी व हॉकी ॲस्ट्रो टर्फसाठी वापर करण्यात येईल, असे कळविले आहे.

त्याअनुषंगाने विभागीय क्रीडा संकुल येथे स्थळ पाहणी केली असता, सदर परिसरात I MLD क्षमतेचा विकेंद्रीत पद्धतीचा Pre-fabricated STP उभारणेचे नियोजन करण्यात आले आहे.

त्यानुसार विभागीय क्रीडा संकुल येथे 1 MLD क्षमतेचा Decentralized STP उभारणे, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.2,65,24,752/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रका मध्ये Electrical Work, Operation & Maintenance for Two years व Civil work मध्ये Pre-fabricated STP, Foundation, Pipeline, Collection Tank, Treated Water Pipeline ईत्यादींचा समावेश आहे.

तसेच अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह हर्सुल, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रामध्ये त्यांनी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहामध्ये विविध गुन्ह्यांमध्ये एकुण 1800 ते 1900 कैदी बंदिस्त आहेत. तसेच कारागृह परिसरात अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता एकुण 170 निवासस्थाने असुन अधिकारी व कर्मचारी यांचे कुटुंबीय त्यामध्ये वास्तव्यास आहेत. सदर ठिकाणी पाण्याची कमतरता असुन, दररोजच्या वापरातील हजारो लिटर सांडपाणी वाहुन जात असुन, सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केल्यास सदरचे पाणी पिण्या व्यतिरीक्त दुव्यम वापराकरीता जसे की, झाडे जगविणे, उद्यान विकसित करणे, ईत्यादींसाठी वापरात घेता येणे शक्य होईल. त्याकरीता मध्यवर्ती कारागृह परिसरात प्रक्रियायुक्त पाण्याचा प्रकल्प उभारणी करून देण्याची त्यांनी पत्राद्वारे विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने मध्यवर्ती कारागृह परिसर येथे स्थळ पाहणी केली असता, सदर परिसरात 100 KLD चा एक व 800 KLD एक असे दोन विकेंद्रीत पद्धतीचा Pre-fabricated STP उभारणेचे नियोजन करण्यात आले आहे.

त्यानुसार मध्यवर्ती कारागृह परिसरात 800 KLD क्षमतेचा Decentralized STP उभारणे, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.2,34,91,735/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये Electrical Work, Operation & Maintenance for two years व Civil Work मध्ये Pre-fabricated STP, Foundation, Pipeline, Collection Tank. Treated Water Pipeline ईत्यादींचा समावेश आहे.

असे दोन्ही कामांचे एकत्रित अं.प.र.रु.5,00,16,487/- चे तयार करण्यात आले आहे. या कामांच्या खर्चासाठी जिल्हा नियोजन समिती यांना निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. यासाठी वीज बिलाचा खर्च विभागीय क्रिडा संकुल करणार असल्याचे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच मध्यवर्ती कारागृह प्रशासनास वीज बिलाचा खर्च करावा लागेल, असे कळविण्यात येईल. तसेच दोन्ही ठिकाणी STP उभारुन झाल्यावर 2 वर्षे व्यवस्थापन व संचलनाचा खर्च सदरचे अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे. तदनंतर व्यवस्थापन व संचलनाचा खर्च विभागीय क्रिडा संकुल व मध्यवर्ती कारागृह प्रशासनास बंधनकारक करण्यात येईल.

करिता, विभागीय क्रीडा संकुल येथे 1 MLD क्षमतेचा व मध्यवर्ती कारागृह परिसरात 800 KLD क्षमतेचा Decentralized STP उभारणे, या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रु.5,00,16,487/- मान्यतेस्तव तसेच जिल्हा नियोजन समितीस निधी मागणी साठीचा प्रस्ताव सादर करणेस व जिल्हा नियोजन समिती मधुन निधी प्राप्त होईल, याच्या अधिन राहुन ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे व या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करणेचा अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1886/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीय क्रीडा संकुल येथे 1 MLD क्षमतेचा व मध्यवर्ती कारागृह परिसरात 800 KLD क्षमतेचा Decentralized STP उभारणे, या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक र.रु.5,00,16,487/- मान्यतेस्तव तसेच जिल्हा नियोजन समितीस निधी मागणी साठीचा प्रस्ताव सादर करणेस व जिल्हा नियोजन समिती मधुन निधी प्राप्त होईल, याच्या अधिन राहुन ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे व या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करणेचा अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करणे, या सर्व बाबींसमान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1887/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.03.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत तांत्रिक विभाग हा कार्यान्वयन व अंमलबजावणी करणारा विभाग असून शहरातील विविध महत्वाच्या योजना, प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरिकांच्या तक्रारींचे निरसण करणे इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडले. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यापैकी बहुतांश कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे महत्वपूर्ण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्या साठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून तांत्रिक स्वरुपाची कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. तसेच उक्त तांत्रिक कामे पूर्ण करण्यासाठी जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिका-यांची अत्यंत कमतरता भासत आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत अंर्गत सद्यस्थितीत विविध तांत्रिक कामे सुरु असून शहरासाठी नविन पाणीपुरवठा योजना व नो नेटवर्क झोनमध्ये मलनिःसारण वाहिन्यांचे जाळे निर्माण करणे हे प्रकल्प सुरु आहेत. श्री.अविनाश देशमुख हे दि.31.03.2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असून त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

त्यानुषंगाने "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके अंतर्गत सातारा देवळाई भागात भूमिगत गटार योजना, शहरात विविध रस्त्यांचे पॅकेजनिहाय सिमेंट कॉक्रिटींग करणे, घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत साठवणूक कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे, नेहरु भवन येथे व्यापारी संकुल विकसित करणे, शहरात विविध ठिकाणी Aspirational Toilet बांधणे इ. कामे" या विवक्षित कामाकरीता श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरिक्त शहर अभियंता यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची

नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.02.04.2025 रोजी संपत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्या असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजूरीने या अटीवर करता येतील की. आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्व मंजूरी वाचून अशा कोणत्याही नेमणूकीचे नविनकरण करता येणार नाही.

करिता श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरिक्त शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांची शहरा साठी नविन पाणीपुरवठा योजना व मलनिःसारण वाहिन्यांचे विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण व देखभाल करणे तसेच या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करणे या विवक्षित कामासाठी 03 महिने इतक्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत व त्यांना करार पध्दतीने नेमणूक करतांना नियुक्तीच्यावेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल, याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1887/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरिक्त शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांची शहरासाठी नविन पाणीपुरवठा योजना व मलनिःसारण वाहिन्यांचे विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण व देखभाल करणे तसेच या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करणे या विवक्षित कामासाठी 03 महिने इतक्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत व त्यांना करार पध्दतीने नेमणूक करतांना नियुक्तीच्यावेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल, या बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1888/2025:-</u> (गुंठेवारी विभाग)** **(दि.09.04.2025)**

1. शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवि-30 दि.18.10.2021
2. प्रस्ताव क्रमांक 334/2022 दि.31.03.2022 अन्वये धोरणात्मक निर्णय
3. कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/नरवि/उसंनर/730/2022 दि.31.03.2022
4. शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिक्षेत्रासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा)-2021 ची अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/ व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023 नुसार कार्यालयीन परिपत्रक प्राप्त असुन त्यामध्ये शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवि-30 दि.18.10.2021 नुसार शुल्काची आकारणी करणे बाबत निर्देश दिले आहेत.

त्यास अनुसरुन नमुद दर हे कमाल मर्यादा दर गृहीत धरुन त्या कमाल मर्यादेला अधिन राहुन निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर शासन आदेशात खालील प्रमाणे दर आकारण्या बाबत तपशिल.

| अ. क्र. | मुद्दा | प्रशमन शुल्क | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म.न.पा. क्षेत्र | अ वर्ग न.प.क्षेत्र | ब वर्ग न.प.क्षेत्र | क वर्ग न.प.क्षेत्र | वि.नि.प्राधिकरण/ नवनगर वि. प्राधिकरण क्षेत्र | इतर क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | | | | | |

| | | |
|---|---|---|
| 1. | रेखांकने | विकास शुल्काच्या तीनपट |
| 2. | रेखांकनातील भुखंड | उपरोक्त 1 नुसार रक्कम वसुल झाली नसल्यास विकास शुल्काचे तीनपट |
| 3. | मुळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक | निरंक |
| 4. | मुळ चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक केलेले बांधकाम<br>टिप:- मुळ अनुज्ञेय च क्षे.नि.पेक्षा अधिक केलेले बांधकाम हे विकास योजना प्रादेशिक योजनांसाठी शासनाने दि.02.02.2020 रोजी मंजुर केलेल्या एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीनुसार अधिमुल्याचा भरणा करुन प्राप्त होणारा अतिरीक्त च.क्षे.नि.गुंठेवारी विकासा साठी अनुज्ञेय असलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कानुसार प्राप्त च.क्षे.नि. यांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. | कॉलम-2 मधील नमुद मुळ अनुज्ञेय च.क्षे.नि.पेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रासाठी वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यामधील जमिन दराच्या 10% नुसार हिशोबित होणारी रक्कम<br><br>टिप:- मुळ अनुज्ञेय च.क्षे.नि.पेक्षा अधिक केलेले बांधकाम हे विकास योजना प्रादेशिक योजनांसाठी शासनाने दि.02.02.2020 रोजी मंजुर केलेल्या एकत्रितकृत विकास व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीनुसार अधिमुल्याचा भरणा करुन प्राप्त होणारा अतिरीक्त च.क्षे.नि.गुंठेवारी निकासासाठी अनुज्ञेय असलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कानुसार प्राप्त च.क्षे.नि.यांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. |
| 5. | सामासिक अंतर केलेले बांधकाम | सामासिक अतरात केलेल्या बांधकामासाठी वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यामधील जमिन दराच्या 10% नुसार हिशेबित होणारी रक्कम |

| | |
|---|---|
| विकास मुल्य | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-1966 चे कलम 124 (अे) दि.02.12.2020 रोजीची मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्रमांक 2.2.13 नुसार विकास शुल्क आकरण्यात यावे. |
| विकास आकार | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील इमारती नियमित करीत असतांना इमारतींचे बांधकामे पुर्ण असलेल्या भुखंडास गुंठेवारी अंतर्गत नियमित करीत असतांना सदर क्षेत्रात पायाभुत सेवा-सुविधा यापुर्वी महानगरपालिकेने दिलेली असल्याने सदर भुखंडास विकास आकार (Betterment Charges) लागु करण्यात येणार नाही.<br>आणि<br>गुंठेवारी अंतर्गत निव्वळ खुला भुखंड नियमितीकरण करावयाचे झाल्यास गुंठेवारी शुल्कासह विकास आकार (Betterment Charges) 100% लागु करण्यात येईल व त्यास परिसरातील पायाभुत सुविधेस अनुसरुन वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक यांना राहतील. |

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023 नुसार गुंठेवारी विकास नियमित करतांना आकरण्यात यावयाचे प्रशमन शुल्क व विकास आकार शुल्काची आकारणी करणे बाबतच्या धोरणात्मक निर्णयास मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1888/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिक्षेत्रातील महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 ची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023 नुसार गुंठेवारी विकास नियमित करतांना आकारण्यात यावयाचे प्रशमन शुल्क व विकास आकार शुल्काची आकारणी करणे बाबतच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**<u>प्रस्ताव क्रमांक 1889/2025:-</u> (गुंठेवारी विभाग)** **(दि.09.04.2025)**

1. शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवि-30 दि.18.10.2021
2. प्रस्ताव क्रमांक 334/2022 दि.31.03.2022 अन्वये धोरणात्मक निर्णय

3. कार्यालयीनआदेश जा.क्र./मनपा/नरवि/उसंनर/730/2022 दि.31.03.2022
4. शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023
5. ठराव क्र.1888/2025 दि.09.04.2025

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिक्षेत्रासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा)-2021 ची अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/ व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023 नुसार कार्यालयीन परिपत्रक प्राप्त असुन त्यामध्ये शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवि-30 दि.18.10.2021 नुसार शुल्काची आकारणी करणे बाबत निर्देश दिले आहेत.

त्यास अनुसरुन नमुद दर हे कमाल मर्यादा दर गृहीत धरुन त्या कमाल मर्यादेला अधिन राहुन निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर शासन आदेशात खालील प्रमाणे दर आकारण्या बाबत तपशिल.

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">मुद्दा</th><th colspan="6">प्रशमन शुल्क</th></tr>
<tr><th>म.न.पा. क्षेत्र</th><th>अ वर्ग न.प.क्षेत्र</th><th>ब वर्ग न.प.क्षेत्र</th><th>क वर्ग न.प.क्षेत्र</th><th>वि.नि.प्राधिकरण/ नवनगर वि.प्राधिकरण क्षेत्र</th><th>इतर क्षेत्र</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td colspan="6">3</td></tr>
<tr><td>1.</td><td>रेखांकने</td><td colspan="6">विकास शुल्काच्या तीनपट</td></tr>
<tr><td>2.</td><td>रेखांकनातील भुखंड</td><td colspan="6">उपरोक्त 1 नुसार रक्कम वसुल झाली नसल्यास विकास शुल्काचे तीनपट</td></tr>
<tr><td>3.</td><td>मुळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक</td><td colspan="6">निरंक</td></tr>
<tr><td>4.</td><td>मुळ चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक केलेले बांधकाम<br>टिप:- मुळ अनुज्ञेय च क्षे.नि.पेक्षा अधिक केलेले बांधकाम हे विकास योजना प्रादेशिक योजनांसाठी शासनाने दि.02.02.2020 रोजी मंजुर केलेल्या एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीनुसार अधिमुल्याचा भरणा करुन प्राप्त होणारा अतिरीक्त च.क्षे.नि.गुंठेवारी विकासासाठी अनुज्ञये असलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कानुसार प्राप्त च.क्षे.नि. यांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.</td><td colspan="6">कॉलम-2 मधील नमुद मुळ अनुज्ञेय च.क्षे.नि.पेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रासाठी वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यामधील जमिन दराच्या 10% नुसार हिशोबित होणारी रक्कम<br><br>टिप:- मुळ अनुज्ञेय च.क्षे.नि.पेक्षा अधिक केलेले बांधकाम हे विकास योजना प्रादेशिक योजनांसाठी शासनाने दि.02.02.2020 रोजी मंजुर केलेल्या एकत्रिकृत विकास व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीनुसार अधिकमुल्याचा भरणा करुन प्राप्त होणारा अतिरीक्त च.क्षे.नि.गुंठेवारी विकासासाठी अनुज्ञेय असलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कानुसार प्राप्त च.क्षे.नि.यांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>5.</td><td>सामासिक अंतर केलेले बांधकाम</td><td colspan="6">सामासिक अतरात केलेल्या बांधकामासाठी वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यामधील जमिन दराच्या 10% नुसार हिशेबित होणारी रक्कम</td></tr>
</table>

<table>
<tr><td>विकास मुल्य</td><td>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-1966 चे कलम 124 (अे) व दि.02.12.2020 रोजीची मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्रमांक 2.2.13 नुसार विकास शुल्क आकरण्यात यावे.</td></tr>
<tr><td>विकास आकार</td><td>छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील इमारती नियमित करीत असतांना इमारतींचे बांधकामे पुर्ण असलेल्या भुखंडास गुंठेवारी अंतर्गत नियमित करीत असतांना सदर क्षेत्रात पायाभुत सेवा-सुविधा यापुर्वी महानगरपालिकेने दिलेली असल्याने सदर भुखंडास विकास आकार (Betterment Charges) लागु करण्यात येणार नाही.<br>आणि<br>गुंठेवारी अंतर्गत निव्वळ खुला भुखंड नियमितीकरण करावयाचे झाल्यास गुंठेवारी शुल्कासह विकास</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | आकार (Betterment Charges) 100% लागु करण्यात येईल व त्यास परिसरातील पायाभुत सुविधेस अनुसरुन वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक यांना राहतील. |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिक्षेत्रातील महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 ची अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51/प्र.क्र.150/2022/नवि-30 दि.04.12.2023 नुसार गुंठेवारी विकास नियमित करतांना वरील तक्त्यामध्ये नमुद नुसार गुंठेवारी नियमितीकरणासाठी उक्त शासन निर्णयानुसार शुल्क आकारणी करण्यात येत आहे. सदर अनधिकृत भुखंडाचे नियमितीकरण करीता असतांना 200.00 चौ.मी.पर्यंत क्षेत्र असलेल्या भुखंडाचे नियमितीकरण करतांना आकारण्यात येत असलेले विकास आकार (Betterment Charges) यामध्ये 100% ऐवजी दि.01.04.2025 ते दि.30.06.2025 या कालावधी साठी 50% आणि दि.01.07.2025 ते दि.30.09.2025 या कालावधीसाठी 25% याप्रमाणे पुढील 06 महीने सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1889/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिक्षेत्रातील महाराष्ट्रा गुंठेवारी विकास अधिनियम 2001 (सुधारणा) 2021 ची अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्रा शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-1022/व्हीआयपी/51 प्र.क्र.150/2022/नवि-30, दि.04.12.2023 नुसार गुंठेवारी विकास नियमित करतांना वरील तक्त्यामध्ये नमुदनुसार गुंठेवारी नियमितीकरणासाठी उक्त शासन निर्णया नुसार शुल्क आकारणी करण्यात येत आहे. सदर अनधिकृत भुखंडाचे नियमितीकरण करीत असतांना, 200.00 चौ.मी.पर्यंत क्षेत्र असलेल्या भुखंडाचे नियमितीकरण करतांना आकारण्यात येत असलेले विकास आकार (Betterment Charges) यामध्ये 100% ऐवजी दि.01.04.2025 ते दि.30.06.2025 या कालावधीसाठी 50% आणि दि.01.07.2025 ते दि.30.09.2025 या कालावधीसाठी 25% याप्रमाणे पुढील 06 महिने सवलत देण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1890/2025:-</u> (विद्युत विभाग)** **(दि.09.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा देवळाई व शहरातील इतर भागात नवीन 16000 एल.ई.डी पथदिवे लावणे बाबत (LED BOT प्रकल्प Phase-II) या कामासाठी ठराव क्र.1665/2024 दि.11.10.2024 अन्वये L-1 JV निविदाधारक यांचे Lead Partner M/S Elektron Energy Efficiency Service LLP यांच्या सोबत करारनामा करण्यात आला होता.

निविदेच्या अटी व शर्ती Terms & Conditions for Eligibility of Bidders, Clause No.05 (Page No.6) sub Clauses Sr.No.1 To 6, Joint venture साठी विविध अटी व शर्ती नमुद केलेल्या आहे. या अटी व शर्तीच्या नुसार LOA मिळाल्यानंतर BOT Contratcter यांनी नवीन JV Entity स्थापना करुन त्याचे Registration करणे नवीन GST व पॅनकार्ड घेणे आवश्यक होते.

या अटी व शर्ती प्रमाणे JV निविदाधारकाने M/s Elektron Lighting Services या नावाने JV Entity स्थापना केली आहे व या करीता आवश्यक पॅनकार्ड क्र.(AALFE6438P) GST Registration No.(27AALFE6438PIZO) व तसेच Partnership Firm Registraion Government of Maharashtra क्र.(AU000013780) याची प्रक्रिया पूर्ण करुन पत्र क्र.ELS/LED/CSMC/08 Date 08.01.2025 प्रमाणे कळविण्यात आले आहे.

करीता LED BOT Project Phase-II साठीच्या सर्व बाबी, नविन JV Entity M/s Elektron Lighting Services च्या नावाने करण्याच्या मान्यतेस्तव सादर

**<u>ठराव क्रमांक 1890/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निविदेच्या अटी व शर्ती Terms & Conditions for Eligibility of Bidders, Clause No.05 (Page No.06), Sub Clauses sr.no.1 To 6, Joint venture साठी विविध अटी व शर्ती नमुद केल्याप्रमाणे LOA मिळाल्यानंतर नविन JV (Joint

Venture Entity) M/s Elektron Lighting Services या नावाने स्थापना करुन सर्व बार्बीची पुर्तता केली आहे.

करीता LED BOT Project Phase-II साठीच्या सर्व बाबी M/s Elektron Lighting Services या नावाने करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1891/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.09.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क.01 व 02 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार रक्कम रु.36,65,813/-(18%GST) सह चे तयार करण्यात आले आहे. यास मा.स्थायी समिती सभा मंजुर ठराव क्र.1804/2025 दि.05/02/2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.31,06,621/- च्या मर्यादित ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता यामध्ये पात्र L1 निविधाधारक श्री.नदीम खान अमीनुद्दीन खान कंत्राटदार हे असुन त्यांनी भारणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.19% कमी दराने म्हणजेच र.रु.30,07,519.88/- (GST वगळुन) चे प्राप्त असुन सदर काम संबधीत कंत्राटदाराकडून करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ : टेन्डर क्र.आय.डी.2025 AMCA 1155669 01 सन 2024-2025

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता, झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र.01 व 02 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे बाबत |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा.स्थायी समिती सभा मंजुर ठराव क्र.1804/2025 दि.05/02/2025 नुसार रक्कम रु.36,65,813/-यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.31,06,621/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडरची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ –महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.28.02.2025 |
| 5. | आ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.28.02.2025 ते दि.09.03.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.10.03.2025 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालीलप्रमाणे आहे)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | सिध्दीकी मोहम्मद मुजतबा रियाजोद्दीन | र.रु.30,28,955.57 | अदांजपत्रकीयदरापेक्षा 2.50% कमी दराने |
| 2. | नदीम खान अमीनुद्दीन खान | र.रु.30,07,519.88 | अदांजपत्रकीयदरापेक्षा 3.19% कमी दराने |
| 3. | प्रभाकर जी.मोहिते | र.रु.31,06,621.10 | अदांजपत्रकीय दराने |
| 4. | सुमेध प्रदिप गायकवाड | र.रु.30,75,554.89 | अदांजपत्रकीयदरापेक्षा 1.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद र.रु.10.00 लक्ष मधुन | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | | --- |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक नदीम खान अमीनुद्दीन खान, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.19% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.30,07,519.88 (GST वगळून) ची असुन निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1891/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र.01 व 02 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.36,65,813/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक श्री.नदीम खान अमीनुद्दीन खान, कंत्राटदार त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.19% कमी दराने म्हणजेच र.रु.30,07,519.88 (GST वगळून) चे प्राप्त असुन सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1892/2025:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.11.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे Game Zone विकरसीत करणेसाठी जागा भाडेतत्वावर देणे करीता बी-2 पध्दतीने निविदा मागविण्यासाठी प्रस्तावीत करण्यात आले आहे. प्रकरणी फेर आढावा घेतला असता असे दिसुन आले की, सिध्दार्थ उद्यानात लहान मुले/व्यक्तिंसाठी मिनी रेल्वे प्रकल्प, रबर वॉटर टँक व मुव्हेबल खेळणी, प्राणी संग्रहालय, मत्सालय, विविध खेळण्यांचा स्वतंत्र प्लॉट, संगित कारंजे कार्यान्वीत आहे. त्यामुळे उद्यानातील वापरायोग्य सिमित जागेचा विचार करता, गेमझोन परत कार्यान्वीत करणे व त्यासाठी जागा गुंतविणे संयुक्तीक होणार नाही असे ठरले.

उक्त नमुद प्रमाणे सिध्दार्थ उद्यानात रबर वॉटर टँक मधील वॉर टँक मधील वॉटर बोट व इतर मुव्हेबल खेळण्याचा प्रकल्प दि.10.03.2022 पासुन रॉयल्टी तत्वावर कार्यान्वीत केलेला आहे. सदर प्रकल्प फुड प्लॉझा/टपरी मार्केट शेजारी आहे. लगतच सुलभ शैचालय व सिध्दार्थ उद्यानातील संकलीत कचऱ्याचा Dumping area आहे.त्यामुळे वॉटर बोट चे आकर्षण निर्माण होत नाही वॉटर बोट विषयी सहली/पर्यटकांच्या तक्रारी असतात. तर लहान मुलांचे सार्वजनिक आरोग्य विषयक सुचना/तक्रारी प्राप्त होतात सबब उद्यानातील वापरा योग्य सिमित जागेचा विचार करता अस्तित्वातील रबर टँक वॅटर बोट व इतर मुव्हेबल खेळण्याचा प्रकल्पाच्या जागेवर लॉन अथवा पेव्हर ब्लॉक बसवुन पर्यटकांना वापरायोग्य वाढीव क्षेत्र उपलब्ध करुन देता येईल. करीता सिध्दार्थ उद्यान येथील प्रस्तावीत Game Zone रद्द करुन त्याजागी रबर टँक वॉटर व इतर मुव्हेबल खेळण्याचा प्रकल्प स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव आहे.

करीता सिध्दार्थ उद्यान येथील प्रस्तावीत Game Zone प्रकल्प रद्द करुन गेम झोन साठी राखीव जागेवर रबर टँक वॉटर बोट व इतर मुव्हेबल खेळण्याचा प्रकल्प स्थलांतरीत (जागा/स्थ्ळ बदला व्यतिरिक्त करारनामा, कार्यादेश मधील अटी/शर्ती कायम राहतील या अटीस अधीन राहून) करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1892/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील प्रस्तावित Game Zone प्रकल्प रद्द करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच या गेम झोन साठी राखीव जागेवर कार्यान्वीत असलेला रबर टँक

वॉटर बोट व इतर मुव्हेबल खेळण्याचा प्रकल्प स्थलांतरीत (जागा/स्थळ बदला व्यतिरिक्त करारनामा, कार्यादेश मधील अटी/शर्ती कायम राहतील या अटीस अधीन राहून) करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1893/2025:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1200 दि.05.02.2024 अन्वये नॅकॉफ इंडिया लिमिटेड या संस्थेस जेनेरीक औषधी दुकानासाठी मनपाचे एकुण 26 रुग्णालय तसेच नागरी आरोग्य केंद्र अंतर्गत उपलब्ध जागा भाडे तत्वावर 30 वर्षाकरीता देणे, दर 3 वर्षांनी 10% भाडेवाढ करण्यासह तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून औषधी दुकान सुरु करण्यासाठी दर 5 वर्षांनी भाडेपट्टा नुतनीकरण अटीसह ताब्यात देण्यासाठी प्रस्तावास मान्यता झाली आहे.

शासन निर्णय 2020/जा.क्र./137/नवि-20 दि.02.02.2023 मधील निर्देशानुसार नॅफॉक इंडिया लिमिटेड यांना महानगरपालिका रुग्णालयामध्ये जागा देणे बाबत दि.19.07.2023 रोजी मा.अतिरीक्त आयुक्त-1 महोदय यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदरील बैठकीमध्ये खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

1. मा.अतिरीक्त आयुक्त-1 — अध्यक्ष
2. उपायुक्त तथा मालमत्ता अधिकारी — सदस्य
3. वैद्यकीय आरोग्य अधिकारी — सदस्य सचिव
4. सहा.आयुक्त/प्रतिनिधी अन्न व औषधी प्रशासन — सदस्य

उपरोक्त अनुषंगाने प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये 120 चौरस फुट खुली जागा म्हणजेच 11.15 चौरस मीटर जागांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, 26 आरोग्य केंद्रातील जागासाठी मालमत्ता विभागाकडून अभिप्रेत करण्यात आलेली सिध्दशिघ्रगणकाप्रमाणे भाडे आकारणीचा तपशिल संचिकेत नमुद केलेला आहे.

मनपाच्या एकुण 26 पैकी खालील प्रमाणे 05 जागा भाडेतत्वावर देणेसाठी आयुक्त तथा प्रशासक यांनी आदेशित केलेली असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा ठरावानुसार मान्यता झालेली आहे.

1. नेहरुनगर आरोग्य केंद्र
2. जवाहर कॉलनी आरोग्य केंद्र
3. जिन्सी रेंगटीपुरा आरोग्य केंद्र
4. सिडको एन-8 रुग्णालय
5. सिडको एन-11 रुग्णालय

उपरोक्त नमुद 05 जागासाठी संबंधीतांसोबत करारनामा क्र.छ.स.न.1/6053 दि.30.08.2024 अन्वये करारनामा झालेला असुन सदरील जागेवर जेनेरीक औषधी दुकाने उघडण्यात आलेले आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1200 दि.05.02.2024 मध्ये नमुद एकुण 26 जागा नॅफॉक इंडिया लिमिटेड या संस्थेस भाडेतत्वावर देणेकरीता मालमत्ता विभागाकडून अभिप्रेत करण्यात आलेली सिध्दशिघ्रगणकाप्रमाणे भाडे आकारणी चा तपशील पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | आरोग्य केंद्राचे नाव | सिध्दशिघ्रगणकाप्रमाणे भाडे आकारणी 18% जी.एस.टी.सह |
|---|---|---|
| 1. | मेल्ट्रॉन रुग्णालय | र.रु.16578/- |
| 2. | बन्सिलाल नगर रुग्णालय | र.रु.25261/- |
| 3. | सिडको एन-8 रुग्णालय | र.रु.14605/- |
| 4. | बायजीपुरा आरोग्य केंद्र | र.रु.17525/- |
| 5. | भिमनगर आरोग्य केंद्र | र.रु.14868/- |
| 6. | चेतनानगर आरोग्य केंद्र | र.रु.6553/- |
| 7. | सिल्कमिल कॉलनी रुग्णालय | र.रु.5763/- |
| 8. | सिडको एन-11 रुग्णालय | र.रु.17130/- |

| | | |
|---|---|---|
| 9. | आरेफ कॉलनी आरोग्य केंद्र | र.रु.7421/- |
| 10. | नेहरुनगर आरोग्य केंद्र | र.रु.12314/- |
| 11. | गांधीनगर आरोग्य केंद्र | र.रु.15788/- |
| 12. | जवाहर कॉलनी आरोग्य केंद्र | र.रु.25578/- |
| 13. | राज नगर आरोग्य | र.रु.15315/- |
| 14. | पीर बाजार आरोग्य केंद्र | र.रु.7342/- |
| 15. | मुकुंदवाडी आरोग्य केंद्र | र.रु.2921/- |
| 16. | चिकलठाणा आरोग्य केंद्र | र.रु.18946/- |
| 17. | गणेश कॉलनी आरोग्य केंद्र | र.रु.12631/- |
| 18. | सादात नगर आरोग्य केंद्र | र.रु.5763/- |
| 19. | कबीर नगर आरोग्य केंद्र | र.रु.6473/- |
| 20. | नक्षत्रवाडी आरोग्य केंद्र | र.रु.6711/- |
| 21. | आरोग्य केंद्र हर्सुल | र.रु.5368/- |
| 22. | औरंगपुरा आरोग्य केंद्र | र.रु.79589/- |
| 23. | विजयनगर आरोग्य केंद्र | र.रु.50222/- |
| 24. | जिन्सी रेंगटीपुरा आरोग्य केंद्र | र.रु.17525/- |
| 25. | जुना बाजार आरोग्य केंद्र | र.रु.54485/- |
| 26. | रिलायंस मॉल,गारखेडा (व्यापारी संकुल) | र.रु.64273/- |

सदरील संचिकेत मालमत्ता विभागाकडुन अंकित केल्यानेसार व वैद्याकीय आरोग्य अधिकारी यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार खालील नमुद एकुण 21 आरोग्य केंद्र/रुग्णालय येथील उपलब्ध जागा/गाळे भाडेतत्वावर 30 वर्षाकरीता देणे, दर 03 वर्षानी 10% भाडेवाढ करणेसह अन्न व औषध प्रशासनाकडुन औषधी दुकान सरु करण्यासाठी दर 05 वर्षानी भाडेपट्टा नुतणीकरण अटीसह ताब्यात देण्याचा प्रास्ताव सादर करीत आहे.

| **अ. क्र.** | **आरोग्य केंद्राचे नाव** | **सिध्दशिघ्रगणकाप्रमाणे भाडे आकारणी 18% जी.एस.टी.सह** |
|---|---|---|
| 1. | मेल्ट्रॉन रुग्णालय | र.रु.16578/- |
| 2. | बन्सिलाल नगर रुग्णालय | र.रु.25261/- |
| 3. | बायजीपुरा आरोग्य केंद्र | र.रु.17525/- |
| 4. | भिमनगर आरोग्य केंद्र | र.रु.14868/- |
| 5. | चेतनानगर आरोग्य केंद्र | र.रु.6553/- |
| 6. | सिल्कमिल कॉलनी रुग्णालय | र.रु.5763/- |
| 7. | आरेफ कॉलनी आरोग्य केंद्र | र.रु.7421/- |
| 8. | गांधीनगर आरोग्य केंद्र | र.रु.15788/- |
| 9. | राजनगर आरोग्य | र.रु.15315/- |
| 10. | पीरबाजार आरोग्य केंद्र | र.रु.7342/- |
| 11. | मुकुंदवाडी आरोग्य केंद्र | र.रु.2921/- |
| 12. | चिकलठाणा आरोग्य केंद्र | र.रु.18946/- |
| 13. | गणेश कॉलनी आरोग्य केंद्र | र.रु.12631/- |
| 14. | सादात नगर आरोग्य केंद्र | र.रु.5763/- |
| 15. | कबीर नगर आरोग्य केंद्र | र.रु.6473/- |
| 16. | नक्षत्रवाडी आरोग्य केंद्र | र.रु.6711/- |
| 17. | आरोग्य केंद्र हर्सुल | र.रु.5368/- |

| | | |
|---|---|---|
| 18. | औरंगपुरा आरोग्य केंद्र | र.रु.79589/- |
| 19. | विजयनगर आरोग्य केंद्र | र.रु.50222/- |
| 20. | जुना बाजार आरोग्य केंद्र | र.रु.54485/- |
| 21. | रिलायंस मॉल,गारखेडा (व्यापारी संकुल) | र.रु.64273/- |

करीता, पुढील अवलोकनासहीत कार्यवाहीस्तव व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 1893/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर कडून नॅफॉक इंडिया लिमिटेड या संस्थेस एकुण 21 आरोग्य केंद्र/रुग्णालय येथील उपलब्ध जागा/गाळे हस्तांतर करण्या साठी आणि सदरील जागा/गाळे भाडेतत्वावर 30 वर्षाकरीता देणे दर 3 वर्षांनी 10% भाडेवाढ करणेसह तसेच अन्न व औषध प्रशासनाकडुन औषधी दुकान सरु करण्यासाठी दर 05 वर्षानी भाडेपट्टा नुतणीकरण अटीसह ताब्यात जागा 30 वर्षांसाठी भाडेकरारावर वापरण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1894/2025:-** **(कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.03 येथील स्त्री व पुरुषांचे स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.51,66,224/- (18%GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1803/2025 दि.05.02.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार निविदा र.रु.43,78,156/- च्या मर्यादित ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता यामध्ये पात्र L1 निविदाधारक श्री.प्रभाकर जी.मोहिते, कंत्राटदार हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.11% कमी दराने म्हणजे र.रु.42,41,995.22/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर काम संबधीत कंत्राटदाराकडून करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ:-टेन्डर क्र.आय.डी.2025-AMCA-1155656-01.सन 2024-2025

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता, झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.03 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे बाबत. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1803/ 2025 दि.05.02.2025 नुसार र.रु.51,66,224/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.43,78,156/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडरची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ –महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.28.02.2025 |
| 5. | आ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.28.02.2025 ते दि.09.03.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.10.03.2025 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालीलप्रमाणे आहे)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | नदीम खान अमीनुद्दीन खान | र.रु.43,78,155.87 | अदांजपत्रकीय दराने |
| 2. | सुमेध प्रदिप गायकवाड | र.रु.42,74,831.39 | अदांजपत्रकीय दरापेक्षा 2.36% कमी दराने |
| 3. | सिध्दीकी मोहम्मद मुजतबा रियाजोद्दीन | र.रु.43,24,742.37 | अदांजपत्रकीय दरापेक्षा 1.22% कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | प्रभाकर जी.मोहिते | र.रु.42,41,995.22 | अदांजपत्रकीय दरापेक्षा 3.11% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद र.रु.55.00 लक्ष मधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9 | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक प्रभाकर जी.मोहिते, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.11% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.42,41,995.22 (GST वगळून) ची असुन निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1894/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.03 येथील स्त्री व पुरुषांच्या स्वच्छतागृहाचे नूतनीकरण करणेच्या अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.51,66,224/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक श्री.प्रभाकर जी.माहिते, कंत्राटदार हे असून त्यांनी भारणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 3.11% कमी दराने म्हणजेच र.रु.42,41,995.22/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1895/2025:- (यांत्रिकी वाहने विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी प्रमाणे छत्रपती संभाजीगनर शहरातील मान्सुनपुर्व नाले सफाई या वर्षी देखील करण्यात येत आहे. त्या करीता महानगरपालिकेकडे असलेले 03 पोकलेन मशिन्स 10 बॅकहोलोडर्स मशिन्स व 10 हायवा देण्यात आलेले आहेत नालेसफाईसाठी झोन कार्यालया कडुन करण्यात आलेल्या मशिनरींची मागणी पाहता महानगरपालिकेकडे असलेली मशिनरी अपुरी पडत आहे. त्यामुळे आवश्यक मशिनरी किरायाने घेण्यासाठी स्थानिक बाजारातुन दरपत्रके घेण्यात आली असता, खालील प्रमणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र | एजन्सीचे नांव | प्राप्त दर (जीएसटी शिवाय) | |
|---|---|---|---|
| | | पोकलेन-210 | ट्रॅक्टर(प्रतिशिफ्ट 8 तास) |
| 1 | मे.न्यु साधना इंजि.वर्कस | 3000/-प्रतितास | 4600/- प्रतिशिफ्ट |
| 2 | मे. परफेक्ट इंजि. वर्कस | 3200/-प्रतितास | 4800/- प्रतिशिफ्ट |
| 3 | मे. एस.एम.गॅरेज | 3500/-प्रतितास | 5000/- प्रतिशिफ्ट |

उपरोक्त नुसार तुलानात्मकदृष्ट्या मे.न्यु साधना इंजि.वर्कस यांचे दर कमी असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्राहय धरण्यात आले आहेत. मे.न्यु साधना इंजि.वर्कस यांच्या प्राप्त न्युनतम दरानुसार 03 पोकलेन-210/- व 06 ट्रॅक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसांसाठी किरायाने घेण्यासाठी र.रु.47,01,120/- (जीएसटीसह) रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवुन उपरोक्त मशिनरी किरायाने घेण्यात येतील.

करीता छत्रपती संभाजीनगर शहरातील मान्सुनपुर्व नालेसफाई करण्यासाठी 03 पोकलेन-210 व 06 ट्रक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसासाठी किरायाने घेण्यासाठी येणाऱ्या र.रु.47,01,120/- (जीएसटीसह) अपेक्षीत खर्चाचा प्रस्तव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1895/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील मान्सुनपुर्व नालेसफाई करण्यासाठी 03 पोकलेन-210 व 06 ट्रॅक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसासाठी किरायाने घेण्यासाठी येणाऱ्या रु.47,01,120/- (जीएसटी सह) अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1896/2025:- (कार्यकारी अभियंता विद्‌युत विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे किलेअर्क ते नोबत दरवाजा रोड या मार्गावर वीज वाहिनींच्या ताणामुळे रहदारीला अडचण निर्माण होत असल्याने येथील महावितरण कंपनीचे एच.टी / एल.टी लाईन व DTC स्थंलातरीत करणे आवश्यक आहे.

सदर अंदाजपत्रकाच्या कामासाठी महावितरण कंपनीने निर्धारित केलेली र.रु.63,10,588/- असुन या कामासाठी सुसंगत तांत्रिक आणि वित्तीय प्रस्ताव तयार केले आहेत. यामध्ये वीज वाहिनींचे सुरक्षित स्थलांतर जोडणीची नवीन व्यवस्था तसेच आवश्यक सुधारणा आणि सुरक्षेसाठी लागणारी सामुग्री यांचा समावेश आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र./जिनीस /जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासठी र.र.7 कोटीचा निधी प्राप्त झालेला आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत विकसीत होत असणाऱ्या रस्त्यांच्या मध्ये अडथळा निर्माण करणारे डि.टी.सी स्थंलातरीत करण्याचे काम महानगरपालिकेतर्फे म.रा.वि.वि. कंपनीस 1.3% देखरेख शुल्क भरणा करण्यात येणार आहे. त्यानुसार किलेअर्क ते नौबत दरवाजा रोड येथील विद्‌युत उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या कामाबाबत म.रा.वि.वि.कंपनीकडुन 1.3% Suprvision Charges अंतर्गत अंदाज पत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

तरी र.रु.63,10,588/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1896/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे किलेअर्क ते नौबत दरवाजा रोड येथील महावितरण विद्‌युत उच्चदाब/लघुदाब वाहिन्या व रोहीत्र शिफ्ट करण्यासाठी रक्कम अंदाजपत्रकीय र.रु.63,10,588/- सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1897/2025:- (कार्यकारी अभियंता ड्रेनज विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी मेनहोल क्लिनींग साठी HOMOSEP मशीन खरेदी करणेची बाब विचाराधीन असुन, त्यासाठी Solinas Integrity Pvt.Ltd यांच्या मशीनचा डेमो साईटवर घेण्यात आला आहे. सदर स्थळ पाहणीमध्ये HOMOSEP मशीन जलनि:स्सारण वाहिनीची दैनंदिन चोकअपच्या तक्रारी दुर करणेकामी उपयुक्त ठरणार आहे. सदर मशीनच्या संपुर्ण युनिटची रुंदी 1.50 मीटर असल्याने, शहरातील अरुंद गल्ल्यांमध्ये जाऊन मेनहोल चेंबरमधील गाळ/घाण सहज काढणे शक्य होणार आहे सदरची मशीनचा काही भाग, ज्यामध्ये लोखंडी फ्रेम करुन डी.जी.सेट बसविणे व इतर उपांगे फिक्स केल्यास HOMOSEP मशीन जेटींग/व्हॅक्युम मशीनला जोडुन आवश्यक त्या विविध ठिकाणी सहज नेऊन काम करता येते. HOMOSEP मशीन आधुनिक पध्दतीचे व वापरण्यास Flexible असल्याने, विशेषत: मेनहोल चेंबर मधील गाळ/मैला काढण्यास उपयोगी होणार आहे. सदरचे HOMOSEP मशीन टो-करुन कुठेही घेऊन जाता येऊ शकते, ती Flexibility यात आहे.

सदरची HOMOSEP मशीन मेनहोल चेंबरमध्ये विषारी वायू असल्यास त्याची आगाऊ सुचना देण्यासाठी सेन्सरची सुविधा या मशिनमध्ये करण्यात आली आहे. सदर मशीनची ब्लेड व बकेट ही आवश्यकतेनुसार मेनहोल चेंबरमध्ये उजवीकडे/डावीकडे फिरु शकते. त्यामुळे मेनहोल चेंबरमधील गाळ,घाण काढण्यास सुलभ जाते व यामध्ये कुठलाही मानवीय हस्तक्षेप राहत नाही. या शिवाय सदर मशीन सोबत Grab bucket, De-sludging गाळ साठविणे साठीची सुविधा असुन ही मशीन अस्तित्वात असलेल्या जेटींग मशीनच्या पाठीमागील भागात बसवुन वापरता येऊ शकते.

सदरची HOMOSEP मशीन सुमारे 20 मीटर खोलीपर्यंत असलेल्या मेनहोल चेंबरमधील गाळ काढण्यास सक्षम आहे. सदर मशीनला 02 Hydrolic operated Arms असुन ते सुमारे 1.50 मीटर रुंदीपर्यंतच्या मेनहोल चेंबरमध्ये काम करण्यास सहाय्य करतात. तसेच या मशीन सोबत 02 Multi Blade Cutter System ची जोडणी करता येऊ शकते जे की, स्लज हार्ड झालेल्या परिस्थितीत स्लजला सहज तोडुन त्यातील मलबा मोकळा करुन काढण्यास सक्षम आहे. या मशीनमध्ये अंतर्भुत असलेला स्टोरेज टँक हा 90 लीटर क्षमतेचा व 180 किलो वजनी क्षमतेचा आहे. तसेच Collecting Grab Bucket capacity 17 लीटर आहे. सदरची HOMOSEP मशीनला 03 कॅमेरा असल्याने व सदरचे कॅमेरे IP-68 रेटींगचे असल्याने लो-लाईट मध्ये काम करण्यास सक्षम व कॅमेरे वॉटरप्रुफ असल्याने 10 मिटर खोलीपर्यंत सहज कार्य करु शकते. या मशीनचे नियंत्रण करणेसाठी सुलभ यंत्रणा विकसित करण्यात आली असुन त्यासाठी Monitor-cum-Control System बसविण्यात आलेली आहे. या मशीनला 6.5 SHP ची Hydrolic Pump व 60 लीटर Hydrolic Oil Tank द्वारे संचलित करण्यात येते. सदरची संपुर्ण यंत्रणा पेट्रोल इंजिन जे की, जेटींग मशीनच्या मागील बाजुस बसविण्यात आलेले असते, त्याद्वारे ताळमेळ ठेवून काम करते

सदर मशीनची संपूर्ण यंत्रणा या मशीनवर बसविण्यात आलेल्या Electronic Pannel द्वारे नियंत्रित केली जाते. साईटवरील मर्यादा लक्षात घेता या मशीन सोबत 0.75 KVA क्षमतेचे जनरेटर बसविण्यात आलेला असुन तो या मशिनचा अविभाज्य भाग आहे.

DG Set चालविण्यासठी लागणारे इंधन (पेट्रोल/डिझेल) चा खर्च वेगळा करावा लागेल. या शिवाय सदर मशीनचा Set up महानगरपालिकेकडे असलेल्या कमी क्षमतेच्या सक्शन / जेटींग मशनच्या मागील बाजुस Solinas कंपनीकडुन करुन घेणे योग्य वाटते.

दोन HOMOSEP मशीन खरेदी करावयाच्या झाल्यास त्यासाठी एक मशीन र.रु.48,00,000/- (GST 18% रु.8,64,000/- अतिरीक्त ) प्रमाणे, दोन मशीनसाठी रु. 1,13,28,000/- एवढा खर्च येणार आहे. अर्थिक वर्ष 2025-26 मध्ये नाविन्यपुर्ण कामे या लेखाशिर्षका अंतर्गत रु.1,25,00,000/- ची तरतुद लेखा विभागास कळविण्यात आलेली आहे. यामधुन सदरची कामे हाती घेणे योग्य वाटते सदर HOMOSEP मशीनची उपयोगिता पाहता प्रथम टप्प्यांतर्गत वर्ष 2025-26 मधील तरतुद रु.1,25,00,000/- मधुन 02 मशीनची खरेदी ई-निविदा काढुन करणे योग्य वाटते.

करिता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी मेनहोल क्लिनींग साठी HOMOSEP मशीन खरेदी करणे, या कामाचे अं.प.र.रु.1,13,28,000/- यांस मंजुरी देणे ई-निविदेची कार्यवाही करणे बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1897/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी मेनहोल क्लिनींग साठी HOMOSEP मशीन खरेदी करणे, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,13,28,000/- यांस मंजुरी देणे, ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबींस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1898/2025:-** **(पशुसंवर्धन, आस्थापना-2 विभाग)** **(दि.21.04.2025)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुहास शरद तुपे, मजुर, पशु संवर्धन विभाग, मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारावर उपचारासाठी युनायटेड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.7,07,416/- (अक्षरी रक्कम रुपये सात लक्ष सात हजार चारशे सोळा फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (अपघात) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.7,07,416/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,28,014/- इतकी असुन 5% र.रु.35,370/- इतकी असुन एकुण र.रु.4,86,091/- संबंधीतास द्यावयाचे आहे. परंतु संबंधीताने घेतलेली अग्रिम र.रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वजा जाता एकुण शिल्लक र.रु.3,86,091/- एवढी येते.

परंतु सदरील रुग्णालय हे महाराष्ट्र शासन यादीत नसल्यामुळे संबंधीतास र.रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) पर्यंत मिळते त्यामधुन 5 टक्के र.रु.5000/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरित र.रु.95000/- वैद्यकीय परतावा स्वरुपात संबंधीतांकडून अग्रिम समायोजन करुन घेण्यास मान्तया प्रदान करण्यात आली आहे.

संबंधीताने युनायटेड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकवि-2 मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्ती साठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.सुहास शरद तुपे, मजुर यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95000/- मधुन समायोजन करणे व संबंधीताने र.रु.5000/- मनपा फंडात जमा करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1898/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुहास शरद तुपे, मजुर, पशुसंवर्धन विभाग, मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या (अपघात) या आजारावर उपचारासाठी युनायटेड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. परंतु सदरील रुग्णालय हे महाराष्ट्र शासन यादीत नसल्यामुळे यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95000/- चे अग्रिम मधुन समायोजन करणे व संबंधीताने र.रु.5000/- मनपा फंडात जमा करण्याची मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1899/2025:-** **(नगर रचना विभाग)** **(दि.25.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 हा अधिनियम शासन राजपत्र दि.12 मार्च 2021 अन्वये अंमलात आला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने दि.06.08.2021 रोजी ठराव घेऊन सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. ठरावानुसार गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल करण्याची अंतिम मुदत दि.30.09.2022 पर्यंत दिली होती. त्यात वेळोवेळी वाढ करुन दि.30.04.2025 पर्यंत मुदतवाढ दिली. त्यानंतरही गुंठेवारी प्रस्ताव स्विकारणे व नियमितीकरण करण्याची प्रक्रिया आज पर्यंत सुरु आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 (सुधारणा) 2021 मधील कलम 4 (1) मध्ये हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढवून दिलेल्या मुदतीत संबंधित भुखंडधारक गुंठेवारी नियमाधिन करण्यासाठी अर्ज करील अशी तरतुद आहे.

विषय क्र.1620/2024 दि.30.09.2024 रोजी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन दि.30.04.2025 पर्यंत यापुर्वी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 (सुधारण) 2021 अंतर्गत कलम 4 (1) नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत भूखंड व बांधकाम नियमित करण्यासठी गुंठेवारी योजना अंतर्गत प्रकरणे दाखल करुन नियमितीकरण करण्यासाठी दि.31.10.2025 पर्यंत मुदतवाढ देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1899/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 (सुधारणा) 2021 मधील कलम 4 (1) च्या तरतुदीनुसार गुंठेवारी अंतर्गत नियमितीकरणासाठी प्रस्ताव सादर करणेसाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.31.10.2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1900/2025:-** **(पा.पु जायकवाडी यांत्रिकी विभाग)** **(दि.25.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.विष्णु मल्लु पवार, फिटर, पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) विभाग मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या आईच्या ca lung/adeno ca malignant pleural effusion या आजारावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.3,11,237/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लक्ष अकरा हजार दोनशे सदोतीस फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता अनुज्ञेय रक्कमेच्या 90 टक्के र.रु.2,13,016/- (अक्षरी दोन लक्ष तेरा हजार सोळा फक्त) एवढी होत असुन यामधुन 5 टक्के र.रु.15,561/-(अक्षरी पंधरा हजार पाचशे एकसष्ठ फक्त) मनपा फंडात जमा करुन व संबंधितास र.रु.1,97,455/-(अक्षरी एक लक्ष सत्यान्नव हजार चारशे पंचावन्न फक्त) वैद्यकीय परीपुर्तीसाठी देय होत आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये कर्करोग आजार हा शासन मान्य गंभीर आजारांमध्ये येतो. असे पान क्र.3 वरील परी.12 अन्वये आरोग्य विभागाने नमुद केले आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16.11.2011 मध्ये जारी केलेल्या परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी दि.16.11.2011 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. तसेच सदरील कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेता. त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेत असलेल्या विशेष अधिकारात सदरील वैद्यकीय खर्च र.रु1.50 लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे सदरील परतावा मान्य करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांचे अधिन असल्यामुळे परतावा खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1900/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विष्णु मल्लु पवार फिटर, पाणी पुरवठा जायकवाडी (यां) विभाग, मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या आईच्या ca lung/adeno ca malignant pleural effusion या आजारावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.3,11,237/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लक्ष अकरा हजार दोनशे सदोतीस फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता अनुज्ञेय रक्कमेच्या 90 टक्के र.रु2,13,016/- (अक्षरी दोन लक्ष तेरा हजार सोळा फक्त) एवढी होत असुन यामधुन 5 टक्के र.रु15,561/- (अक्षरी पंधरा हजार पाचशे एकसष्ठ फक्त) मनपा फंडात जमा करुन व संबंधितास र.रु.1,97,455/- (अक्षरी एक लक्ष सत्यान्नव हजार चारशे पंचावन्न फक्त) वैद्यकिय परिपुर्ती साठी देय होत आहे.

सदरील कर्मचाऱ्याची आर्थिक स्थिती विचारात घेता त्यास खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्यांनी प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषाधिकारात सदरील वैद्यकीय खर्च र.रु.1.50 लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे सदरील परतावा मान्य करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांचे अधिन असल्यामुळे परतावा खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरित/-**
**महापालिका सचिव**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरित/-**
**प्रशासक**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर